बालभारती
हीरक महोत्सव

# कलाशिक्षण

## इयत्ता सहावी

विनामूल्य
वितरणासाठी



Tele MANAS
National Tele Mental Health Programme
14416

# टेली मानस हेल्पलाईन

**Tele MANAS (Tele Mental Health Assistance and Networking Across States)**

**(१४४१६ / १८००-८९-१४४१६)**

राष्ट्रीय मानसिक आरोग्य कार्यक्रमांतर्गत टेली मानस ही केंद्र पुरस्कृत योजना महाराष्ट्र राज्यात ऑक्टोबर २०२२ पासून राबवण्यात येत आहे. टेली मानस कार्यक्रमांतर्गत हेल्पलाईन क्रमांक १४४१६द्वारे मोफत २४ × ७ एकात्मिक आणि सर्वसमावेशक मानसिक आरोग्य सेवा दिली जाते. यामध्ये विविध मानसिक समस्यांकरिता तज्ज्ञांमार्फत उपचार व समुपदेशन करण्यात येते. टेली मानस हेल्पलाईनवर दूरध्वनी केल्यानंतर आपण दिलेली माहिती ही पूर्णतः गोपनीय राहते, त्यामुळे विद्यार्थ्यांनी निःसंकोचपणे आपल्या समस्या सदर हेल्पलाईन क्रमांकावर दूरध्वनीद्वारे (कॉल करून) सांगाव्यात तसेच मनात असणाऱ्या शंका विचाराव्यात आणि आपल्या समस्येविषयी मदत घ्यावी व दुसऱ्यांनाही मदत घेण्यास सांगावे.

# मनोदर्पण

**मनोदर्पण (८४४८४४०६३२)** ही मोफत दूरध्वनी सेवा जुलै २०२०पासून शिक्षा मंत्रालय यांच्यामार्फत राष्ट्रीय शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद येथील मनोदर्पण कक्षाद्वारे विद्यार्थ्यांना, पालकांना तसेच शिक्षकांना मानसशास्त्रीय मार्गदर्शन व साहाय्य प्रदान करण्यासाठी सकाळी ८ ते संध्याकाळी ८ या कालावधीत आठवड्यातील सर्व दिवस उपलब्ध करून देण्यात आली आहे. विद्यार्थी, पालक व शिक्षक आवश्यक मार्गदर्शन व समुपदेशन घेण्यासाठी या हेल्पलाईनवर देखील दूरध्वनी करू शकतात.

शासन निर्णय क्रमांकः अभ्यास - २११६/(प्र.क्र.४३/१६) एसडी- ४ दिनांक २५.४.२०१६ अन्वये स्थापन करण्यात आलेल्या समन्वय समितीच्या दिनांक १ जून २०२६ रोजीच्या बैठकीमध्ये हे पाठ्यपुस्तक सन २०२६-२७ या शैक्षणिक वर्षापासून निर्धारित करण्यास मान्यता देण्यात आली आहे.

# कलाशिक्षण

## इयत्ता सहावी

**समग्र शिक्षा**

**महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ, पुणे ४.**

सोबतच्या चौकटीतील Q.R.Code स्मार्टफोनवर द्‌वारे स्कॅन केल्यास आपणास डिजिटल पाठ्यपुस्तक व पाठ्यपुस्तकातील घटकांसंबंधित दृक, श्राव्य आणि दृकश्राव्य स्वरूपातील अध्ययन - अध्यापन साहित्य उपलब्ध होईल.

प्रथमावृत्ती : २०२६

© महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ, पुणे ४११००४

या पुस्तकाचे सर्व हक्क महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळाकडे राहतील. या पुस्तकातील कोणताही भाग संचालक, महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ यांच्या लेखी परवानगीशिवाय उद्धृत करता येणार नाही.

**'कला शिक्षण' विषय समिती**

श्री. श्रीराम महाजन (अध्यक्ष)
श्री. अजय पाटील (सदस्य)
श्री. दीपक जोगदंड (सदस्य)
श्री. पुरेंद्रकुमार देवगिरकर (सदस्य)
श्री. मिलिंद जाधव (सदस्य)
श्री. गंगाधर गोतारणे (सदस्य)
श्री. सुनिल देसाई (सदस्य)
श्री. धनाजी कराडे (सदस्य)
श्री. उमेश डोंगे (सदस्य)
श्री. मोहन भोजापुरे (निमंत्रित)
श्री. अमोल जाधव (निमंत्रित)
डॉ. सुमेधा ठाकूर (निमंत्रित)
श्रीमती मृगया मोरे (निमंत्रित)
श्री. शिवाजी हांडे (निमंत्रित)
डॉ. सागर कुलकर्णी (निमंत्रित)
श्रीमती रश्मी जोशी (निमंत्रित)
श्रीमती जुई देशिंगकर (निमंत्रित)
श्रीमती निताली हरगुडे (निमंत्रित)
श्री. नंदकिशोर नगरकर (निमंत्रित)
श्री. शशिकांत देशमुख (निमंत्रित)
श्री. ओंकार वैरागकर (निमंत्रित)
श्री. अमोल बोधे (निमंत्रित)
डॉ. गीतांजली बोरुडे (अभ्यासक्रम समन्वयक)
डॉ. अजयकुमार लोळगे (सदस्य सचिव)

**समीक्षक**

श्री. अभिजीत धोंडफळे (गुणवत्ता परीक्षक)
ॲड. संदेश साखरे (विधीतज्ज्ञ)
प्रा. विलास पंडीत (CWSN तज्ज्ञ)

**संयोजक**

**डॉ. अजयकुमार लोळगे**
विशेषाधिकारी कार्यानुभव (वि. का.)
प्र. विशेषाधिकारी कलाशिक्षण
पाठ्यपुस्तक मंडळ, पुणे.

**मुखपृष्ठ व अंतर्गत चित्राकृती :**
श्री. लक्ष्मीकांत काळे,
श्रीमती प्राजक्ता केरकर

**अक्षरजुळणी :** मुद्रा विभाग, पाठ्यपुस्तक मंडळ, पुणे
**कागद :** ७० जी.एस.एम.क्रीमवोव्ह
**मुद्रणादेश :** N/PB/2026-27/Qty. - 76000
**मुद्रक :** M/s. Audumbar Prints, Pune

**निर्मिती**

**श्रीमती मिताली शितप**
प्र. मुख्य निर्मिती अधिकारी
**श्री. संदीप अजगावकर**
निर्मिती अधिकारी

**प्रकाशक**

**श्री. हेमंत बाबर**
प्र. नियंत्रक
पाठ्यपुस्तक निर्मिती मंडळ, प्रभादेवी, मुंबई – २५

# भारताचे संविधान

### उद्देशिका

**आम्ही, भारताचे लोक, भारताचे एक सार्वभौम समाजवादी धर्मनिरपेक्ष लोकशाही गणराज्य** घडविण्याचा व त्याच्या सर्व नागरिकांस:

सामाजिक, आर्थिक व राजनैतिक **न्याय;**
विचार, अभिव्यक्ती, विश्वास, श्रद्धा
व उपासना यांचे **स्वातंत्र्य;**
दर्जाची व संधीची **समानता;**

निश्चितपणे प्राप्त करून देण्याचा
आणि त्या सर्वांमध्ये व्यक्तीची प्रतिष्ठा
व राष्ट्राची एकता आणि एकात्मता
यांचे आश्वासन देणारी **बंधुता**
प्रवर्धित करण्याचा संकल्पपूर्वक निर्धार करून;

**आमच्या संविधानसभेत**
आज दिनांक सव्वीस नोव्हेंबर, १९४९ रोजी
**यद्वारे हे संविधान अंगीकृत आणि अधिनियमित करून स्वत:प्रत अर्पण करीत आहोत.**

# भारताचे संविधान

### भाग ४ क

## नागरिकांची मूलभूत कर्तव्ये

**अनुच्छेद ५१ क**

**मूलभूत कर्तव्ये – प्रत्येक भारतीय नागरिकाचे हे कर्तव्य असेल की त्याने –**

(क) प्रत्येक नागरिकाने संविधानाचे पालन करावे. संविधानातील आदर्शांचा, राष्ट्रध्वज व राष्ट्रगीताचा आदर करावा.
(ख) स्वातंत्र्याच्या चळवळीला प्रेरणा देणाऱ्या आदर्शांचे पालन करावे.
(ग) देशाचे सार्वभौमत्व, एकता व अखंडत्व सुरक्षित ठेवण्यासाठी प्रयत्नशील असावे.
(घ) आपल्या देशाचे रक्षण करावे, देशाची सेवा करावी.
(ङ) सर्व प्रकारचे भेद विसरून एकोपा वाढवावा व बंधुत्वाची भावना जोपासावी. स्त्रियांच्या प्रतिष्ठेला कमीपणा आणतील अशा प्रथांचा त्याग करावा.
(च) आपल्या संमिश्र संस्कृतीच्या वारशाचे जतन करावे.
(छ) नैसर्गिक पर्यावरणाचे जतन करावे. सजीव प्राण्यांबद्दल दयाबुद्धी बाळगावी.
(ज) वैज्ञानिक दृष्टी, मानवतावाद आणि जिज्ञासूवृत्ती अंगी बाळगावी.
(झ) सार्वजनिक मालमत्तेचे जतन करावे. हिंसेचा त्याग करावा.
(ञ) देशाची उत्तरोत्तर प्रगती होण्यासाठी व्यक्तिगत व सामूहिक कार्यात उच्चत्वाची पातळी गाठण्याचा प्रयत्न करावा.
(ट) ६ ते १४ वयोगटातील आपल्या पाल्यांना पालकांनी शिक्षणाच्या संधी उपलब्ध करून द्याव्यात.

## राष्ट्रगीत

जनगणमन–अधिनायक जय हे
भारत–भाग्यविधाता ।
पंजाब, सिंधु, गुजरात, मराठा,
द्राविड, उत्कल, बंग,
विंध्य, हिमाचल, यमुना, गंगा,
उच्छल जलधितरंग,
तव शुभ नामे जागे, तव शुभ आशिस मागे,
गाहे तव जयगाथा,
जनगण मंगलदायक जय हे,
भारत–भाग्यविधाता ।
जय हे, जय हे, जय हे,
जय जय जय, जय हे ।।

## प्रतिज्ञा

भारत माझा देश आहे. सारे भारतीय माझे बांधव आहेत.

माझ्या देशावर माझे प्रेम आहे. माझ्या देशातल्या समृद्ध आणि विविधतेने नटलेल्या परंपरांचा मला अभिमान आहे. त्या परंपरांचा पाईक होण्याची पात्रता माझ्या अंगी यावी म्हणून मी सदैव प्रयत्न करीन.

मी माझ्या पालकांचा, गुरुजनांचा आणि वडीलधाऱ्या माणसांचा मान ठेवीन आणि प्रत्येकाशी सौजन्याने वागेन.

माझा देश आणि माझे देशबांधव यांच्याशी निष्ठा राखण्याची मी प्रतिज्ञा करीत आहे. त्यांचे कल्याण आणि त्यांची समृद्धी ह्यांतच माझे सौख्य सामावले आहे.

## राज्यगीत

जय जय महाराष्ट्र माझा, गर्जा महाराष्ट्र माझा
जय जय महाराष्ट्र माझा, गर्जा महाराष्ट्र माझा ।।धृ।।

भिती न आम्हा तुझी मुळी ही गडगडणाऱ्या नभा
अस्मानाच्या सुलतानीला जबाब देती जिभा
सह्याद्रीचा सिंह गर्जतो शिव शंभू राजा
दरी दरीतून नाद गुंजला महाराष्ट्र माझा
जय जय महाराष्ट्र माझा, गर्जा महाराष्ट्र माझा ।।१।।

काळ्या छातीवरी कोरली, अभिमानाची लेणी
पोलादी मनगटे खेळती, खेळ जीवघेणी
दारिद्र्याच्या उन्हात शिजला
निढळाच्या घामाने भिजला
देश गौरवासाठी झिजला
दिल्लीचे ही तख्त राखितो, महाराष्ट्र माझा
जय जय महाराष्ट्र माझा, गर्जा महाराष्ट्र माझा
जय जय महाराष्ट्र माझा ।।२।।

# प्रस्तावना

विद्यार्थी मित्रांनो,

इयत्ता सहावीच्या वर्गात तुम्हां सर्वांचे स्वागत. इयत्ता सहावीचे 'कलाशिक्षण' हे पाठ्यपुस्तक तुमच्या हाती देताना आम्हाला आनंद होत आहे.

कला शिकताना आनंद देणारे आणि तुमच्या कल्पनांना बळ देणारे हे पाठ्यपुस्तक आहे. चित्र काढणे, रंग भरणे, गाणे म्हणणे, अभिनय करणे, नृत्य करणे किंवा वेगवेगळ्या हालचालींमधून भावना व्यक्त करणे, या सगळ्या गोष्टी म्हणजेच कलाशिक्षण. कलेच्या माध्यमातून आपल्या विचार आणि भावना या सुंदर पद्धतीने व्यक्त करता येतात.

या पाठ्यपुस्तकात दृश्यकला, रंगमंच, संगीत, नृत्य व हालचाल या वेगवेगळ्या चार कलाप्रकारांचा समावेश आहे. दृश्यकलेत तुम्ही रेखाटन, स्मरणचित्र, वस्तूचित्र, संकल्पचित्र, शिल्पकला, अक्षरलेखन आणि कलासंस्कृती यांसारख्या गोष्टी शिकाल. रंगमंचातून अभिनयाचा अनुभव घ्याल. संगीतामध्ये गायन व वादन शिकाल, तर नृत्य व हालचालींमधून शरीराची लय आणि तोल तुम्हाला अनुभवता येईल. या पाठ्यपुस्तकातील उपक्रम तुम्हांला स्वतः विचार करायला, कल्पना करायला आणि नवीन गोष्टी सादर करायला मदत करतील. काही उपक्रम तुम्हांला एकट्याने, तर काही उपक्रम मित्रांसोबत समूहाने करायचे आहेत. त्यामुळे शिकणे अधिक मजेदार आणि आनंददायी होईल.

या पाठ्यपुस्तकात चित्र काढताना आणि कलाकृती निर्माण करताना वेगवेगळी साधने, साहित्ये आणि तंत्रे वापरण्याची संधी दिली आहे. शक्य तितके पर्यावरणपूरक साहित्य वापरण्याचा प्रयत्न करा. आपल्या परिसरातील उपलब्ध असलेल्या वस्तूंमधूनही सुंदर कला सादर करता येते, हे तुम्ही अनुभवाल. स्थानिक व प्रादेशिक कला, कलाकार आणि संस्कृती यांची ओळख करून देण्यासाठी काही उपक्रम आणि क्षेत्रभेटी सुचवल्या आहेत. त्यामुळे आपल्या परंपरेतील सुंदर कलावैभव तुम्हांला जवळून पाहता येईल.

प्रत्येक विद्यार्थी वेगळा असतो आणि प्रत्येकामध्ये काही ना काही खास गुण असतात. त्यामुळे या पुस्तकातील उपक्रम करताना स्वतःच्या कल्पना मोकळेपणाने व्यक्त करा. चूक होण्याची भीती बाळगू नका. प्रयत्न करत राहा आणि कलाप्रकार शिकण्याचा आनंद घ्या. हे पाठ्यपुस्तक तुमच्यातील कलाकार जागा करेल आणि शिकण्याचा प्रवास अधिक सुंदर बनवेल, अशी आम्हांला खात्री आहे.

चला, आनंदाने शिकू या आणि आपल्या कल्पनांना रंग देऊ या!

(अनुराधा ओक)
संचालक
महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व
अभ्यासक्रम संशोधन मंडळ, पुणे.४

पुणे

**दिनांक** : १ मे २०२६

भारतीय सौर दिनांक : वैशाख ११, शके १९४८

महाराष्ट्र दिन

# शिक्षकांसाठी

शिक्षक मित्रांनो,

पूर्वमाध्यमिक स्तरावर कला शिक्षण हे विद्यार्थ्यांच्या अभिव्यक्तीचे माध्यम आहे. विद्यार्थ्यांतील सर्जनशीलता, कल्पकता आणि रसास्वाद घेण्याची वृत्ती विकसित करण्यासाठी काही गोष्टी लक्षात घेणे गरजेचे आहे.

**१. आनंददायी वातावरणाची निर्मिती :**

कला वर्गामध्ये शिस्तीसोबतच मोकळेपणाचे वातावरण ठेवावे. नवनवीन प्रयोग करण्यास प्रेरणा द्यावी. कलेच्या तासाला दडपण न घेता मुक्तपणे स्वतःला व्यक्त करण्यासाठी प्रोत्साहन द्यावे.

**२. प्रक्रियेला महत्त्व :**

- तयार केलेली कलाकृती किती परिपूर्ण आहे, त्यापेक्षा ती तयार करताना किती प्रयत्न केले आणि काय शिकले, या प्रक्रियेला जास्त महत्त्व द्यावे.
- प्रत्येक विद्यार्थ्याची शिकण्याची गती आणि शैली वेगळी असते, याची नोंद घ्यावी.

**३. प्रात्यक्षिक आणि सादरीकरण :**

- केवळ तात्त्विक माहिती न देता स्वतः काही कृती करून दाखवावी (उदा. एखादी तान घेऊन दाखवणे, रंगांचे मिश्रण करणे किंवा अभिनयातील एखादी मुद्रा करून दाखवणे).
- विद्यार्थ्यांमध्ये सादरीकरणाचा आत्मविश्वास निर्माण करण्यासाठी वर्गात छोटी प्रदर्शने किंवा सादरीकरण आयोजित करावे.

**४. साहित्याचा वापर :**

- महागड्या साहित्याऐवजी सभोवतालच्या परिसरात सहज उपलब्ध होणाऱ्या साहित्यांचा (उदा. माती, दगड, पाने, टाकाऊ वस्तू) वापर करण्यास विद्यार्थ्यांना प्रवृत्त करावे.
- वाद्ये, रंग आणि इतर साधनांची निगा कशी राखावी, याचे शास्त्रशुद्ध प्रशिक्षण द्यावे.

**५. बहुआयामी दृष्टिकोन :**

- चित्रकला, संगीत, नृत्य आणि नाट्य या कला एकमेकींशी कशा जोडलेल्या आहेत, हे सांगावे. (उदा. संगीतातील तालावर चित्र काढणे किंवा कवितेवर आधारित नाट्यीकरण करणे).
- कला विषयाचा संबंध इतर विषयांशी (भाषा, इतिहास, विज्ञान इ.) जोडून शिक्षण अधिक रंजक करावे.

**६. रसास्वाद आणि मूल्यमापन :**

- मूल्यमापन करताना केवळ चुका काढण्याऐवजी सकारात्मक बाबी सांगाव्यात.
- प्रसिद्ध कलाकारांच्या कलाकृती दाखवाव्यात, जेणेकरून 'रसग्रहण' (Appreciation) करण्याची वृत्ती वाढीस लागेल.
- शासनाने वेळोवेळी निर्धारित केलेल्या मूल्यमापन पद्धतीचा वापर करावा. प्रात्यक्षिकांवर अधिक भर द्यावा.

**७. समावेशकता :**

- वर्गातील विशेष गरजा असलेल्या (CWSN) विद्यार्थ्यांबाबत अध्ययन- अध्यापन करताना समर्पक भाषेचा तसेच अन्य पूरक अध्यापन पद्धतींचा विचार करावा. तसेच उपक्रम व मूल्यमापनामध्ये योग्य ते बदल करावे, जेणेकरून तेही आनंदाने सहभागी होतील.

  पाठ्यपुस्तकात दिलेल्या तात्त्विक माहितीवर जास्त भर न देता प्रात्यक्षिकावर अधिक भर द्यावा.
- **प्रत्येक सत्रात दृश्यकला, रंगमंच, संगीत, नृत्य व हालचाल या कलांचा समावेश करावा व त्यानुसार अध्ययन-अध्यापन अपेक्षित आहे.**

**कलाशिक्षण विषय समिती**
**पाठ्यपुस्तक मंडळ, पुणे**

# विद्यार्थ्यांसाठी

विद्यार्थी मित्रांनो,

सहावीचे हे वर्ष तुमच्या कलात्मक प्रवासातील एक महत्त्वाचा टप्पा आहे. दृश्यकला, रंगमंच, संगीत, नृत्य व हालचाल या चारही कला तुमच्या जीवनात आनंद आणि शिस्त निर्माण करतात. या विषयांचा अभ्यास करताना खालील गोष्टी लक्षात ठेवाव्यात.

### १. निरीक्षण आणि जाणीव

- सभोवतालच्या निसर्गाचे, रंगांचे, आवाजांचे आणि व्यक्तीच्या हालचालींचे बारकाईने निरीक्षण करावे.
- निसर्गातील बदल (उदा. पावसाळ्यातील झाडांचे बदलणारे रंग, पक्ष्यांचे विविध आवाज) यांचे सूक्ष्म निरीक्षण करून त्यातून शिकण्याचा प्रयत्न करावा.

### २. सातत्यपूर्ण सराव

- कोणतीही कला ही एका दिवसात साध्य होत नाही. मग ते चित्र काढणे, गीत गायन असो किंवा नाट्य /नृत्याची हालचाल; म्हणून त्यांचा दररोज सराव करावा.
- ‘कला’ ही घोकंपट्टी करण्याची गोष्ट नसून ती अनुभवण्याची गोष्ट आहे.

### ३. साहित्याची निगा आणि स्वच्छता

- कलाविष्काराचे साहित्य व साधने, वाद्ये किंवा वेशभूषा यांची काळजी घ्यावी.
- कलाकृती पूर्ण झाल्यावर कलेचे साहित्य जागच्या जागी नीट ठेवावे.

### ४. कल्पकता आणि प्रयोगशीलता

- दुसऱ्याची नक्कल करण्यापेक्षा स्वतःच्या कल्पनेने काहीतरी नवीन करण्याचा प्रयत्न करावा.
- चुका होतील याची भीती बाळगू नका; कलेमध्ये प्रत्येक चूक ही नवीन काहीतरी शिकण्याची संधी असते.

### ५. आस्वाद आणि आदर

- स्वतःच्या कलेसोबतच तुमच्या मित्रांच्या कलेचाही आदर करा. एकमेकांच्या कामातील चांगल्या गोष्टी शोधायला शिका.
- प्रसिद्ध कलाकार, गायक आणि नर्तक यांची माहिती वाचा आणि त्यांचे कार्यक्रम पाहण्याचा प्रयत्न करावा.

### ६. एकाग्रता आणि शिस्त

- गायन किंवा वादन करताना तुमच्या शरीराची स्थिती (Posture) योग्य ठेवावी.
- चित्र काढताना किंवा अभिनय करताना तुमचे पूर्ण लक्ष त्या कृतीवर केंद्रित करावे.

या कला केवळ गुणांसाठी नसून त्या तुमच्या व्यक्तिमत्त्वाचा विकास करण्यासाठी आहेत. त्यामुळे आनंदाने आणि उत्साहाने या प्रक्रियेत सहभागी व्हावे !

| इयत्ता : ६ वी | |
|---|---|
| विषय : दृश्यकला | |
| **अभ्यासक्रम ध्येय : CG – 1 :** विविध कला प्रकारातून स्वतःचे अन्वेषण करण्यासाठी आणि मुक्तपणे अभिव्यक्त होण्यासाठी विकसित करणे. | |
| **क्षमता : C – 1.1 :** विविध दृश्यकला प्रकारांद्वारे त्यांचे वैयक्तिक आणि दैनंदिन जीवनातील अनुभव आत्मविश्वासाने व्यक्त करतो. | |
| क्रमांक | अध्ययन निष्पत्ती |
| 06AE01 | यांत्रिक साधनांशिवाय विविध रेषांचे रेखाटन करतो. |
| 06AE02 | परिसरातील विविध परिचित घटक आकारांचे आत्मविश्वासाने रेखाटन करतो. |
| 06AE03 | विविध छोटे प्रसंग दृश्य, घटना, खेळ आठवून त्यावर आधारित स्मरण चित्रण करतो . |
| **क्षमता : C – 1.2 :** परस्पर सहकार्याने दृश्यकला सराव विकसित करण्याच्या प्रक्रियेत लवचीकपणा दर्शवतो. | |
| 06AE04 | वैयक्तिक / गट कार्यातून कोलाज निर्मिती करतो. |
| 06AE05 | पर्यावरणपूरक वस्तूंचा सर्जनशीलतेने वापर करून वैयक्तिक / गटात त्रिमितीय कलाकृतीची कोलाज तंत्राचा वापर करून सजावट करतो. |
| **अभ्यासक्रम ध्येय : CG – 2 :** कलेच्या माध्यमातून पर्यायी कल्पना शोधण्यासाठी सर्जनशीलतेचा व कल्पकतेचा वापर करणे. | |
| **क्षमता : C – 2.1 :** : प्रसंग किंवा कथांवर आधारित दृश्य कलाकृती तयार करतो, जी त्यांच्या सभोवतालच्या साचेबंद कल्पनांना आव्हान देते (जसे, की लिंगभेद भूमिका.) | |
| 06AE06 | निसर्गातील निरनिराळ्या घटकांचे स्मरणाने चित्रण करतो. |
| 06AE07 | सामाजिक प्रबोधनात्मक विषयावर आधारित स्वकल्पनेने चित्रण करतो. |
| 06AE08 | चित्रात स्वतःचे कल्पक विचार मुक्तपणे मांडतो. |
| **क्षमता : C – 2.2 :** दृश्य प्रतिमा, प्रतीके आणि दृश्य स्वरूपातील रूपकांना वैयक्तिक अनुभव, भावना आणि कल्पना त्यांच्याशी जोडतो. | |
| 06AE09 | समअंग/ विषमअंग रचना पद्धतींचा वापर करून सृजनात्मक संकल्प रचनेची निर्मिती करतो. |
| 06AE10 | वस्तूचित्र व स्थिरचित्र यातील फरक समजून घेऊन शीघ्र रेखाटन करतो. |
| 06AE11 | समोर मांडलेल्या वस्तूंचे आकारमानानुसार वर्गीकरण करून फरक समजून रेखाटन करतो |
| **अभ्यासक्रम ध्येय : CG – 3 :** कलेचे घटक, प्रक्रिया आणि तंत्र समजून घेणे व उपयोगात आणणे. | |
| **क्षमता : C – 3.1 :** दृश्यकलेमध्ये विविध साहित्य, साधने आणि तंत्रे वापरताना काळजी घेतो व माहितीपूर्ण निवड करतो. | |
| 06AE12 | रंगाच्या श्रेणीचा परिचय करून घेतो व संकल्प रचनेत त्याचा उपयोग.करतो. |
| 06AE13 | चित्रातील सौंदर्य निर्मितीसाठी विविध तंत्रांचा कल्पकतेने उपयोग करतो. |
| 06AE14 | अंक/ अक्षरांचे वैशिष्ट्यपूर्ण लेखनासाठी विविध माध्यमे, साधने व तंत्रांचा वापर करतो. |
| 06AE15 | संगणकावरील विविध प्रकारच्या लिपीची (फॉन्ट) वैशिष्ट्ये अभ्यासून त्याचा कल्पकतेने उपयोग करतो. |
| **क्षमता : C – 3.2 :** नियोजनाच्या टप्प्यापासून अंतिम प्रदर्शनापर्यंत कल्पना आणि दृश्य अभिव्यक्तीचे तंत्र दर्जेदार करतो व संपूर्ण प्रक्रियेचे पुनरावलोकन करतो. | |
| 06AE16 | संकल्पाच्या मूलतत्त्वांचा उपयोग करून संकल्पचित्र निर्मिती करतो. |
| 06AE17 | माती माध्यमातून विविध भौमितिक घनाकारांची निर्मिती करतो. |
| 06AE18 | कागदी बोळे / कागदी लगद्यापासून सर्जनात्मक त्रिमितीय कलाकृती निर्माण करतो. |
| **अभ्यासक्रम ध्येय : CG – 4 :** प्रादेशिक कला आणि सांस्कृतिक परंपरांमधील सौंदर्यविषयक संवेदनशीलतेच्या विस्ताराशी स्वतःला परिचित करणे. | |
| **क्षमता : C – 4.1 :** विविध स्थानिक कला आणि प्रादेशिक कलांशी जवळीक साधतो. | |
| 06AE19 | परिसरातील दृश्यकला प्रकार/ कला व्यवसायांच्या माहितीचे संकलन करतो. |
| 06AE20 | स्थानिक/ प्रादेशिक दृश्यकलांचे अनुकरण करून अनुभव कथन करतो. |
| **क्षमता : C – 4.2 :** त्यांच्या प्रदेशातील व भारतातील काही दृश्य कलाकारांच्या जीवनाचे आणि कार्याचे वर्णन करतो. | |
| 06AE21 | स्थानिक/ प्रादेशिक परिचित शिल्पकलांच्या नावीन्यपूर्ण कलाशैली विषयक माहितीचे संकलन करतो. |
| विषय : रंगमंच | |
| **अभ्यासक्रम ध्येय : CG – 1 :** विविध कला प्रकारातून आत्मपरिक्षण करण्यासाठी आणि मुक्तपणे अभिव्यक्त होण्यासाठी विकसित करणे. | |
| **क्षमता : C – 1.1 :** वैयक्तिक आणि दैनंदिन जीवनातील अनुभव विविध नाट्यकृतीतून आत्मविश्वासाने व्यक्त करणे. | |
| 06AE22 | दैनंदिन जीवनातील विविध प्रसंगांचे निरीक्षण करून लहान प्रसंगाचे वर्णन आत्मविश्वासाने करतो. |
| 06AE23 | दैनंदिन जीवनातील अनुभवांचे उत्स्फूर्तपणे सादरीकरण करतो. |
| 06AE24 | निवडलेल्या प्रसंगाचे गटात सादरीकरण करतो. |
| **क्षमता : C – 1.2 :** परस्पर सहकार्याने नाटक विकसित करण्याच्या प्रक्रिये लवचीकपणा दर्शवितो. | |
| 06AE25 | नाट्यप्रवेशाचे वाचन करतो. |

| | |
|---|---|
| 06AE26 | परस्परांच्या सहकार्याने नाटकातील पात्रांची निवड करून नाट्यप्रसंगाचे गटात सादरीकरण करतो. |
| **अभ्यासक्रम ध्येय : CG – 2 :** कलेच्या माध्यमातून पर्यायी कल्पना शोधण्यासाठी सर्जनशीलतेचा व कल्पकतेचा वापर करणे. | |
| **क्षमता : C – 2.1 :** प्रसंग किंवा कथांवर आधारित दृश्य कलाकृती तयार करतो, जी त्यांच्या सभोवतालच्या साचेबंद कल्पनांना आव्हान देते (जसे– लिंग भेद भूमिका.) | |
| 06AE27 | सभोवतालच्या साचेबंद कल्पना समजून घेऊन छोट्या प्रसंगाचे लेखन करतो. |
| 06AE28 | कथेवर किंवा एखाद्या प्रसंगावर आधारित नाट्यछटा तयार करतो. |
| **क्षमता : C – 2.2 :** दृश्य प्रतिमा, प्रतीके आणि दृश्य स्वरूपातील रूपकांना वैयक्तिक अनुभव, भावना आणि कल्पना यांच्याशी जोडतो. | |
| 06AE29 | मूक अभिनय करताना नवरसांपैकी योग्य त्या रसांचा वापर करतो. |
| **अभ्यासक्रम ध्येय : CG – 3 :** कलेचे घटक, प्रक्रिया आणि तंत्रे समजून घेणे व उपयोगात आणणे. | |
| **क्षमता : C – 3.1 :** रंगमंचावरील मूलभूत शिष्टाचार काळजीपूर्वक पाळतो आणि विविध साहित्य, साधने व नाट्यकलेची तंत्रे वापरताना माहितीपूर्ण निवड करतो. | |
| 06AE30 | सादरीकरण करताना रंगमंचावरील मूलभूत शिष्टाचार पाळतो. |
| 06AE31 | सादरीकरणासाठी रंगमंचावर उपलब्ध साधन साहित्यांची जमवाजमव करतो. |
| **क्षमता : C – 3.2 :** प्रेक्षकांसाठी नाटकातील नियोजनाच्या टप्प्यापासून ते अंतिम सादरीकरणापर्यंत कल्पना आणि तंत्र दर्जेदार करतो आणि संपूर्ण प्रक्रियेचे पुनरावलोकन करतो. | |
| 06AE32 | रंगमंच व प्रेक्षागृह याविषयी माहिती जाणून घेऊन वर्गात नाट्य सादर करतो. |
| 06AE33 | सादरीकरणातील टप्प्यांची माहिती घेऊन दिलेल्या प्रसंगावर रंगभूषा, वेशभूषा सादरीकरण करतो. |
| **अभ्यासक्रम ध्येय : CG – 4 :** प्रादेशिक कला आणि सांस्कृतिक परंपरांमधील सौंदर्यविषयक संवेदनशीलतेच्या विस्ताराची स्वतःला परिचित करणे. | |
| **क्षमता : C – 4.1 :** रंगभूमीच्या विविध स्थानिक आणि प्रादेशिक स्वरूपांची ओळख करून देतो. | |
| 06AE34 | स्थानिक लोककलेची माहिती घेऊन त्यातील एका लोककलेबद्दल लेखन करतो. |
| 06AE35 | लोककलेचे गटाने सादरीकरण करतो. |
| **क्षमता : C – 4.2 :** त्यांच्या प्रादेशातील आणि संपूर्ण भारतातील रंगभूमीवरील काही कलाकारांच्या जीवनाचे व त्यांच्या कार्याचे वर्णन लेखन करतो. | |
| 06AE36 | स्थानिक परिसरातील लोककलाकारांची माहिती मिळवून त्याचे वर्णन व लेखन करतो. |
| **विषय : संगीत** | |
| **अभ्यासक्रम ध्येय : CG – 1 :** विविध कला प्रकारातून स्वतःचे अन्वेषण करण्यासाठी आणि मुक्तपणे अभिव्यक्त होण्यासाठी विकसित करावे. | |
| **क्षमता : C – 1.1 :** विविध संगीतकृतीद्‌वारे त्यांचे वैयक्तिक आणि दैनंदिन जीवनातील अनुभव आत्मविश्वासाने व्यक्त करतो. | |
| 06AE37 | विविध गीत प्रकारांमधील लय ओळखतो. |
| **क्षमता : C – 1.2 :** सामूहिकपणे संगीत पद्‌धती विकसित करण्याच्या प्रक्रिये लवचीकपणा दर्शवितो. | |
| 06AE38 | समूहगीत प्रकारात सहभागी होऊन जातो. |
| **अभ्यासक्रम ध्येय : CG – 2 :** कलेच्या माध्यमातून पर्यायी कल्पना शोधण्यासाठी सर्जनशीलतेचा व कल्पकतेचा वापर करणे. | |
| **क्षमता : C – 2.1 :** गाणी आणि संगीत रचना तयार करून सादर करतो की जी त्यांच्या सभोवतालच्या साचेबंद वातावरणाला आव्हान देते. (जसे – लिंग भूमिका.) | |
| 06AE39 | युगल गीतांची निवड करून सादरीकरण करतो |
| **क्षमता : C – 2.2 :** वैयक्तिक अनुभव, भावना आणि कल्पनेसह घटकांना जोडतो, जसे– गीते, राग, ताल, ध्वनी, लय आणि आकृतीबंध. | |
| 06AE40 | हार्मोनियमवर वाजवलेले स्वर व स्वरांतील फरक ओळखतो. |
| 06AE41 | तबल्यावरील बोल ऐकून ताल ओळखतो. |
| 06AE42 | विविध गीत प्रकारांमधील राग, लय, ताल, आकृतिबंध या सांगितीक घटकांचे विश्लेषण करतो. |
| **अभ्यासक्रम ध्येय : CG – 3 :** कलेचे घटक, प्रक्रिया आणि तंत्र समजून घेणे व उपयोगात आणणे. | |
| **क्षमता : C – 3.1 :** रंगमंच शिष्टाचार आणि वाद्यांची काळजी दर्शवून संगीतातील संसाधने आणि तंत्रे वापरताना माहितीपूर्ण निवड करतो. | |
| 06AE43 | रंगमंच शिष्टाचाराची माहिती सांगतो. |
| 06AE44 | विविध वाद्यांची काळजी घेण्याच्या पद्‌धतीविषयी माहिती सांगतो. |
| **क्षमता : C – 3.2 :** नियोजनाच्या टप्प्यापासून ते सादरीकरणाच्या अंतिम टप्प्यापर्यंत कल्पना आणि संगीत अभिव्यक्तीच्या पद्‌धती दर्जेदार करतो आणि संपूर्ण प्रक्रियेचे पुनरावलोकन करतो. | |
| 06AE45 | सादरीकरणासाठी आवश्यक घटकांची माहिती स्पष्ट करतो. |

| | |
|---|---|
| 06AE46 | भूप रागाची माहिती सांगून छोटा ख्याल गातो. |
| **अभ्यासक्रम ध्येय : CG – 4 :** प्रादेशिक कला आणि सांस्कृतिक परंपरांमधील सौंदर्यविषयक संवेदनशीलतेच्या विस्ताराशी स्वतःला परिचित करावे. | |
| **क्षमता : C – 4.1 :** संगीताच्या विविध स्थानिक आणि प्रादेशिक प्रकारांची ओळख करून देतो. | |
| 06AE47 | स्थानिक लोकसंगीताची माहिती संकलित करतो. |
| 06AE48 | स्थानिक लोकसंगीतामधील वाद्यांची माहिती संकलित करतो. |
| **क्षमता : C – 4.2 :** त्यांच्या प्रदेशातील व भारतातील काही संगीत कलाकारांच्या जीवनाचे आणि कार्याचे वर्णन करतो. | |
| 06AE49 | स्थानिक कलाकारांच्या जीवन कार्याचा परिचय करून घेतो. |
| 06AE50 | स्थानिक कलाकारांच्या गायन व वादन शैलीची माहिती संकलित करतो. |
| **विषय : नृत्य व हालचाल** | |
| **अभ्यासक्रम ध्येय : CG – 1 :** विविध कला प्रकारातून स्वतःचे अन्वेषण करण्यासाठी आणि मुक्तपणे अभिव्यक्त होण्यासाठी विकसित करणे. | |
| **क्षमता : C – 1.1 :** विविध प्रकारचे नृत्य आणि हालचालींद्द्वारे त्यांचे वैयक्तिक आणि दैनंदिन जीवनातील अनुभव आत्मविश्वासाने व्यक्त करतो. | |
| 06AE51 | विविध शास्त्रीय नृत्यांची माहिती देतो व त्यातील विविधता सांगून फरक स्पष्ट करतो |
| 06AE52 | विविध नृत्य प्रकार समजून त्यातील एका विशिष्ट शास्त्रीय नृत्याच्या हालचाली सहजतेने करतो. |
| **क्षमता : C – 1.2 :** नृत्य आणि हालचाल, सराव सहयोग आणि विकसित करण्याच्या प्रक्रियेत लवचीकपणा दर्शवितो. | |
| 06AE53 | निवडलेल्या विशिष्ट शास्त्रीय नृत्यशैलीतून प्राथमिक स्तराचे सादरीकरण करतो. |
| **अभ्यासक्रम ध्येय : CG – 2 :** कलेच्या माध्यमातून पर्यायी कल्पना शोधण्यासाठी सर्जनशीलतेचा व कल्पकतेचा वापर करणे. | |
| **क्षमता : C – 2.1 :** नृत्य आणि हालचालींचे क्रम सादर करताना त्यांच्या सभोवतालच्या वातावरणातील साचेबद्धतेला आव्हान देतो. (जसे- लिंग भूमिका) | |
| 06AE54 | शास्त्रीय नृत्याच्या माध्यमातून सादर केल्या जाणाऱ्या विविध पात्रांच्या अभिनयाचे आणि लयबद्ध हालचालींचे सादरीकरण करतो. |
| **क्षमता : C – 2.2 :** नृत्य आणि हालचाल( मुद्रा, हावभाव, अभिनय इत्यादी) या घटकांना वैयक्तिक अनुभव, भावना आणि कल्पनेची जोड देतो. | |
| 06AE55 | शास्त्रीय नृत्यात वापरल्या जाणाऱ्या असंयुक्त हस्तमुद्रांची(एका हाताने केल्या जाणाऱ्या मुद्रांची) नावे सांगून त्यांचे प्रयोग करून दाखवतो. |
| 06AE56 | शास्त्रीय नृत्यातील असंयुक्त हस्तमुद्रांचा भावपूर्ण प्रयोग करून दाखवतो. |
| 06AE57 | शास्त्रातील अभिनयाच्या चार प्रकारांची सविस्तर माहिती सांगतो. |
| **अभ्यासक्रम ध्येय : CG – 3 :** कलेचे घटक, प्रक्रिया आणि तंत्र समजून घेणे व उपयोगात आणणे. | |
| **क्षमता : C – 3.1 :** रंगभूमी शिष्टाचार आणि रंगभूमीवरील उपकरणांची काळजी दर्शवतो. नृत्य आणि हालचाल तंत्र वापरताना रंगभूमीवरील चीज वस्तू आणि पोशाख यांची माहितीपूर्ण निवड करतो | |
| 06AE58 | नृत्यासाठी वापरल्या जाणाऱ्या रंगभूमीवरील शिष्टाचाराची माहिती घेऊन त्याचा प्रयोगात वापर करतो. |
| 06AE59 | रंगभूमीवरील नृत्य सादरीकरणासाठी लागणाऱ्या उपकरणांची माहिती सांगतो. |
| **क्षमता : C – 3.2 :** नियोजनाच्या टप्प्यापासून ते अंतिम सादरीकरणापर्यंत नृत्य आणि हालचालींमध्ये वापरल्या जाणाऱ्या कल्पना आणि अभिव्यक्तीच्या पद्धतीची पुनर्रचना करतो आणि संपूर्ण प्रक्रियेचा आढावा घेतो | |
| 06AE60 | सादरीकरणाच्या प्रक्रियेतील विविध टप्प्यांचे नियोजन करतो. |
| 06AE61 | विविध घटकांच्या आधारे केलेल्या नियोजनाचे सादरीकरण करतो. |
| **अभ्यासक्रम ध्येय : CG – 4 :** प्रादेशिक कला आणि सांस्कृतिक परंपरांमधील सौंदर्यविषयक संवेदनशीलतेच्या विषयाशी स्वतःला परिचित करणे. | |
| **क्षमता : C – 4.1 :** नृत्य आणि हालचालीमध्ये विविध स्थानिक आणि प्रादेशिक स्वरूपांची ओळख करून देतो. | |
| 06AE62 | स्थानिक परिसरातील नृत्य आणि हालचाल या विषयावर माहिती घेऊन त्यावर अहवाल सादरीकरण करतो. |
| **क्षमता : C – 4.2 :** त्यांच्या प्रदेशातील व भारतातील काही नर्तकांच्या जीवनाचे व त्यांच्या कार्याचे वर्णन करतो. | |
| 06AE63 | स्थानिक प्रदेशातील काही नर्तकांचे व त्यांच्या कार्याचे वर्णन करतो |

**सूचना :** विशेष गरजा असणाऱ्या विद्यार्थ्यांबाबत अध्ययन-अध्यापन प्रक्रिया करताना सांकेतिक खुणांच्या भाषेचा (साईन लँग्वेज) तसेच अन्य पूरक अध्यापन पद्धतींचा वापर करावा. विशेष गरजा असणाऱ्या विद्यार्थ्यांना ज्या पद्धतीने शक्य असेल, त्या पद्धतीने व्यक्त होण्याची संधी द्यावी.

# अनुक्रमणिका


| अ. क्र | घटक | पृष्ठ |
| --- | --- | --- |
| | दृश्यकला | |
| १. | रेषा, आकार आणि सौंदर्य | ०१ |
| २. | स्मरण चित्र व कल्पना चित्र | ०७ |
| ३. | संकल्पाचे अंतरंग | १२ |
| ४. | माझी अक्षरे | २३ |
| ५. | त्रिमित सृजन | २८ |
| ६. | परिसरातील दृश्यकला | ३४ |
| | रंगमंच | |
| ७. | चला पाहू /व्यक्त होऊ | ४१ |
| ८. | छटा अभिनयाच्या | ४५ |
| ९. | चला रंगमंचावर | ५० |
| १०. | परंपरा नाट्याची | ५७ |
| | संगीत | |
| ११. | लय व तालाची ओळख | ६२ |
| १२. | युगुलगीत व समूहगीत | ६८ |
| १३. | चला शिकू या शास्त्रीय संगीत | ७१ |
| १४. | स्थानिक लोकसंगीताचा परिचय | ८२ |
| | नृत्य व हालचाल | |
| १५. | आपली शास्त्रीय नृत्यशैली | ८७ |
| १६. | नृत्य आणि अभिव्यक्ती | ९२ |
| १७. | नृत्य सादरीकरणाचे विविध पैलू | ९९ |
| १८. | स्थनिक नृत्यशैली व नर्तक | १०३ |


दृश्यकला

# १ रेषा, आकार आणि सौंदर्य

रेषा हे चित्रकलेतील सर्वात मूलभूत आणि प्रभावी माध्यम आहे. कोणतेही चित्र रेखाटताना त्याची सुरुवात रेषेपासूनच होते. आपल्या सभोवतालची झाडे, डोंगर, नद्या, घरे किंवा विविध वस्तूंचे बारकाईने निरीक्षण केल्यास, त्यामध्ये दडलेल्या विविध प्रकारच्या रेषा आणि आकार आपल्याला स्पष्टपणे दिसतात.

यांत्रिक साधनांचा वापर न करता केवळ हाताने मुक्त रेखाटन केल्यास, आपली निरीक्षण क्षमता आणि रेखाटन कौशल्य विकसित होण्यास मदत होते. उभी, सरळ, आडवी, तिरपी, लयदार, वलयाकृती, गुंतवळ्याची, उत्सर्जक अशा विविध प्रकारच्या रेषांतून विविध आकार तयार होतात आणि त्यातून विविध भाव-भावनाही व्यक्त होतात. चला तर मग, आपण काही रेषांचे प्रकार पाहू.

### रेषांचे प्रकार व त्यांचे प्रतीकात्मक अर्थ :

- **लयदार रेषा (Rhythmic Line) :**



पाण्यातील लाटांप्रमाणे वळणे घेणारी रेषा म्हणजे **लयदार रेषा** होय. या रेषेतून लय, गतीची प्रचिती येते.

उदा. पाण्यावरील लाटा, घाटातील रस्ता, वाऱ्यावर डुलणारे पीक, वेलींचे आकार इत्यादी.

- **वलयाकृती रेषा (Spiral Line) :**



एका बिंदूपासून सुरू होऊन गोलाकार वळणे घेत जाणारी रेषा म्हणजे **वलयाकृती रेषा** होय. या रेषेतून एकाग्रता, प्रगती आणि विकास दर्शवतात.

उदा. शंख, गोगलगायीचे घर, चकली इत्यादी.

- **छेदक रेषा (Intersecting Lines) :**



एकमेकींना छेदणाऱ्या रेषा म्हणजे **छेदक रेषा** होय. उदा. फरशी, आलेख कागद, बुद्धिबळ पट, खिडकीची जाळी, एकमेकांना छेदणारे रस्ते याठिकाणी आपल्याला छेदक रेषा जाणवतात. या रेषेतून गोंधळ, संघर्ष यांसारखे भाव जाणवतात.

- **गुंतावळ्याची रेषा (Tangled/Confused Line) :**



एकमेकांत वळणे घेत, गुंतत किंवा जाळीसारखी दिसणारी रेषा म्हणजे **गुंतावळ्याची रेषा** होय. या रेषेतून गुंतागुंत, गोंधळ या भावनांचे दर्शन होते.

उदा. गुंतलेला दोरा, पक्ष्यांचे घरटे इत्यादी.

- **उत्सर्जक रेषा ( Radiating Line) :**
  एका केंद्रबिंदूमधून विविध बाजूंनी पसरत जाणाऱ्या रेषांना **उत्सर्जक रेषा** म्हणतात. उदा. फुलांच्या पाकळ्यांचा विस्तार, सूर्याची किरणे इत्यादी. या रेषेतून उर्जा, शक्ती, वाढ यांसारख्या संकल्पनांचे दर्शन घडते.



- **चला रेषेतून आकार घडवू या !**

**खालील रेषांचा वापर करून तुमच्या परिचित वस्तूचे रेखाटन दिलेल्या रिकाम्या चौकोनात करा.**

| रेषेचा प्रकार | तयार होणारे आकारांचे नमुने | माझी कृती |
|---|---|---|
| लयदार रेषा |   | |
| वलयाकृती रेषा |   | |
| छेदक रेषा |   | |
| गुंतावळ्याची रेषा |   | |
| उत्सर्जक रेषा |   | |

- पट्टी किंवा इतर यांत्रिक साधनांचा वापर न करता मुक्तहस्त रेखाटनाचा सराव करण्यास सांगावे.
- लयदार, छेदक, वलयाकृती, उत्सर्जक रेषांचा सराव करून घ्यावा. सरावासाठी विविध माध्यमांचा वापर करून घ्यावा. उदा. रंगीत पेन्सिल, स्केचपेन, रंगीत खडू इत्यादी.

CG - 1
C-1.1
LO-06AE01

- **आकार ते वस्तू (Shape to Object) :**

खालील भौमितिक आकारांचा वापर करून तुमच्या परिचित वस्तूंचे रेखाटन करा व रंगवा.

| | | |
|---|---|---|
|  |  | |
|  |  | |
|  |  | |

- **शोध घेऊ या :**

**आकारांना सोपे करून दाखवणारा चष्मा –**



आपल्या आसपासच्या अनेक वस्तूंमध्ये चौकोन, वर्तुळ, त्रिकोण यांसारखे भौमितिक आकार दडलेले असतात. या दडलेल्या आकारांचा शोध घेतल्यास वस्तूंचे रेखाटन करणे अधिक सोपे होते.

कल्पना करा की, तुम्ही असा एक जादूचा चष्मा घातला आहे, ज्यामधून पाहिल्यावर तुम्हाला वस्तूंचे फक्त भौमितिक आकारच दिसतात.

- विद्यार्थ्यांना सुरुवातीला सोप्या आणि परिचित वस्तूंचे निरीक्षण करून रेखाटन करण्यास प्रोत्साहित करावे.
- विद्यार्थ्यांच्या प्रयत्नांचे कौतुक करून त्यांचा आत्मविश्वास वाढवावा.

CG – 1
C–1.1
LO–06AE02

- **चला तर मग, हा प्रयोग करून पाहू या !**

१) तुम्ही ज्या ठिकाणी बसलेले आहात, तिथून आजूबाजूच्या विविध वस्तूंचे बारकाईने निरीक्षण करावे. उदा. खिडकी, बाटली, कपाट, डबा इत्यादी.

२) त्या वस्तूंमध्ये नेमका कोणता भौमितिक आकार दडलेला आहे हे ओळखा.

३ ) तुम्ही ओळखलेल्या त्या मूळ आकाराचे तुमच्या वहीत रेखाटन करा आणि सराव करा. उदा. कपाटासाठी-उभा आयत / चेंडूसाठी-वर्तूळ / कंपास पेटीसाठी-आडवा आयत/विदूषकाच्या टोपीसाठी - त्रिकोण इत्यादी.

- **आकारातून सौंदर्य :**

आतापर्यंत आपण रेषांचे विविध प्रकार व रेषांच्या सरावातून नवनवीन आकार तयार करण्याचा अनुभव घेतला आहे. आता आपण आपल्या सभोवतालच्या दोन किंवा अधिक वस्तूंच्या मांडणीतील परस्पर संबंधाचे निरीक्षण करून रेखाटण्याचा सराव करणार आहोत.





- **वस्तूचित्र (Object Drawing) :**

समोर ठेवलेल्या एखाद्या वस्तूचे हुबेहूब चित्रण म्हणजे **वस्तूचित्र** होय. यापूर्वी वस्तूचित्र रेखाटनाचा आपण अनुभव घेतला आहे. उदा. कप, पुस्तक, फळ इत्यादी.

- **स्थिरचित्र (Still Life) :**

निवडक वस्तूंची कलात्मक मांडणी करून, त्या वस्तूसमूहाचे पार्श्वभूमीसह केलेले सौंदर्यपूर्ण चित्रण म्हणजे **स्थिरचित्र** होय. उदा. टेबलावर ठेवलेली प्लेट, फळे, कप, पुस्तक इत्यादींचा एकत्रित समूह.



- **वस्तूंच्या आकारमानाचे निरीक्षण व चित्रण :**
  कोणत्याही वस्तूचे रेखाटन करण्यापूर्वी त्या वस्तूचे नीट निरीक्षण करणे अत्यंत महत्त्वाचे असते. आपल्या अवतीभोवती उपलब्ध असलेल्या विविध वस्तूंचा आकार, त्यातील लहान-मोठेपणा आणि रंगसंगती इत्यादींचा बारकाईने अभ्यास केल्यास रेखाटन करणे सोपे जाते.
- **शीघ्र रेखाटन :**
  एखादी वस्तू, प्रसंग किंवा दृश्याचे जलद गतीने आणि मोजक्या रेषांमध्ये केलेले रेखाटन म्हणजे '**शीघ्र रेखाटन**' होय. यामध्ये अनावश्यक बारकाव्यांकडे फार लक्ष न देता वस्तूचा मूळ आकार, प्रमाणबद्धता आणि त्यातील हालचालींच्या रेखाटनावर मुख्य भर दिला जातो. नियमित सरावामुळे निरीक्षणशक्ती वाढते आणि आत्मविश्वासपूर्वक रेखाटन करण्याचे कौशल्य विकसित होते.









- **वस्तूसमूहाची मांडणी :**
  स्थिरचित्र काढण्यासाठी वेगवेगळ्या आकारातील वस्तूंच्या समूहाची मांडणी करावी. वस्तूंचे एकमेकांशी प्रमाण, रंग व छाया-प्रकाशाचे निरीक्षण करावे.



- **प्राथमिक रेखाटन (Rough Sketch) :**
  सर्व वस्तू कागदाच्या मध्यभागी व मोठ्या आकारात दिसतील आणि त्यांचे भौमितिक आकार समजतील असे शीघ्र रेखाटन करावे.



- **आकार निश्चिती व तपशील (Refining) :**
  रेखाटन झाल्यानंतर प्रत्येक वस्तूचा मूळ आकार अधिक स्पष्ट करावा. अनावश्यक रेषा खोडून टाकाव्यात.



- **रंगकाम व छाया– प्रकाश ( Coloring & Shading) :**
  प्रकाशाच्या बाजूला फिकट रंग आणि सावलीच्या बाजूला गडद रंगछटांचा वापर करून सोप्या पद्‌धतीने रंगकाम करावे.

## स्वाध्याय

- यांत्रिक साधनांशिवाय रेषा रेखाटताना तुम्हाला आलेला अनुभव थोडक्यात विशद करा.
- आपल्या सभोवतालच्या घटकांमध्ये तुम्हाला कोणकोणत्या प्रकारच्या रेषा आढळतात ते उदाहरणासह लिहा.
- स्थिरचित्रण करताना कोणकोणत्या बाबींचे निरीक्षण करावे ते स्पष्ट करा.
- तुमच्यासमोर मांडलेल्या वस्तूंच्या समूहाचे बारकाईने निरीक्षण करा. उदा.बादली, तांब्या, फळ इत्यादी. कोणत्याही यांत्रिक साधनांशिवाय त्याचे सोप्या पद्‌धतीने शीघ्र रेखाटन करा.
- समोर मांडलेल्या कोणत्याही तीन वस्तूंच्या समूहाचे प्रमाण, तसेच छाया–प्रकाश आणि योग्य रंगछटांचा वापर करून सुबक स्थिरचित्र रेखाटन करा व रंगवा.

- विद्यार्थ्यांनी चित्र हुबेहूब काढावे असा आग्रह धरू नये.
- तोंडी चर्चा व शीघ्र रेखाटनातून वस्तूचित्र व स्थिरचित्र यातील फरक स्पष्ट करावा.
- निरीक्षणाच्या निकषावर आधारित तोंडी प्रश्न विचारावे.
- वस्तूंचे आकार व आकारमानातील फरकानुसार योग्य रेखाटन करून घ्यावे.

CG – 2
C–2.2
LO–06AE10,11

# २ स्मरण चित्र व कल्पना चित्र

- **स्मरण चित्र (Memory Drawing) :**

आपल्या दैनंदिन जीवनात आपण अनेक प्रसंग, खेळ, सण- उत्सव आणि निसर्गातील बदल अनुभवत असतो. त्यातील काही क्षण किंवा प्रसंग आपल्या मनावर कायमचे कोरले जातात. या साठवलेल्या आठवणींना रेषा, आकार आणि रंगांच्या माध्यमातून कागदावर उतरवणे म्हणजे **स्मरणचित्र** होय. आपण पाहिलेल्या घटना, प्रसंग आठवून त्यांची मांडणी आणि परस्परसंबंध समजून घेतल्यास चित्र अधिक जिवंत आणि प्रभावी होते.




- **करून पाहू या :**

तुम्ही पाहिलेला कोणताही एक प्रसंग आठवा. जसे की शाळेतील मित्रांसोबत खेळलेला खेळ, वाढदिवस, सण-उत्सव किंवा सहलीचा प्रसंग. त्या प्रसंगात कोणकोणत्या व्यक्ती होत्या, परिसर कसा होता, कोणत्या वस्तू दिसत होत्या याचा विचार करा. त्यानंतर कागदावर त्या प्रसंगाची रूपरेषा हलक्या रेषांनी काढा. मानवाकृती पुरेशा मोठ्या रेखाटून पार्श्वभूमी रेखाटा. सर्व घटक एकमेकांच्या तुलनेत योग्य आकारात असावेत. उदा. हत्तीच्या तुलनेत माणूस केवढा दिसेल. चित्रात हालचाली, भाव आणि अनुरूप पार्श्वभूमी रेखाटण्याचा प्रयत्न करावा. योग्य रंगांचा वापर करून चित्र पूर्ण करावे.

• **स्मरण चित्र काढण्यासाठी पुढीलप्रमाणे टप्पेनिहाय कृती करता येईल.**



कृती– १



कृती– २



कृती– ३




कृती– ४

- विविध छोटे प्रसंग/दृश्य/घटना/खेळ आठवून स्मरणाने चित्र काढून घ्यावे.
- निसर्गनिर्मित/मानवनिर्मित विविध घटकांचे स्मरणचित्र काढण्यास प्रोत्साहन द्यावे. काढलेल्या चित्रांवर चर्चा करावी.

CG –1, 2
C– 1.1, 2.1
LO–06AE03 ,06

- **कल्पना चित्र :**

आपल्या मनातील कल्पना कागदावर चित्ररूपात साकारणे म्हणजे **कल्पनाचित्र** होय.

कल्पना चित्रासाठी प्रत्यक्ष अनुभवाची अट नसते; तेथे मुक्त विचार आणि नवनिर्मितीला वाव असतो. यामध्ये आकार, रंग आणि रचनेच्या बाबतीत प्रयोग करण्याची मोठी संधी मिळते. उदा. भविष्यातील शहर, परी कथेतील जग, चंद्रावरचे माझे घर, माझे स्वप्न इत्यादी.







- **लक्षात ठेवा :**

स्मरण चित्र आपल्या भूतकाळातील अनुभव पुन्हा जगण्यास मदत करते, तर कल्पनाचित्र भविष्यातील कल्पकतेचा शोध घेण्यास आणि स्वतंत्रपणे विचार करण्यास प्रवृत्त करते.

- **सामाजिक जनजागृती चित्रण :**

समाज ही आपली मोठी ओळख आहे. समाजात अनेक चांगल्या सवयी, मानवी मूल्ये आणि महत्वाचे संदेश लोकांपर्यंत पोहोचवण्यासाठी कलेचा वापर करून केलेले चित्रण यालाच **सामाजिक जनजागृती चित्रण** असे म्हणतात. केवळ शब्दांपेक्षा चित्रांचा प्रभाव अधिक खोलवर पडतो. जेव्हा आपण रस्ता सुरक्षा, निसर्ग संवर्धन, स्वच्छता, पाणी वाचवा किंवा शिक्षणाचे महत्व यांसारख्या विषयांवर आपल्या कल्पनाशक्तीने चित्र रेखाटतो, तेव्हा ते चित्र पाहणाऱ्याला विचार करायला प्रवृत्त करते. अशा चित्रणात योग्य संदेश मांडण्याची पद्धत अधिक महत्वाची असते.



- **ओळखा पाहू !**

  बाजूच्या कल्पनाचित्रामध्ये विविध प्राणी व पक्ष्यांचे अवयव एकत्र केलेले आहेत. ते कोणकोणत्या प्राण्या/पक्ष्यांचे आहेत ते ओळखा व मित्रांसोबत चर्चा करा.



- **फ्लिप बुक ड्रॉइंग(Flip Book Drawing) : (हालचाल करणारे चित्रपुस्तक)**

  फ्लिप बुक म्हणजे लहान-लहान चित्रांची मालिका, जी जलद गतीने पाने उलटली की चित्रे हलताना दिसतात. ही ॲनिमेशनची सुरुवातीची आणि सोपी पद्धत आहे. या कृतीतून आपल्याला हालचाल, निरीक्षण आणि सर्जनशीलता यांचा अनुभव घेता येतो.





**करून पाहू या :**

१) कागदाचे समान आकाराचे १२ तुकडे घ्या.
२) सर्व कागदांना क्रमाने लावून पुस्तकाप्रमाणे एका बाजूने स्टेपल करावे.
३) तयार झालेल्या पुस्तकाच्या पहिल्या पानावर मधोमध ग्लासचा एक मोठा आकार काढावा.
५) अनुरेखन (ट्रेसिंग) तंत्राचा वापर करून उर्वरित प्रत्येक पानावर मधोमध ग्लासचा आकार काढावा.
६) पहिल्या पानावर ग्लासच्या तळाला थोडी वर एक आडवी रेषा काढा. त्या रेषेपर्यंत नारिंगी रंग भरावा.
७) याप्रमाणे उर्वरित एक-एक रेषा वाढवत ग्लासच्या वरील भागापर्यंत रेखाटन करून प्रत्येक पट्टीपर्यंत आकृतीत दाखवल्याप्रमाणे नारिंगी रंग भरावा.

**झालं तुमचं 'ज्यूस ग्लास' फ्लिप बुक तयार**

(फ्लिप बुक संबंधी अधिक माहितीसाठी प्रथम पृष्ठावरील क्यू. आर्. कोड स्कॅन करावा.)

- **तुम्हांला माहीत आहे का? :**

फ्लिप बुक ही ॲनिमेशनची सुरुवातीची पद्धत मानली जाते. याच तत्त्वावर पुढे जसे, की जुन्या काळातील कार्टून चित्रपटांमध्ये हजारो चित्रांचा चलचित्रे व कार्टून फिल्म तयार करण्यासाठी वापर केला जात असे.

- **चर्चा करू या :**
  - चित्रात पार्श्वभूमी आवश्यक का आहे, चर्चा करा.
  - चित्रात जी हालचाल/ गती दिसते त्यासाठी कोणते वैज्ञानिक तत्त्व कारणीभूत आहे यावर चर्चा करा.
  - चित्राद्वारे सामाजिक संदेश अधिक प्रभावी कसा देता येईल यावर चर्चा करा.
  - चित्रांचे प्रदर्शन मांडावे व प्रत्येक चित्रातील वेगळेपणावर चर्चा करावी.

## स्वाध्याय

१) सण, उत्सव किंवा माझा आवडता खेळ यांपैकी कोणत्याही एका विषयावर स्मरण चित्राचे रेखाटन करा व रंगवा.

२) तुमच्या कल्पनेने कोणतेही एक कल्पना चित्र काढा व त्याचे वर्णन करा.

३) कोणत्याही एका विषयावर सामाजिक प्रबोधनात्मक चित्र तयार करा व त्याला अनुरूप घोषवाक्य चित्राखाली लिहा.

४) तुमच्या आवडीप्रमाणे १२ ते १६ चित्रांचे एक फ्लिपबुक तयार करा.

५) तुमच्या परिसरातील निसर्गनिर्मित व मानवनिर्मित वस्तूंचे निरीक्षण करून त्यांचे रेखाटन करा.

- स्मरण चित्र व कल्पना चित्र रेखाटन करून घ्यावे.
- अनुरेखन (ट्रेसिंग) हे तंत्र वापरून एक आकार पुन्हा पुन्हा कसा काढा याचे प्रात्यक्षिक दाखवावे.
- सामाजिक जनजागृती करण्यासाठी प्रबोधनात्मक चित्र काढण्यास प्रवृत्त करावे.

CG – 2
C–2.1
LO–06AE07, 08

# ३ संकल्पाचे अंतरंग

दैनंदिन जीवनात आपण अनेक वस्तूंचा वापर करतो. त्या निवडताना आपण त्यांचा आकार, रंग आणि त्यावरील नक्षीकाम यांचा विचार करतो. रेषा, आकार, रंग यांची सुयोग्य मांडणी करून ती वस्तू अधिक सुंदर व आकर्षक दिसावी म्हणून केलेले सौंदर्यपूर्ण चित्रण म्हणजे '**संकल्पचित्र**' होय.

आपल्या आजूबाजूला आपण वस्तू, झाडे, फुले, प्राणी, माणसे असे अनेक घटक पाहतो. त्या घटकांचे बारकाईने निरीक्षण केल्यास रेषेच्या दोन्ही बाजूंनी एकसारखे म्हणजे **समअंगी** दिसतात तर काही घटक एका बाजूला वेगळे आणि दुसऱ्या बाजूला वेगळे म्हणजे **विषमअंगी** दिसतात. चला तर मग चित्रातील घटकांची समअंगी आणि विषमअंगी रचना समजून घेऊ या.

- **समअंगी रचना :**

चित्राच्या मध्यभागी एक सरळ उभी रेषा काढली तर चित्रांचे दोन समान भाग होतात याला '**समअंगी रचना**' म्हणतात. थोडक्यात दोन्ही बाजू समान म्हणजे **समअंगी रचना** होय. उदा. प्रवेशद्वार, फुलपाखरू, चेहरा इत्यादी.





- **विषमअंगी रचना:**

ज्या चित्राचे किंवा आकाराचे मधून दोन समान भाग करता येत नाहीत, अशा रचनेला '**विषमअंगी रचना**' म्हणतात. (उदा. पक्षी, ढगांचे आकार, झाडांच्या फांद्या.)





## ओळखा पाहू :

खालील चित्रांच्या मध्यभागी एक उभी सरळ रेषा काढून चित्र समअंगी किंवा विषमअंगी आहे ते ओळखा व चित्राखाली लिहा.




................  ................  .............  .............  .............  .............

- **करून पाहू या!**

  १) तुमच्या सभोवती दिसणाऱ्या समअंगी आणि विषमअंगी घटकांची नावे लिहा.

  २) वहीत दोन चौरस काढा. एका चौरसात भौमितिक आकार वापरून समअंगी रचना व दुसऱ्या चौरसात विषमअंगी रचनेचे संकल्प चित्र काढून रंगवा.

- **रंग व रंगश्रेणी :**

निसर्गात रंगांची सुंदर उधळण दिसून येते. आकाशाचा निळसर रंग, झाडांची हिरवळ, फुलांचे विविधरंगी सौंदर्य आणि इंद्रधनुष्याच्या सप्तरंगी छटा मनाला मोहून टाकतात. या छटा आपल्या मनात आनंद, उत्साह आणि प्रसन्नता निर्माण करतात. चित्रात जेव्हा रंग भरले जातात तेव्हा ते चित्र अधिक जिवंत, प्रभावी आणि आकर्षक दिसते व त्यांची स्वतंत्र ओळख निर्माण होते. म्हणूनच आपल्या दैनंदिन जीवनात आणि चित्रकलेत रंगांना अनन्यसाधारण महत्त्व आहे. रंगांची ओळख आणि **रंगश्रेण्यांचा** अभ्यास करूया !

काही रंग हे **मूळ** स्वरूपाचे आहेत. तर काही वेगवेगळ्या रंगांच्या मिश्रणातून तयार झालेले आहेत. त्याविषयी आपण माहिती करून घेऊ या.

## प्रथम श्रेणीचे रंग (Primary Colours) :

जे रंग इतर कोणत्याही रंगांच्या मिश्रणातून तयार होत नाहीत, त्यांना '**मूळ रंग**' किंवा '**प्रथम श्रेणीचे रंग**' म्हणतात. उदा. तांबडा, पिवळा, निळा.



**तांबडा** **पिवळा** **निळा**

- आजूबाजूच्या वस्तूंचे समअंगी व विषमअंगी असे वर्गीकरण करून दोन्हीतील फरक समजावून सांगावा.
- विद्यार्थ्यांच्या कृतीस सकारात्मक प्रतिसाद द्यावा.
- केवळ चित्रातील सौंदर्यावर भर न देता रचनेतील समतोल, विषमतोल यांना प्राधान्य द्यावे.

CG -2
C-2.2
LO-06AE09

## द्‌वितीय श्रेणीचे रंग (Secondary Colours) :

प्रथम श्रेणीचे कोणतेही दोन रंग समप्रमाणात एकत्र मिसळल्यास तयार होणाऱ्या रंगास **दुय्यम रंग** किंवा **द्‌वितीय श्रेणीचा रंग** असे म्हणतात. नारिंगी, हिरवा व जांभळा हे द्‌वितीय श्रेणीचे रंग आहेत.



तांबडा + पिवळा = नारिंगी



पिवळा + निळा = हिरवा



निळा + तांबडा = जांभळा

- **तुम्हाला माहित आहे का?**

  निसर्गातील विविध घटकांपासून 'नैसर्गिक'रंग तयार करता येतात. हे रंग सुरक्षित व पर्यावरणपूरक असतात. परिसरात उपलब्ध असलेले विविध नैसर्गिक घटक उदा. पाने, फुले, हळद, बीट, माती, गेरू इत्यादींपासून नैसर्गिक रंग तयार करता येतात.




- **करून पाहूया :**

  कागदावर समान आकाराचे दोन चौकोन रेखाटून त्यामध्ये तुमच्या आवडीचे भौमितिक आकार व रेषा यांच्या सहाय्याने वैशिष्ट्यपूर्ण रचना तयार करा. त्यामध्ये प्रथम व द्‌वितीय श्रेणींचे रंग व छटा वापरून रंगकाम करा.तुम्हांला आलेल्या अनुभवांवर चर्चा करा.

- **रंगछटा :**

  आपल्याला निसर्गात अनेक रंग दिसतात. त्यात एकाच रंगाच्या वेगवेगळ्या रंगछटा पाहायला मिळतात. उदा. झाडाच्या पानांमध्ये हिरव्या रंगाच्या अनेक छटा दिसतात. फिकट हिरवा, गडद हिरवा, पिवळसर हिरवा, हिरवट नारिंगी इत्यादी. एखाद्या रंगातील कमी-अधिक उजळ किंवा गडद असे दिसणारे रंग म्हणजे **रंगछटा** होय.



- विद्यार्थ्यांना प्रथम श्रेणीचे आणि द्‌वितीय श्रेणींचे रंग समजावून सांगावेत.
- द्‌वितीय श्रेणींचे रंग करण्याचा अनुभव द्यावा.
- निसर्गात विविध रंग छटा असतात त्याचे निरीक्षण करण्यास सांगावे.

CG – 3
C–3.1
LO–06AE12

कोणत्याही रंगात पांढरा किंवा काळा रंग कमी-अधिक प्रमाणात मिसळल्याने त्या रंगांच्या विविध **छटा** तयार करता येतात.

(सोबत दिलेल्या चित्रातील रंगछटांचे निरीक्षण करा.)




- **करून पाहू या :**

१) कागदावर खालीलप्रमाणे चौकोन काढा. त्यातील मधल्या चौकोनात आपल्या आवडीचा कोणताही एक रंग भरा.

२) त्या रंगात थोडा पांढरा रंग मिसळा. रंगाची एक वेगळी छटा तयार होईल. त्यात पुन्हा थोडा पांढरा रंग वाढवत आणखी फिकट (उजळ) छटा तयार करा. अशा प्रकारे तीन ते चार फिकट छटा तयार करा. सर्व उजळ छटा मूळ रंगाच्या उजव्या बाजूकडील चौकोनात क्रमाने भरा.

३) त्यानंतर आपण निवडलेल्या रंगात किंचित काळा रंग मिसळा. तयार झालेली गडद छटा कागदावर मूळ रंगाच्या डावीकडील चौकोनात भरा. आवश्यकतेनुसार थोडा थोडा काळा रंग वाढवत तीन ते चार गडदछटा तयार करा. सर्व गडद छटा रंगाच्या डाव्या बाजूकडील चौकोनात क्रमाने भरा.

- **तुम्हांला माहीत आहे का ?**

रंग जसे आकर्षक दिसतात तसेच त्यांना अर्थही असतात. रंग पाहिल्यावर अनेक भावभावना आपल्या मनात निर्माण होतात.

**उदाहरणार्थ. -**

- तांबडा रंग : शौर्य
- पिवळा रंग : तेज
- जांभळा रंग : वैभव
- पांढरा रंग : पावित्र्य
- निळा रंग : शांतता
- हिरवा रंग : समृद्धी
- नारिंगी रंग : त्याग
- काळा रंग : भय

- परिसरातील विविध घटकांमध्ये कोणकोणते रंग व रंगछटा असतात यांविषयी मार्गदर्शन करावे.
- वेगवेगळ्या रंगछटा दाखवून त्यांची तुलना करण्यास सांगावी. निरीक्षण व अनुभव यांवर भर द्यावा.
- माझी गॅलरी या उपक्रमांतर्गत वर्गात 'रंगछटा भिंत' उपक्रम घ्यावा त्यासाठी प्रोत्साहन द्यावे.

CG - 3
C-3.1
LO-06AE12

- **संकल्पाची मूलतत्वे :**

कोणतेही चित्र अधिक सुंदर आणि आकर्षक दिसण्यासाठी काही महत्त्वाच्या बाबींचा विचार करावा लागतो. चित्रात एखादा आकार किंवा रंग पुन्हा-पुन्हा वापरणे, आकारांमध्ये लहान-मोठा बदल करणे, रंग व आकार योग्य प्रमाणात मांडणे, तसेच घटकांमध्ये संतुलन राखणे अशा गोष्टींमुळे चित्र प्रभावी आणि मनोवेधक दिसते. संकल्पचित्र आकर्षक होण्यासाठी चित्रात काही मूलभूत तत्त्वांचा वापर केला जातो. उदा. **पुनरावृत्ती, बदल, उत्सर्जन, प्रमाण, तोल, लय** ही संकल्पाची महत्त्वाची मूलतत्त्वे आहेत.

- **पुनरावृत्ती ( Repetition) :**

चित्रात एकसारखा आकार पुन्हा-पुन्हा काढणे याला '**पुनरावृत्ती**' म्हणतात. जेव्हा चित्रात एकसारखा आकार किंवा घटक वारंवार वापरला जातो तेव्हा चित्र अधिक सुंदर, नीटनेटके आणि आकर्षक दिसते.

उदा. फरशी, झाडाची पाने, कपड्यांवरील एकसारखी नक्षी.





- **बदल (Change) :**

परिसरातील झाडांच्या पानांचे निरीक्षण करावे. काही पाने मोठी असतात, तर काही लहान असतात. काही फिकट रंगाची तर काही गडद रंगाची असतात, म्हणजेच त्यांच्या आकारात व रंगात थोडा-थोडा बदल दिसतो त्यालाच '**बदल**' म्हणतात. हा बदल केल्यामुळे चित्र अधिक सुंदर व आकर्षक दिसते.



- **उत्सर्जन(Radiation) :**

सूर्याच्या मध्यापासून प्रकाशकिरणे सर्व दिशांना पसरतात. फुलांच्या पाकळ्या मध्यभागातून बाहेर पसरतात. सायकलच्या चाकाच्या मध्यभागातून तारा (स्पोक्स) बाहेर येतात. तसेच गवताची पानेही मुळापासून वरच्या दिशेने पसरलेली दिसतात. चित्रातील विविध घटक एका मध्यापासून बाहेरच्या दिशेने पसरतात तेव्हा त्या मांडणीला **उत्सर्जन** असे म्हणतात. उदा. नारळाच्या झापांच्या पाती, मोराचा पिसारा, कोळ्याचे जाळे, इत्यादी.







- **प्रमाण (Proportion) :**

चित्रातील विविध घटकांचा एकमेकांशी असलेला परस्पर संबंध म्हणजे **प्रमाण** होय. एखादा आकार दुसऱ्या आकाराच्या तुलनेत किती मोठा किंवा लहान असावा याचा योग्य अंदाज म्हणजे **प्रमाणबद्धता**. उदा. एक मोठे झाड व लहान झाड यांचे प्रमाण.





- **तोल (Balance) :**

तोल म्हणजे अनेक आकारांचे, त्यांच्या आकारमानांचे (क्षेत्रफळांचे) तसेच रंग व छटा यांचे एकमेकांशी असलेले नाते. निसर्गाचे सूक्ष्म निरीक्षण केल्यास असे लक्षात येते, की काही घटकांमध्ये समतोल तर काहींमध्ये विषमतोल रचना असते,परंतु प्रत्येक नैसर्गिक रचनेत एक सुप्त 'तोल' असतोच. निसर्गाप्रमाणे चित्रातही तोल असेल तर चित्र अधिक आकर्षक, संतुलित आणि प्रभावी दिसते.

उदा. मानवी चेहरा, फुलपाखरू ही समतोलाची उदाहरणे आहेत, तर झाडाचे खोड, फांदी ही विषम तोलाची उदाहरणे आहेत.



- **लय (Rhythm) :**

चित्रातील आकार, रेषा किंवा रंग यांची विशिष्ट क्रमाने आणि पुनरावृत्तीने केलेली मांडणी म्हणजे '**लय**' होय. उदा. कापडावरील नक्षीकाम, भिंतीवरील विटांची मांडणी, रांगोळीतील पुनरावृत्ती असलेली नक्षी, गव्हाची ओंबी, पाण्यावर उठणारे तरंग इत्यादींमधून 'लय' दिसते.









मूलतत्त्वांचा समावेश असलेली संकल्प चित्रे

- **करून पाहू या :**

१) फळभाज्यांचे किंवा फळांचे एकसारखे काप डिशमध्ये ठेवून सुंदर रचना करून त्याचे छायाचित्र काढा.
२) मोठ्या दगडावर छोटा दगड अशा क्रमाने दगडांची रचना करा. कोणते मूलतत्त्व आढळले ते लिहा.
३) एक जाड दोरा जमिनीवर सरळ ठेवावा. झाडाची एकसारखी दिसणारी पाने दोऱ्याच्या खाली चित्रात दाखवल्याप्रमाणे समान अंतरावर ठेवा. शक्य असल्यास प्रत्येक पानाच्या मधोमध फूल ठेवावे. अतिशय देखणे तोरण तयार करता येते. ( ही कृती गटाने करता येईल.)



- संकल्पाची मूलतत्त्वे समजावून सांगावीत. उदा. पुनरावृत्ती, बदल, उत्सर्जन, प्रमाण, तोल व लय.
- संकल्पाची मूलतत्त्व विचारात घेऊन संकल्प चित्रण करण्यास सांगावे.

CG – 3
C–3.2
LO–06AE16

- **चित्रातील सौंदर्य निर्मितीची तंत्रे :**

कोणतीही चित्राकृती केवळ रेषा, आकार आणि रंगाने पूर्ण होत नाही, तर चित्र अधिक सौंदर्यपूर्ण व आकर्षक करण्यासाठी पोत( Texture) अत्यंत महत्त्वाचा असतो. मुद्रातंत्र, कोलाज, स्टीपलिंग, तरंग मुद्रा यांसारखी तंत्रे वापरून कलाकृतीत विविध प्रकारचे पोत आणि उठावदारपणा निर्माण करता येतो.

- **मुद्रातंत्र ( Print Making) :**

एखाद्या पृष्ठभागावर ठसा उमटवून चित्र किंवा नक्षी निर्माण करण्याच्या प्रक्रियेला **मुद्रातंत्र** म्हणतात. हे तंत्र सोपे, सर्जनशील आणि आनंददायी आहे. विविध प्रकारच्या वस्तूंचे ठसे उमटवण्यासाठी जलरंग, पोस्टर रंग, शाई, झाडाची पाने, फळे, फळभाज्या यांसारख्या साधन-साहित्याचा वापर करता येतो.







- **कोलाज (Collage):**

विविध रंगांतील कागद, वर्तमानपत्रे, झाडाची वाळलेली पाने किंवा इतर उपलब्ध साहित्यांचे तुकडे कापून अथवा फाडून ते एका पृष्ठभागावर कल्पकतेने चिकटवून चित्ररचना तयार केली जाते त्यास '**कोलाज**' असे म्हणतात. टाकाऊतून-टिकाऊ व पर्यावरणपूरक कलाकृती बनवण्यासाठी कोलाज तंत्राचा वापर करता येतो. कोलाज निर्मितीसाठी रंगीत कागद, जुनी वर्तमानपत्रे, रंगीत मासिकांची पाने, जुन्या लग्नपत्रिका, रंगीत कापडाचे तुकडे, लोकर, वाळलेली पाने, कात्री, डिंक इत्यादी साधन- साहित्यांचा वापर करता येतो.







- **स्टिपलिंग तंत्र ( Stippling Technique) :**

चित्र काढताना केवळ ठिपक्यांच्या साहाय्याने आकार, छाया-प्रकाश आणि पोत (Texture) निर्माण करण्याच्या पद्धतीला '**स्टिपलिंग**' तंत्र म्हणतात. या तंत्रात रेषांचा वापर न करता, ठिपक्यांचे अंतर कमी-जास्त करून गडद किंवा उजळ परिणाम साधला जातो. जिथे ठिपके दाट असतात तिथे गडद छटा दिसतात. ठिपके विरळ असतील तर ती छटा उजळ दिसते. अशा प्रकारे ठिपक्यांच्या विशिष्ट मांडणीतून चित्रात खोली आणि त्रिमितीय आभास निर्माण करता येतो. या तंत्रासाठी प्रामुख्याने बारीक टोकाचे पेन, जेलपेन, स्केचपेन किंवा शाईचे पेन, पेन्सिल यांसारख्या साधन, साहित्याचा वापर करता येतो.





- **करून पाहू या :**

वर्तमानपत्रातील किंवा मासिकातील रंगीत चित्र भिंगातून बघा. काय दिसते याचे निरीक्षण करा. तुम्हाला वेगवेगळ्या रंगांचे ठिपके दिसले का? आता वर्तमानपत्रातील रंगीत पानांच्या तळाशी चार रंगातील ठिपके/चौकोन का असतात याचा विचार करा व चर्चा करा.

- **तरंग मुद्रा (नावीन्यपूर्ण तंत्र) :**

तुम्ही कधी पावसाच्या साचलेल्या पाण्यात तेलाचा थेंब पडलेला पाहिला आहे का? त्यात इंद्रधनुष्यासारखे विविध रंग दिसतात. अशाच प्रकारचा आपण एक खेळ खेळू या !

- एका पसरट भांड्यामध्ये (ट्रेमध्ये) अर्ध्यापर्यंत पाणी भरा.
- त्या पाण्यात तैलरंगाचे काही थेंब टाका.
- पाणी एका काडीने हळुवार गोल फिरवा.
- एक पांढरा कागद अगदी अलगद पाण्याच्या पृष्ठभागाला स्पर्श करेल असा ठेवा.
- कागदाचा एक कोपरा धरून तो लगेच वर अलगद उचला.
- पाण्यावरचे सर्व रंग कागदाला चिकटून नावीन्यपूर्ण नक्षी तयार झालेली दिसेल.
- कागदाला सावलीत सुकवा. अशा पद्धतीने कागदावर 'तरंग मुद्रा' घेऊन त्या कागदाचा उपयोग विविध प्रकारच्या सजावटीसाठी करा.











- **लक्षात ठेवा :**

मुद्रणयंत्राचा (प्रिंटिंग मशीन) वापर करून अनेक प्रिंट काढल्या जातात त्या एकसारख्या निघतात. त्या पेक्षा **'तरंग मुद्रा'** ही पद्धत वेगळी आहे. येथे प्रत्येक प्रिंट ही वेगवेगळी असते.

- **करून पाहू या :**

१) तुम्हांला आवडणाऱ्या फळाचा पानांसह बाह्याकार रेखाटावा.
२) फळाचा आकार स्टिपलिंग पद्धत वापरून ठिपक्यांनी भरावा.
३) पानांसाठी मुद्रातंत्र किंवा कोलाज तंत्र वापरावे.

- चित्रातील सौंदर्य निर्मितीसाठी विविध तंत्रांचा कल्पकतेने वापर कसा करावा याविषयी मार्गदर्शन करावे.
- उपलब्ध साहित्यांचा वापर करून चित्रे तयार करून घ्यावीत.
- विद्यार्थ्यांना आजूबाजूच्या परिसरातून विविध पोत शोधण्यास सांगावे.
- ठसे उमटवताना रंगाचे प्रमाण योग्य कसे ठेवावे हे प्रत्यक्ष कृती करून दाखवावे.
- स्टिपलिंग तंत्रासाठी ठिपके देताना ते घाईत न देता संयमाने देण्यास सांगावे.

CG - 3
C-3.1
LO-06AE13

## स्वाध्याय

१) आपल्या आजूबाजूच्या परिसराचे बारकाईने निरीक्षण करा आणि ज्या घटकांमध्ये पुनरावृत्ती आढळते अशा कोणत्याही पाच घटकांची नावे लिहा.

२) निसर्गातील विविध रंगछटा असलेल्या घटकांचा शोध घ्या आणि त्यांच्या नावाची यादी तयार करा.

३) मुद्रातंत्र, कोलाजतंत्र आणि स्टिपलिंग तंत्र यासाठी आपल्या परिसरात कोणकोणते साधन -साहित्य उपलब्ध होऊ शकते याची यादी तयार करा.

४) तरंग मुद्रा केलेल्या कागदापासून भेटकार्ड तयार करा.

५) कागदी ग्लासवर तरंग मुद्रा घेऊन ग्लासची सजावट करा.

६) भौमितिक आकार वापरून संकल्प चित्र तयार करा व विविध रंगछटांचा वापर करून रंगवा.

# ४ माझी अक्षरे

सुंदर, कलात्मक व आकर्षक पद्‌धतीने केलेली अक्षरांची मांडणी म्हणजे **अक्षरलेखन** (Calligraphy) होय. विविध साधनांचा वापर करून अक्षरे कशी काढायची ते आपण शिकणार आहोत. केवळ कागदावरच नव्हे तर संगणकावरही अक्षरांचे वेगवेगळे **फॉन्टचा** वापर कसा करायचा याचा आपण सराव करणार आहोत.

संगणकावर एका क्लिकने आपण अक्षरांचा आकार, जाडी आणि रंग बदलू शकतो, ज्यामुळे जाहिराती, वर्तमानपत्रे आणि पुस्तके अधिक आकर्षक दिसू लागली आहेत. आपल्या सभोवताली दिसणाऱ्या अक्षरांचे सौंदर्य समजून घेऊ आणि स्वतःच्या कल्पकतेने पेन्सिल, ब्रश किंवा विविध तंत्रज्ञानाचा वापर करून प्रभावी अक्षरलेखन करूया.




- **माहिती करून घेऊ या :**

  अक्षर लेखनासाठी वेगवेगळी साधने वापरली जातात त्यांना आपण '**माध्यमे**' म्हणतो. अक्षरलेखन आकर्षक होण्यासाठी साधनांची निवड महत्त्वाची असते.

- **माध्यमे :**

  अक्षरलेखनासाठी पेन्सिल, पेन, स्केचपेन, रंगीत पेन्सिल, मार्कर पेन , तैलखडू, संगणक (फॉन्ट) इत्यादी साधने वापरली जातात.



- **तुम्हाला माहित आहे का?**

**आपला लिपी वारसा**

**देवनागरी लिपी :** आज आपण मराठी, हिंदी, संस्कृत, कोकणी इत्यादी भाषा लिहिण्यासाठी ज्या लिपीचा वापर करतो, तिला **देवनागरी लिपी** म्हणतात. या लिपीत प्रत्येक अक्षराच्या डोक्यावर एक आडवी रेघ मारली जाते तिला **शिरोरेखा** म्हणतात. देवनागरी लिपी ही शास्त्रीयदृष्ट्या अत्यंत परिपूर्ण मानली जाते. कारण या लिपीत जसे बोलले जाते तसेच लिहिले जाते.

श्रवणबेळगोळ येथील देवनागरी (मराठी) लिपीतील शिलालेख.



- **करून पाहू या :**

झाडूची काडी, बांबूची काडी यांपैकी आपल्या परिसरातील उपलब्ध साधनांच्या टोकाला कटरच्या सहाय्याने चित्रात दाखवल्याप्रमाणे चपटे करून बोरु तयार करावा. बोरूच्या साहाय्याने शाई किंवा रंगात बुडवून जय हिंद, जय महाराष्ट्र, भारत माता असे शब्द वहीत लिहा.



- **चर्चा करू या :**

१) वरील पद्धतीने केलेल्या लेखनातून तुम्हांला कोणता अनुभव आला?
२) अक्षरांचा जाड-बारीकपणा का तयार होतो याविषयी आपल्या मित्रांसोबत चर्चा करा.
३) बोरूने लिहिताना आणि आधुनिक पेनाने लिहिताना तुम्हाला काय फरक जाणवला?
४) जुन्या काळी अक्षरलेखनासाठी कोणत्या नैसर्गिक साधनांचा वापर केला जात असे?

- **लक्षात ठेवा :**
  - **शिलालेख** – दगडावर कोरलेल्या लेखनाला 'शिलालेख' म्हणतात.
  - **ताम्रपट** – तांब्याच्या पत्र्यावर कोरलेल्या लेखनाला 'ताम्रपट' म्हणतात.
  - **भूर्जपत्र** – प्राचीन काळी कागद उपलब्ध नसल्यामुळे 'भूर्जपत्रावर' (झाडाच्या सालीवर) लेखन केले जात असे.

- **तुम्हांला माहीत आहे का?**



- पिसांच्या लेखणीमुळेच अक्षरांना विशिष्ट वळण आणि जाड बारीकपणा देण्याची कला विकसित झाली ज्यातून पुढे आधुनिक सुलेखनाचा (कॅलिग्राफी) जन्म झाला.
- नावानुसार अर्थपूर्ण अक्षर लिहिता येते.
- अक्षरातून चित्र निर्मितीही करता येते.

- **करून पाहू या : फलकलेखन –**

१) शाळेतील फलकावर रंगीत खडूने फलकलेखन करा.
२) फलकावर लहान-मोठी वळणदार अक्षरे काढा.
३) सामूहिक पद्धतीने नक्षीकाम करून फलकाची आकर्षक सजावट करा.
४) फलकलेखन करताना तुम्हांला काय नवीन शिकायला मिळाले ते थोडक्यात लिहा.




## डिजिटल अक्षररचना (Digital Typography) :

आजच्या काळात आपण केवळ हातानेच लिहित नाही तर संगणक, मोबाईल आणि टॅब यांच्या सहाय्याने लिहितो. संगणकावर अक्षरे टाईप करणे आणि त्यांना आकर्षक रूप देणे यालाच '**डिजिटल अक्षररचना**' असे म्हणतात. संगणकावर अक्षरे ज्या विशिष्ट शैलीत दिसतात त्याला **फॉन्ट (Font)** असे म्हणतात.
जाहिरातीच्या फलकावरील (Hoardings) आकर्षक अक्षररचना ही त्या जाहिरातीच्या विषयाला अनुसरून घेऊन तयार केलेली असते. एखाद्या चित्रपटाच्या पोस्टरवरील अक्षरे खूप आकर्षक आणि वेगळ्या शैलीत लिहिलेली असतात. अक्षरांच्या कलात्मक रचनेमुळे मजकूर अधिक प्रभावी वाटतो.

- विद्यार्थ्यांना अक्षरांचा आकार, अक्षरातील अंतर व मांडणी योग्य पद्धतीने करण्याचे मार्गदर्शन करावे.

CG – 3
C–3.1
LO–06AE14

- **डिजिटल नाव तयार करून पाहू या :**

संगणकावर कोणत्याही ॲपमध्ये स्वतःचे नाव देवनागरी किंवा रोमन लिपीत टाईप करा. विविध फॉन्टसचा वापर करून अक्षरे बदलून पहा. स्वतःच्या नावाचे वेगवेगळ्या शैलीतील अक्षर तयार करून त्याच्या विविधतेचा अनुभव घ्यावा.




(• अक्षर लेखनासंबंधी अधिक माहिती जाणून घेण्यासाठी प्रथम पृष्ठावरील क्यू. आर्. कोड स्कॅन करावा.)

- **लक्षात ठेवा :**
  - स्मार्टबोर्डवर देखील अशी सुंदर अक्षरे विविध रंगात व आकारात लिहिता येतात.
  - संगणकाप्रमाणे मोबाईलमध्ये देखील अनेक प्रकारचे साधने उपलब्ध असतात त्या टूल्सच्या मदतीने अक्षरलेखनाचा सराव करता येतो.

- **तुम्हाला माहित आहे का?**

**सुलेखनकार : पद्‌मश्री अच्युत रामचंद्र पालव**

अच्युत रामचंद्र पालव हे प्रसिद्ध सुलेखनकार आहेत. त्यांचा जन्म २७ जानेवारी १९६० रोजी महाराष्ट्रातील मुंबई येथे झाला. त्यांनी देवनागरी, मोडी लिपीतील अक्षरांना नव्या उंचीवर नेऊन ठेवले आहे. मुंबई येथील सर ज. जी. उपयोजित कला महाविद्यालयातून शिक्षण पूर्ण केले. त्यांनी अक्षरांच्या बाह्य आकारापलीकडे जाऊन



त्यातील सौंदर्याचा शोध घेण्यास सुरुवात केली. अक्षरांना केवळ लिहिण्याचे साधन न मानता त्यांना एक जिवंत कलाकृती म्हणून जगासमोर मांडले. त्यांच्या लेखणीतून साकारलेली अक्षरे कधी एखाद्या चित्रासारखी भासतात, तर कधी त्यातून एखादी लयबद्ध कविता मूर्त रूपात साकारतरना दिसते. अक्षरांच्या या प्रवासात त्यांनी पारंपरिक व आधुनिक साधनांचा वापर करून सुलेखन केले आहे. कागदा सोबतच कापड, भिंती आणि कॅनव्हास अशा विविध माध्यमांवर त्यांनी अक्षरांचे असंख्य प्रयोग केले आहेत. भारतीय लिपींतील सुलेखनाच्या अनेक कार्यशाळा त्यांनी जगभरात घेतल्या आहेत. ही कला नव्या पिढीपर्यंत पोहचवण्याचे मोठे कार्य त्यांनी केले आहे.या कार्याची दखल घेऊन भारत सरकारने सन २०२५ मध्ये त्यांना 'पद्‌मश्री' पुरस्काराने सन्मानित केले आहे.




## स्वाध्याय

१) उपलब्ध लेखन साधनांच्या साहाय्याने तुमचे स्वतःचे नाव वैशिष्ट्यपूर्ण पद्‌धतीने लिहा.
२) संगणकावरील एखाद्या 'फॉन्ट'चा आधार घेऊन अक्षरांना आधुनिक रूप द्यावे.
३) हाताने केलेले अक्षरलेखन आणि संगणकावरील अक्षरलेखन यांतील फरक सांगा.
४) वर्तमानपत्रे, जाहिरातपत्रे किंवा मासिकातील अक्षरांचे निरीक्षण करून त्यातील निरनिराळ्या प्रकारचे अक्षरे, शब्द कापून वहीत चिकटवा.

- दोन रेघी वही, आलेख कागद, फलकलेखन व डिजिटल टूल्स वापरून अक्षर लेखनाचा नियमित सराव करण्यास प्रवृत्त करावे.
- विद्यार्थ्यांचा प्रयत्न व कल्पकतेचे कौतुक करून त्यांना प्रोत्साहित करावे.

CG – 3
C–3.1
LO–06AE15

# ५ त्रिमित सृजन

दृश्यकला म्हणजे केवळ कागदावर चित्र काढणे नाही तर सुंदर वस्तू तयार करणे ही एक कलाच आहे. आता आपण मातीपासून वेगवेगळे आकार बनवायला शिकणार आहोत. तसेच टाकाऊ कागद व कागदी लगद्यापासून सुंदर वस्तू बनवणार आहोत.

आपण माती माध्यमातून विविध भौमितिक घनाकारांची रचना करायला शिकणार आहोत. तसेच कागदी बोळे आणि कागदी लगद्याचा(Paper Pulp)वापर करून आकर्षक त्रिमितीय कलाकृती साकारणार आहोत.

कलेचा हा प्रवास केवळ वैयक्तिक नसून, गटकार्यातून '**कोलाज**' तयार करताना आपल्याला सहकार्याची भावनाही अनुभवता येईल. निसर्गातील पर्यावरणपूरक वस्तूंचा कल्पकतेने वापर करून आपल्या परिसराची सजावट कशी करता येईल याचा प्रत्यक्ष सराव करणार आहोत.

- **मातीचे विविध प्रकार व गुणवैशिष्ट्ये :**

मातीकामासाठी निसर्गात विविध प्रकारची माती उपलब्ध असते, मात्र कामाचे स्वरूप आणि मातीची गुणवैशिष्ट्ये लक्षात घेऊनच मातीची निवड करणे आवश्यक ठरते.

**१) परिसरातील माती :** ही माती ओढा, नदी किनारी तसेच शेतात व बागेतही उपलब्ध होते. मातीपासूनही विविध वस्तू तयार करता येतात. पण याला चिरा जाऊ शकतात. या मातीत शेण, कापूस, भुसा मिसळून त्यापासून शिल्पे तयार केली तर, त्याला चिरा (तडे) कमी प्रमाणात पडतात.









**२) चिकण माती (टेराकोटा) :** ही माती प्रामुख्याने लाल रंगाची आणि अत्यंत लवचीक असते. मोठ्या आकाराचे घनाकार, शंकू किंवा मातीची शिल्पे बनवण्यासाठी या मातीचा प्रामुख्याने वापर केला जातो.

**३) शाडू माती :** ही माती चिकट असते. या मातीचा वापर पुन्हा पुन्हा करता येतो. ही माती पाण्यात सहज विरघळते. हिचा रंग राखाडी (ग्रे) असतो.





**४) प्लॅस्टिसिन क्ले :** ही कृत्रिम माती असून या मातीचा वापर पुन्हा पुन्हा करता येतो. ही माती विविध रंगांत मिळते.





### दि्वमितीय (Two Dimensional 2 D) आकार

ज्या आकारांना फक्त लांबी आणि रुंदी असते, त्यांना '**दि्वमितीय आकार**' म्हणतात. हे आकार पूर्णपणे सपाट असतात. उदा. कागदावर काढलेले चित्र, चौरस, आयत, वर्तुळ, त्रिकोण इत्यादी.



चौरस



वर्तुळ



आयत



त्रिकोण

### त्रिमितीय (Three Dimensional 3 D) आकार

ज्या आकारांना लांबी आणि रुंदी सोबतच जाडी किंवा उंची (खोली) असते त्यांना '**त्रिमितीय आकार**' किंवा '**घनाकार**' म्हणतात. उदा. घन (Cube), गोल (Sphere), दंडगोल (Cylinder), शंकू (Cone)



चौरसाकृती घन



गोल



दंड गोल



शंकू

- **पर्यावरणपूरक कोलाज बनवू या :**

आपल्या परिसरातील टाकाऊ किंवा पर्यावरणपूरक साहित्यापासून एखादी त्रिमित वस्तू तयार करा. उदा. नारळाच्या करवंटीपासून वाटी, खोक्यापासून बचत पेटी(पिगी बँक) इत्यादी. केलेल्या वस्तूंवर शेंगांची टरफले, कागदाचे बोळे यांसारख्या वस्तूंच्या सहाय्याने कोलाज करून सजवा. (ही कृती वैयक्तिक किंवा गटामध्ये तयार करता येईल).

- व्दिमित व त्रिमित आकारांचा फरक समजून सांगा.
- विविध माती प्रकारांचा परिचय करून द्यावा.
- उपलब्ध मातीतून घनाकार तयार करून घ्यावे.

CG – 3
C–3.2
LO–06AE17







- **लक्षात ठेवा :**

  आजूबाजूच्या परिसरात विविध प्रकारच्या नैसर्गिक, मानवनिर्मित आणि पर्यावरणपूरक वस्तू उपलब्ध असतात. (उदा दगड, शंख, शिंपले, कागदी खोके इत्यादी) अशा वस्तूंचा कल्पकतेने आणि सौंदर्यपूर्ण दृष्टीने वापर करून आकर्षक 'कोलाज काम' करता येते.



- **पेपर क्विलिंग (Paper Quilling) :**

  कागदाच्या पातळ बारीक पट्ट्या गुंडाळून विविध नक्षी व डिझाईन तयार करण्याच्या तंत्राला 'पेपर क्विलिंग' म्हणतात. यातून सुंदर सजावटी वस्तू आणि कलात्मक रचना तयार करता येतात.

- **कागदी लगदा (Paper Pulp) तयार करणे :**

विविध नाटकांमध्ये, नृत्यांमध्ये तसेच कार्यक्रमांमध्ये वेगवेगळ्या मुखवट्यांचा (Masks) वापर केला जातो. हे मुखवटे रद्दी कागद किंवा कागदी लगद्यापासून तयार करता येतात. मुखवट्यांसाठी उपयुक्त असा कागदी लगदा पुढीलप्रमाणे तयार करता येतो.

**कृती :**

१) रद्दी कागदाचे लहान – लहान तुकडे करून ते एका बादलीत किमान एक दिवस पाण्यात भिजत घालावे.

२) दुसऱ्या दिवशी भिजलेले कागदाचे तुकडे हाताने नीट एकजीव करून घ्या.

३) तयार झालेला लगदा (Pulp) एका सुती कपड्यात घ्यावा आणि घट्ट पिळून त्यातील जास्तीचे पाणी काढा.

४) आता या लागद्यात थोडा डिंक, मेथी पावडर मिसळा. यामुळे लगद्याला चिकटपणा येतो आणि वाळल्यानंतर कलाकृती कडक व मजबूत होते. थोडी खडूची पूड मिसळल्यास लगद्याला सुबकता येते. वरील पद्धतीने तयार केलेल्या कागदी लगद्याचा उपयोग विविध प्रकारच्या वस्तू, खेळणी आणि मुखवटे तयार करण्यासाठी करता येतो.













- **लक्षात ठेवा :**
  - लगदा तयार करताना त्यात थोडी मेथी पावडर टाकल्यास त्याला कीड/ बुरशी लागत नाही.
  - लगदा लगेच वापरायचा नसेल तर तो पिशवीत व्यवस्थित गुंडाळून थंड जागी ठेवावा.
  - लगद्यापासून बनवलेली वस्तू पूर्णपणे वाळल्यानंतर त्यावर रंगकाम करावे.

- विद्यार्थ्यांना स्वनिर्मितीची संधी द्यावी.
- अचूकतेपेक्षा सर्जनशीलतेला प्रोत्साहन द्यावे.
- प्रमाण व आकारमान याकडे विद्यार्थ्यांचे लक्ष वेधावे.

CG – 3
C–3.2
06AE18

**कागदी लगद्यापासून मुखवटा तयार करणे :**

१) सर्वप्रथम एक मोठ्या आकाराचा फुगा घ्यावा. रद्दी कागदाच्या पट्ट्या पाण्यात भिजवून त्या फुग्याच्या बाहेरील अर्ध्या भागावर पहिला थर नीट लाऊन घ्यावा.

२) कागदी पट्ट्यांच्या थरावर कागदी लगदा लावून मुखवट्याचा आकार तयार करावा.

३) अशा प्रकारे तयार झालेला हा मुखवटा कडक उन्हात पूर्णपणे वाळू द्यावा व फुगा काढून घ्यावा.

४) डोळ्यांचा आकार रंगवून/कापून घ्यावा.

५) मुखवट्याला रंग देऊन त्यावर नाक, भुवया, ओठ काढून मुखवटा सुशोभित करावा.

६) परिसरात उपलब्ध असणाऱ्या पर्यावरणपूरक घटकांचा कौशल्यपूर्ण वापर करून मुखवटा सुशोभित करावा. (उदा. दाढीसाठी नारळाचे तंतू, अलंकारणासाठी बिया, शंख-शिंपले इत्यादी.) वरील प्रमाणे तयार केलेल्या मुखवट्यांचा उपयोग नाट्य व नृत्य यांसारख्या सादरीकरणाच्या कलेत करता येतो.













- **लक्षात ठेवा :**
  - कलांमध्ये मुखवट्यांचा वापर केवळ चेहरा झाकण्यासाठी नसून ते नाटक व नृत्यातील नेमकी व्यक्तिरेखा (पात्र) प्रेक्षकांपर्यंत पोहोचवण्याचे एक प्रभावी साधन होय.

(कागदी लगद्यापासून मुखवटे तयार करण्याची मार्गदर्शक कृती जाणून घेण्यासाठी प्रथम पृष्ठावरील क्यू. आर्. कोड स्कॅन करावा.)

- लगदा तयार करण्याची कृती समजून सांगावी व लगद्यापासून मुखवटा कसा करावा याचे मार्गदर्शन करावे.
- प्रत्येक विद्यार्थ्याच्या प्रयत्नांचे कौतुक करून आत्मविश्वास वाढवावा.

CG – 3
C–3.2
06AE18

## स्वाध्याय

१) तुमच्या परिसरातील उपलब्ध मातीपासून तुमच्या आवडीचे त्रिमितीय घनाकार तयार करा.
२) तुम्ही तयार केलेली मातीची प्रतिकृती वर्गात दाखवून आलेल्या अनुभवावर आधारित चर्चा करावी.
३) मातीकाम करण्यासाठी तुम्हांला कोणती माती अधिक योग्य वाटली ? का ?
४) नैसर्गिक माती आणि कृत्रिम माती यांच्या वापरामुळे पर्यावरणावर काय परिणाम होऊ शकतो असे तुम्हांला वाटते का?
५) मुखवट्याचा उपयोग सादरीकरणाच्या कोणत्या कलेत करता येईल ते लिहा.
६) तुमच्या परिसरातील टाकाऊ किंवा पर्यावरणपूरक वस्तूंचा वापर करून एक त्रिमितीय कलाकृती (3D Model) तयार करा. ही कलाकृती सजवण्यासाठी 'कागदी लगदा/ कागदी बोळे' परिसरातील वस्तू वापरून 'कोलाज तंत्राचा' वापर करावा.

- **क्षेत्रभेट :**

स्थानिक परिसरातील मातीकाम व्यवसायाला भेट देऊन माहिती संकलित करा व नोंदवहीत लिहा.
(क्षेत्रभेट संदर्भातील अधिक माहिती जाणून घेण्यासाठी प्रथम पृष्ठावरील क्यू. आर्. कोड स्कॅन करावा.)

# ६ परिसरातील दृश्यकला

मानवी जीवन समृद्ध आणि सुंदर करण्यासाठी विविध कला,संस्कृती आणि परंपरांचा उगम झाला आहे. आपल्या परिसरातील सामाजिक आणि सांस्कृतिक वारसा चित्रकला, शिल्पकला आणि हस्तकला अशा विविध दृश्य कलांच्या स्वरूपात आपल्याला पाहायला मिळतो. या कला केवळ मनोरंजनाचे साधन नसून त्यातून तत्कालीन जीवनशैली आणि मानवी मूल्यांचे यथार्थ दर्शन घडते.

या पारंपरिक कला आजही अनेक कलाकार व कारागिरांच्या माध्यमातून जिवंत आहेत. उपलब्ध साधनसामग्रीचा कल्पकतेने वापर करून निर्माण केलेली ही लोककला आपल्या संस्कृतीचे अविभाज्य अंग आहे. आधुनिकतेच्या प्रवाहात या समृद्ध वारशाचे जतन करणे आणि कलाकारांना प्रोत्साहन देणे ही काळाची गरज आहे. चला तर मग, आपल्या परिसरातील या सांस्कृतिक वैभवाचा शोध घेऊन तो जोपासण्याचा प्रयत्न करु या !



दृश्यकला



कला व्यवसाय

- **रांगोळी :**

रांगोळी हा आपल्या सांस्कृतिक परंपरेचा एक सुंदर दृश्यकला प्रकार आहे. रांगोळीमुळे घर, परिसरात प्रसन्नता निर्माण होते. रांगोळी काढण्याची परंपरा आजही अविरत सुरू आहे. देशभरात विविध प्रकारांनी व साधनांनी रांगोळी काढली जाते. उदा. ठिपक्यांची रांगोळी, मुक्तहस्त रांगोळी, फुलांची रांगोळी, पाण्यावरची रांगोळी, संस्कार भारती रांगोळी, फुलांची रांगोळी.

- विद्यार्थ्यांना प्रकल्पाचा उद्देश स्पष्ट करून सांगावा आणि उदाहरणाद्वारे समजावून द्यावा.
- शक्य असल्यास स्थानिक शिल्पकृतींची चित्रे किंवा लघु चित्रफीत दाखवावी.

CG – 4
C–4.1
LO–06AE19

**१) ठिपक्यांची रांगोळी :**

ठरावीक अंतरावर ठिपके देऊन ते जोडून भौमितिक आकार तयार केले जातात. ही रांगोळी अतिशय रेखीव दिसते.





**२) मुक्तहस्त रांगोळी :**

यामध्ये ठिपके न वापरता थेट हाताने नक्षी काढली जाते.



**३) संस्कार भारती रांगोळी :**

ही रांगोळी पाचही बोटांचा वापर करून काढली जाते यात मोठ्या आकार आणि भरगच्च नक्षी असते. प्रामुख्याने सण-समारंभात ही रांगोळी काढली जाते.



**४) फुलांची रांगोळी :**

विविध प्रकारच्या फुलांच्या पाकळ्या, फुले आणि पाने वापरून ही रांगोळी काढली जाते.



**५) पाण्यावरची रांगोळी :**

थाळीमध्ये पाणी घेऊन त्यावर कोळशाची पूड किंवा तेल टाकून रांगोळी पाण्यावर तरंगती ठेवली जाते.



**६) धान्याची/बियांची रांगोळी :**

विविध रंगाच्या डाळी, धान्य आणि बिया वापरून ही रांगोळी सजविली जाते.



**७) त्रिमितीय रांगोळी (3D) :**

विविध रंगीत कागदांचा वापर करून ही रांगोळी उठावदार किंवा जिवंत वाटेल अशी काढली जाते.

- **तुम्हाला माहित आहे का?**

भिन्न भिन्न प्रातांत रांगोळीची विविध संबोधने आहेत.

| | | |
|---|---|---|
| महाराष्ट्र – रांगोळी | राजस्थान – मांडणा | मध्यप्रदेश – चौकपूरना |
| बिहार – अरिपन | तमिळनाडू – कोलम | उत्तरप्रदेश – सोन रखना |
| हिमाचल – लिखनू | बुंदेलखंड – कोहबर | ओरिसा – चीतआ |
| गुजरात – सातिया | कर्नाटक – चितरा रंगोली | आंध्रप्रदेश – मुग्गु |

- **लक्षात ठेवा :**

पूर्वी रांगोळी काढण्यासाठी तांदळाच्या पिठाचा वापर केला जात असे, जेणेकरून मुंग्या किंवा पक्ष्याना ते अन्न म्हणून मिळावे. ही निसर्गाप्रती कृतज्ञता व्यक्त करण्याची एक पद्धत होती.

- **लाकडी शिल्पकला :**



सातपुडा पर्वत रांगांतील कोरकू आदिवासी कला आजही समृद्ध आहे.त्यांनी लाकडापासून बनवलेले मुखवटे नैसर्गिक रंगांनी रंगवलेले आणि सांस्कृतिक-धार्मिक महत्त्व असलेले असतात. हे मुखवटे प्रामुख्याने सागवान किंवा स्थानिक लाकडामध्ये कोरतात. हे लाकडी मुखवटे नैसर्गिक रंगांचा वापर करून रंगवले जातात. मुखवटे मानवी किंवा प्राण्यांच्या चेहऱ्यांचे असतात. त्यांच्यातील हे हस्तकला कौशल्य पिढ्यानपिढ्या चालत आले आहे. अनेक प्रकारच्या उत्सवांमध्ये पारंपरिक वेशभूषेचा भाग म्हणून त्याचा वापर केला जातो. सध्या अशा मुखवट्यांचा वापर घराच्या सजावटीसाठी मोठ्या प्रमाणावर केला जात असून त्यातून आदिवासी कलाकारांना रोजगाराच्या संधी उपलब्ध होत आहेत.

सिंधुदुर्ग जिल्ह्यातील सावंतवाडीमध्ये लाकडी खेळणी व वस्तू बनवण्याचा व्यवसाय पूर्वीपासून सुरू आहे. आज पारंपरिक पद्धतीने केलेल्या लाकडी खेळण्यांसाठी सावंतवाडी जगप्रसिद्ध आहे. हलक्या लाकडाचा उपयोग व आकर्षक रंग हे या खेळण्यांचे वैशिष्ट्य आहे.







• **लक्षात ठेवा :**

आपल्या आजूबाजूला मातीकाम करणारे, बांबूपासून वस्तू बनवणारे, गवतापासून वस्तू बनवणारे किंवा इतर पारंपरिक व्यवसायातून कलानिर्मिती करणारे असे असंख्य कलाकार आपण पाहतो.तेही एका अर्थाने पारंपरिक कला व कौशल्यांचे जतन करत असतात. त्यांच्याशी संवाद साधून व काही कौशल्ये आत्मसात करण्याचा प्रयत्न करून आपण या परंपरांच्या संवर्धनामध्ये सहभागी होऊ शकतो.

• **दृश्यकलाकृतीचे अनुकरण :**

आपल्या आजूबाजूला अनेक कलाकार किंवा कलेशी संबंधित व्यवसाय करणारे कारागीर आपण पाहतो. उदा. बांबूकाम करणारे कारागीर, लाकडाच्या वस्तू बनवणारे कारागीर इत्यादी. यांतील काही व्यवसाय खूप पूर्वीपासून सुरू आहेत. अशा कामांचे निरीक्षण केल्यास आपल्याला त्या कामातील कौशल्ये समजून घेता येतील व या कौशल्याचे अनुकरण आपण आपल्या कल्पनेने केल्यास आपल्यालाही कलानिर्मितीचा आनंद मिळतो. यामुळे आपल्याला निरीक्षणशक्ती विकसित करता येतेच पण त्याचबरोबर हस्तकौशल्येही (Motor Skills) मिळवता येतात.



(कागदाची चटई)

• **कला आणि कलाकार**

चित्रकला, शिल्पकला, हस्तकला अशा विविध कला प्रकारांमध्ये अनेक कलाकार कार्य करतात. त्यांच्या कौशल्यामुळे कलापरंपरा समृद्ध होताना दिसते.

चला काही कलाकारांचा परिचय करून घेऊ या.

**वारली चित्रकार : जिव्या सोमा मशे**

जिव्या सोमा मशे, महाराष्ट्रातील वारली आदिवासी समाजातील सुप्रसिद्ध चित्रकार होते. त्यांचा जन्म १९३४ साली महाराष्ट्रातील पालघर येथील झाला. त्यांनी पारंपरिक वारली चित्रकला कागद व कॅनव्हासवर साकार करून या लोककलेला राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावर प्रसिद्धी मिळवून दिली. त्यांच्या चित्रांमध्ये दैनंदिन जीवन, शेती, सण-समारंभ, नृत्य आणि निसर्ग साध्या रेषा व त्रिकोण, वर्तूळ, चौकोन अशा भूमितीय आकृत्यांच्या साहाय्याने सुंदर चित्रण केलेले दिसते. त्यांच्या कार्यामुळे वारली चित्रकला लोककलेपासून पुढे जाऊन आधुनिक भारतीय कलेत महत्वाचे स्थान मिळवू शकली.त्यांच्या अतुलनीय योगदानाबद्दल त्यांना विविध पुरस्कारांनी सन्मानित



करण्यात आले.  भारत सरकारचा पद्मश्री पुरस्कार (२०११),  शिल्पगुरु पुरस्कार (२००२), राष्ट्रीय पुरस्कार (१९७६) महाराष्ट्र शासनाकडून राज्य हस्तकला पुरस्कार (१९७०) अशा विविध पुरस्कारांनी त्यांना गौरवण्यात आले आहे. त्यांच्या काही कलाकृती पुढे दिल्या आहेत.





- **लक्षात ठेवा :**
  - जिव्या सोमा मशे यांच्या योगदानामुळे वारली चित्रकलेचा प्रसार देश-विदेशात झाला आणि  या कलेचे जतन होण्यास मोठी मदत झाली.

**शिल्पकार :  पद्मभूषण राम वंजी सुतार**



राम वंजी सुतार हे भारतातील सुप्रसिद्ध शिल्पकार आहेत. त्यांचा जन्म १९ फेब्रुवारी १९२५ रोजी महाराष्ट्रातील धुळे जिल्ह्यात झाला. त्यांनी शिल्पकलेचे शिक्षण सर जे. जे. स्कूल ऑफ आर्ट,  मुंबई येथे घेतले. त्यांनी भारतातील अनेक महान नेते आणि ऐतिहासिक व्यक्तींची भव्य शिल्पे तयार केली आहेत. त्यांच्या शिल्पांमध्ये वास्तवदर्शी रूप, प्रमाणबद्धता आणि भव्यता दिसून येते. त्यांच्या कार्यामुळे भारतीय शिल्पकलेला देश-विदेशात मोठी ओळख मिळाली आहे. Statue of Unity – सरदार वल्लभभाई पटेल यांचा जगातील सर्वात उंच पुतळा (गुजरात) हे त्यांचे शिल्प जगप्रसिद्ध आहे.

शिल्पकार राम वंजी सुतार यांना भारत सरकारचा **'पद्‌मश्री'** पुरस्कार (१९९९) व **'पद्‌मभूषण'** पुरस्कार (१९९६) आणि महाराष्ट्र राज्याचा **'महाराष्ट्र भूषण'** हा सर्वोच्च नागरी पुरस्कार (२०२४) देऊन सन्मानित करण्यात आले आहे, तसेच २०१८ मध्ये **'टागोर सांस्कृतिक सलोखा पुरस्कार'** प्रदान करण्यात आला आहे.



- **लक्षात ठेवा :**
  - राम वंजी सुतार यांच्या शिल्पकृती भारतातील अनेक शहरांमध्ये उभारण्यात आल्या असून त्या भारतीय इतिहास आणि संस्कृतीची आठवण करून देतात.
  - सरदार वल्लभभाई पटेल यांचा 'स्टॅच्यू ऑफ युनिटी' हा जगातील सर्वात उंच (१८२ मीटर) पुतळा साकारला आहे.

## स्वाध्याय

१) रांगोळी काढण्यासाठी रासायनिक रंगांऐवजी पर्यावरणपूरक रंग वापरणे कसे फायदेशीर आहे?

२) बांबूच्या पट्ट्यांपासून चटया किंवा टोपल्या कशा बनवल्या जातात याचे निरीक्षण करा.
कागदाच्या किंवा कापडाच्या पट्ट्या करून त्यांच्या साहाय्याने चटई विणावी.

३) लाकडावर कोरीवकाम कसे करतात याचे निरीक्षण करून खडूवर तुमच्या कल्पनेने कोरीवकाम करावे.

- **माहिती अहवाल :**

आपल्या गावात/ परिसरात विविध प्रकारच्या कला व कलाकार आढळतात. (जसे- स्थानिक चित्रकला, विणकाम, धातूकाम, बांबूकाम इत्यादी) या कलांमध्ये स्थानिक संस्कृती, परंपरा, शैली आणि कलात्मक वैशिष्ट्ये दिसून येतात. यांवर आधारित एक छोटा 'माहिती अहवाल' (Report) तयार करा. शक्य असल्यास त्या कलेचे रेखाटन करावे किंवा त्या कलेचा एखादा नमुना तयार करून आपला अनुभव वर्गात सांगावा.

(माहिती अहवालाच्या अधिक माहितीसाठी प्रथम पृष्ठावरील क्यू. आर्. कोड स्कॅन करावा.)

- विद्यार्थ्यांना परिसरातील योग्य व सहज उपलब्ध होईल अशी चित्रकृती/शिल्पकृती निवडण्यासाठी मार्गदर्शन करावे.
- माहिती संकलनासाठी विद्यार्थ्यांना विश्वसनीय स्रोत/ पालक /स्थानिक व्यक्ती/ पुस्तके/ इंटरनेट वापरण्यास प्रोत्साहित करावे.
- गटप्रकल्प असल्यास प्रत्येक विद्यार्थ्यांचा सहभाग सुनिश्चित करावा.

CG - 4
C-4.1/4.2
LO06AE 20 /21

# रंगमंच



# ७ चला पाहू व्यक्त होऊ...

आपल्या दैनंदिन जीवनात आपण दररोज विविध अनुभव घेत असतो. विविध प्रसंगांना सामोरे जात असतो. हे अनुभव आपण इतरांना जसेच्या तसे सांगतो यालाच '**अनुभव कथन**' असे म्हणतात.

आता तुमच्या सारख्याच संजू नावाच्या मुलाने केलेले अनुभव कथन आपण वाचू या.

**अनुभव कथन**

बाई – काय रे, संजू तू अभ्यास करून का नाही आला?

संजू – बाई, काल शाळा सुटल्यावर मी आईसोबत बाहेर गेलो होतो. त्यामुळे अभ्यास करू शकलो नाही.

बाई – अरे, पण अभ्यास पूर्ण करून जायचं होतं ना.

संजू – बाई, आई म्हणाली उशीर झाला तर दिंडी निघून जाईल.

बाई – अच्छा, म्हणजे तू दिंडी पहायला गेला होतास.

संजू – हो बाई, पण यायला उशीर झाला. त्यामुळे अभ्यास करता आला नाही.

बाई – तरीच म्हटले, संजू रोज अभ्यास पूर्ण करून येतो. पण आज नेमकं काय झालं पण इथून पुढे सांगून जायचं किंवा अभ्यास पूर्ण करून जायचं.

संजू – हो चालेल, मी पुन्हा असे करणार नाही.

बाई – संजू, तू काल जो दिंडीचा प्रसंग पाहिला तो आम्हांला सांग ना.

संजू – हो बाई, सांगतो ना, आम्ही दिंडी पाहायला गेलो, तेव्हा तिथं आधीपासूनच खूप गर्दी झाली होती. माझ्या वयाची बरीच पोरं सुदधा तिकडं आली होती. रस्त्याच्या दोन्ही बाजूंना गर्दी झाली होती. काही लोक तर झाडावर चढून दिंडी पाहत होते, काही वारकरी पताका घेऊन नाचत होते. काही वारकरी टाळ वाजवत 'जय हरी विठ्ठल' असा घोष म्हणत होते. दोन–तीन वारकरी ढोलकी वाजवत होते.

बाई – अरे संजू, त्या वाद्याला ढोलकी नाही रे म्हणत, त्याला पखवाज किंवा मृदंग म्हणतात.

संजू – हो बाई, मग आम्ही दिंडीच्या दर्शनानंतर प्रसाद घेऊन आम्ही घरी निघालो. मात्र घरापर्यंत जय हरी विठ्ठल, जय जय विठ्ठल हेच कानात घुमत होते. घरी येईपर्यंत अंधार पडला होता.

बाई– वा ! छान. संजू तू खूपच छान तुझा अनुभव सांगितलास. बघा मुलांनो संजूने काल जो रोजच्यापेक्षा वेगळा अनुभव घेतला आणि तो सोप्या शब्दात आपल्याला छान सांगितला. तुम्हांला आलेले असे छान छान अनुभव वर्गात सांगा. म्हणजे आम्हां सर्वांना ते अनुभव ऐकता येतील.

- विद्यार्थ्यांना दैनंदिन जीवनातील विविध अनुभव गटात किंवा वर्गात सांगण्यास प्रोत्साहीत करावे. वाचिक अभिनय, सहजता, सभाधीटपणा, उत्स्फूर्तता यामध्ये सुधारणा करण्यास योग्य वाव द्यावा.

CG -1
C- 1.1
LO-06AE22

**कथेचे किंवा प्रसंग संवादलेखन.**

**खाली एक प्रसंग दिला आहे. तो आपण लक्षपूर्वक वाचू.**

**प्रसंग:**

प्रतीक आणि सौरभ रोज ज्या रस्त्याने शाळेला जायचे त्या रस्त्यावर शामरावांचे फुले आणि पुष्पगुच्छ विकायचे दुकान होते. रस्त्याने जाताना शामराव नेहमी त्या दोघांची विचारपूस करत असे. आज मात्र प्रतीक व सौरभ त्यांच्या फुलाच्या दुकानाजवळून शाळेला जात असताना, शामराव त्यांच्या सोबत काहीच बोलले नाही. सौरभच्या हे लक्षात आले. 'आज काकांना काय झाले असावे ?', असा प्रश्न त्याला पडला मग दोघांनी थांबून शाम काकांची विचारपूस केली. तर असे समजले की, शामरावांनी एका गिऱ्हाईकाला तीन हजार रुपयांची फुले व पुष्पगुच्छ विकले. गिऱ्हाईकाने शामरावांना तीन हजार रुपये ऑनलाईन पाठवले पण ते शामरावांना मिळालेच नव्हते. त्यामुळे शामराव थोडे चिंतेत पडले होते. आपली तीन हजार रुपयांची फसवणूक झाली की काय असे त्यांना वाटत होते.

हे ऐकून प्रतीक आणि सौरभ शामरावांना मदत करायचे ठरवतात. सौरभ शामरावांना त्यांचा मोबाईल मागतो तेव्हा तो चार्जिंगला लावल्याचे शामराव सांगतात. सौरभ हातात मोबाईल घेतो, तर त्याला समजते की जेव्हा मोबाईलची बॅटरी संपली होती तेव्हा तो स्विच ऑफ झाला होता आणि तो ऑन करायचा राहून गेला. ज्या स्कॅनरवर पैसे पाठवले जातात त्या मशीनची पाहणी प्रतीक करू लागतो. त्याच्या असे लक्षात येते की, त्या मशिनच्या आवाजाचे बटण बंद होते. दोघांनी क्यू आर कोड स्कॅनर मशीन व मोबाईल सुरू करून दिले. मोबाईल सुरू होताच लगेच पैसे मिळाल्याचा मेसेज त्यावर आला. सौरभने आलेला संदेश शामरावांना दाखवला. शामरावांचा जीव भांड्यात पडला. त्यांनी दोघांचे आभार मानले. सौरभ व प्रतीक शाळेला जायला निघाले. 'काही मदत लागल्यास सांगा' असे म्हणून दोघे निघून गेले.

वरील प्रसंगावर आधारित संवाद लेखनः

(प्रतीक आणि सौरभ दोघे मित्र शाळेत निघाले आहेत.)

सौरभ – प्रतीक, अरे आज बहुतेक आपण शाळेत लवकर पोहोचू.

प्रतीक – हो ना. तू आज तयार व्हायला उशीर लावला नाहीस. त्यामुळे आपण शाळेला लवकर पोहोचणार.

सौरभ – हो का! मी उशीर करतो का? चुकीचं निरीक्षण केल्याबद्दल त्या शाम काकांच्या दुकानातून फुलं घेतो आणि तुझा सत्कारच करतो बघ...

प्रतीक – हे बघ, दुकान आले. घे फुलं आणि कर सत्कार.

सौरभ – गप रे, चल पुढं. पण प्रतीक तुझ्या लक्षात आलं का ?

प्रतीक – काय रे ?

सौरभ – शाळेत जाताना शाम काका रोज आपल्याशी बोलतात. पण आज दुकानात गिऱ्हाईक नव्हते. तरी ते आपल्याशी बोलले नाही.

- विविध प्रसंगांवर विद्यार्थ्यांकडून संवादलेखन करून घ्यावे व सादरीकरणाची संधी द्यावी.

CG –1/2
C– 1.1/2.1
LO–06AE 23/27

प्रतीक – हो रे... कसल्यातरी विचारात असल्यासारखे वाटले.

सौरभ – आपण त्यांना विचारायचे का ? काय झालं आहे ते?

प्रतीक – हो, चल विचारू.

सौरभ – काका, काय हो, आज तुमचं आमच्याकडे लक्षच नाही. काही बोलला नाही.

शामराव – अरे, पोरांनो खरंच माझं तुमच्याकडे लक्ष नव्हतं.

सौरभ – का, काय झालं? काही टेन्शन नाही ना?

प्रतीक – आम्ही काही मदत करू का?

शामराव – नाही रे बाळांनो. विशेष काही झालं नाही.

प्रतीक – नाही कसं, रोज आम्ही या रस्त्याने दुकानासमोरून जातो. तेव्हा रोज, “काय पोरांनो शाळेत निघाला का?” “ सुटली का शाळा?” अशी आपणहून आमची विचारपूस करता. मग आज काय झाले.

शामराव – अरे आता काय सांगू, मघाशी एका गिऱ्हाईकाने तीन हजार रुपयांची खरेदी केली. पण...

सौरभ – पण काय झालं काका ?

शामराव – त्या गिऱ्हाईकाने त्याच्या मोबाईल वरून मला ऑनलाईन पैसे पाठवले खरे....

सौरभ – मग काय प्रॉब्लेम आहे, पैसे पाठवले ना? मिळाले ना?

शामराव – पैसे पाठवले. पण मला ते मिळालेच नाही. ना मेसेज आला... ना या मशीनवर आवाज आला. कदाचित माझी फसवणूक झाली वाटतं.

प्रतीक – काका, तुम्ही त्या ग्राहकाला ओळखता का ?

शामराव – नाही ना. आता काय करावं तेच समजत नाही.

सौरभ – थांबा काका, तुमचा मोबाईल बघू. (शामराव सौरभला मोबाईल देतात.) अहो काका तुमचा मोबाईल तर बंद आहे. बहुतेक चार्जिंग संपल्याने तो बंद झाला असेल आणि चार्जिंगला लावल्यावर तुम्ही तो सुरु करायला विसरलात. मग पैसे मिळाल्याचा मेसेज कसा येईल?

प्रतीक – आणि काका, या क्यू आर कोड स्कॅनर मशीनचा आवाज पण बंद करून ठेवलाय. मग कसं ऐकू येईल? हे बघा या इथे आवाज कमी जास्त करायचे बटण आहे.

सौरभ – हा बघा मोबाईल सुरू केला आणि हा आला तुमचा पैसे मिळाल्याचा मेसेज.

शामराव – पोरांनो, आता या म्हाताऱ्या माणसाला एवढं सगळं नाही समजत. बरं झालं तुम्ही मदत केली. आता या सगळ्या गोष्टी मी नेहमी लक्षात ठेवेन. तुमचे खूप खूप आभार.

सौरभ – अहो काका आभार कसले मानता हो. आम्ही एवढं मोठं काय केलं.

प्रतीक – चल सौरभ, शाळा भरेल.

सौरभ – हो, चला येतो काका.

शामराव – धन्यवाद पोरांनो, शिक्षकदिनाला माझ्यातर्फे तुमच्या शिक्षकांना फुलं घेऊन जा. ज्यांनी तुमच्यासारखे विद्यार्थी घडवले त्यांना सुद्धा धन्यवाद दिले पाहिजेत.

- या प्रसंगातील पात्रांची निवड करून योग्य शब्दोच्चार व चढ-उतारासह प्रसंगांचे वाचन करून गटात सादरीकरण करा.
- वरील प्रसंगाचे वाचिक अभिनयासह वर्गात सादरीकरण घ्यावे. सादरीकरणाचे निरीक्षण करून व विद्यार्थ्यांकडून मिळालेल्या सूचनांनुसार आवश्यक बदल करून पुन्हा सादरीकरण करून घ्यावे.

CG -1
C- 1.1/1.2
LO-06AE24 /25

२. **खालील प्रसंगाचे संवाद लिहा.**

पावसाळा सुरू झाला होता. समीरला चिंता पडली होती, कारण त्याच्या घरात पाणी गळायला लागले होते. घराची दुरुस्ती करणे आवश्यक होते. त्याने ही समस्या शेजारी राहणाऱ्या राजाभाऊंना सांगितली. परंतु काम सुरू करण्यासाठी पैशांची अडचण होती. समीरचा गादी बनवण्याचा व्यवसाय होता. पावसाळ्यानंतर खऱ्या अर्थाने त्याचा व्यवसाय तेजीत येत असे आणि तेव्हा जास्त पैसे मिळत. पण घराच्या दुरुस्तीची गरज आता होती. हे ऐकून राजाभाऊंनी त्याला धीर दिला. गावातील सुधीर कोळीला बोलवायला एका मुलाला पाठवले. तेवढ्यात समोरून सोनबा येताना दिसला. तो सुतारकाम करत असे. राजाभाऊंनी त्याला हाक मारून बोलावले व समीरच्या घराच्या खांबांची दुरुस्ती करायची असल्याचे सांगितले. त्याने होकार दिला. पण पैशांची जुळवणी दिवाळीला होईल तोपर्यंत कामाचे पैसे मिळणार नाहीत ही कल्पना राजाभाऊंनी त्याला दिली. इतक्यात सरपंच देखील आले. त्यांनी देखील सोनबाला काम करण्यासाठी विनंती केली. तोपर्यंत सुधीर कोळी तेथे पोहोचला. सर्वांनी समीरची परिस्थिती त्याला समजून सांगितली तर त्यानेही दोन दिवसात कौलं बदलून देण्याचे आश्वासन दिले. समीरला आनंद झाला. त्याने सर्वांचे आभार मानले. सरपंचांना देखील सर्वांनी एकमेकांची मदत केल्याने छान वाटले. त्यांनी अशीच एकजूट ठेऊन एकमेकांना मदत करायला सांगितले. त्यामुळे गावाचे नाव मोठे होईल हे समजून सांगितले. सर्वांनी त्यास होकार दिला व सर्वजण आपापल्या घरी निघून गेले.

- वरील प्रसंगावर आधारीत संवाद लेखन वहीत करून वर्गात सादरीकरण करा.

## स्वाध्याय

- तुमच्या भाषा किंवा इतिहासाच्या पाठ्यपुस्तकातील कोणताही एक प्रसंग निवडून त्यावर आधारीत संवाद लेखन करून सादरीकरण करा.

- वरील प्रसंगातील पात्रांची निवड करून गटात सादरीकरण करून घ्यावे.
- आलेल्या सूचनांचा विचार करून योग्य तो बदल सुचवावा व पुन्हा सादरीकरण करून घ्यावे.

CG -1/2
C- 1.1/1.2 /2.1
LO06AE23/26
/27

# ८ छटा अभिनयाच्या

आपण यापूर्वी वेगवेगळ्या प्रसंगांवर नाटक सादर केले आहे. गटातील सर्वांनी वेगवेगळ्या भूमिका वाटून घेऊन प्रत्येकाने वेगवेगळी भूमिका सादर केली आहे. हो ना? पण आता एखाद्या प्रसंगातील सर्व भूमिका एकट्याला करायची आहे. कशी करायची? प्रश्न पडला ना! चला आता आपण करूनच पाहू.

## १) नाट्यछटा

**✻ खाली दिलेली नाट्यछटा वाचू आणि 'नाट्यछटा' हा कला प्रकार कसा आहे हे जाणून घेऊ.**

चला, एकदाचे जेवण उरकले. सणावाराला असे गोड-धोड खायला मज्जा येते. शाळेला सुट्टी म्हटल्यावर दुधात साखर पडल्या सारखेच. आता अशा दुपारच्या वेळेला पोटभर खाऊन थोड आडवं पडलं की मजाच मजा. काय म्हणता, अभ्यास नाही का? अहो तो तर असणारच ना. शाळा म्हटलं की अभ्यास हा आलाच. पण आत्ता तरी खूप कंटाळा आलाय, थोडी झोप घेतो आणि मग अभ्यासाला बसतो. काय गं आई, काय झालं? मला का हाक मारते आहेस? मी आत येऊ म्हणतेस? आता आत कशासाठी येऊ? काय म्हणतेस, स्वयंपाक घरात आवराआवर करायला थोडी मदत करू? पण तुझ्या मदतीला तिथे ताई आहे की, मग मी कशाला येऊ? काय म्हणते, माझी सुद्धा मदत लागणार आहे. अगं पण स्वयंपाक घरातली कामे मी कशाला करू, तू आणि ताई असताना माझी कशाला लुडबुड उगाच! माझ्यामुळे तुमच्या कामात अडचण यायची. त्यापेक्षा मी काही तरी वेगळे काम करतो. काय म्हणतेस ताई असो किंवा मी, आम्हा दोघांनाही समान काम करावे लागेल. अगं पण, तुमची बायकांची कामे तुम्हीच करा. माझी कामे मी करतो ना! काय म्हणते ताई, मी काय काम करणार आहे? तसं आत्ता तरी माझ्यासाठी योग्य काम नाही, पण बघू थोड्या वेळाने एखादे काम सुचेलच! आणि ताई तुला नको माझी काळजी बरं. काय म्हणते ताई, इथे पुरुषांची आणि बायकांची वेगवेगळी कामे असतात हे कोणी सांगितले? गुपचूप काम करायला ये. आई, तू ताईला नीट समजून सांग हं! नाहीतर उगाच आमची भांडणे होतील. थांब, त्यापेक्षा मी बाबांनाच तुझं नाव सांगतो. बाबा... ओ बाबा. ही ताई पहा ना मघापासून मला त्रास देतेय. काय म्हणताय काय झालं? अहो मला आत्ता आराम करायचा आहे आणि मला उगीच ही कामे लावत आहे. काय म्हणता बाबा, एकमेकांच्या कामाचा आदर करावा आणि एकमेकांना मदत करावी. अहो पण बाबा त्यांची कामे त्यांनी करावीत ना. काय म्हणता सर्व कामे एकसमान असतात. त्यात स्त्री पुरुष असा भेदभाव करायचा नसतो. पण बाबा, मी काय म्हणतो, ताई आईच्या मदतीला किचनमध्ये आहेच की! काय म्हणताय? आज ताई आहे, पण उद्या मोठी झाल्यावर तिचे लग्न झाले की, आपल्या दोघांनाच आईला मदत करावी लागेल? अरे हो, बाबा तुम्ही म्हणताय तेही खरंच आहे की! म्हणजे मलासुद्धा आजपासूनच काम करण्याची सवय लावून घ्यावी लागणार. थँक्यू बाबा, तुम्ही मला आत्ताच जाणीव करून दिलीत ते बरं झालं. ए आई... आलो गं, सांग बरं! काय काय कामे करायची राहिली आहेत. सांग लवकर, ही मी आत्ता आवरतो.

काय मित्रांनो , कशी वाटली नाट्यछटा?

- योग्य चढउतार व हावभावासह नाट्यछटा सादरीकरण करून घ्यावे व आवश्यक तो बदल सुचवून पुन्हा सादरीकरण करून घ्यावे.
- विद्यार्थ्यांकडून त्यांच्या अनुभवातील प्रसंगांवरून नाट्यछटा लेखन करण्यास मार्गदर्शन करावे व नाट्यछटा सादर करून घ्यावी.

CG -1
C- 2.1
LO-06AE28

खरं तर नाट्यछटा पाठ करून मग ती योग्य हावभावासहित रंगमंचावर सादर करायची असते. परंतु आधी आपण नाट्यछटा म्हणजे काय? हे समजून घेऊ म्हणजे ती सादर करायला सोपे होईल आणि आपल्याला सुद्धा नाट्यछटा लिहायला जमेल.

**नाट्यछटा म्हणजे एकाच पात्राने विविध पात्रांच्या केलेल्या भूमिका होय.**

नाट्यछटा एकट्याने सादर केला जाणारा कलाप्रकार आहे. एकच पात्र प्रेक्षकांशी बोलते, परंतु आजूबाजूला अजून काही पात्रे आहेत असा आभास निर्माण करते. वरील नाट्यछटा वाचताना यातील तुमच्याच वयाचा हा मुलगा एकटाच तुमच्याशी बोलताना दिसतो, पण त्याच्या आजूबाजूला आई, ताई व बाबा आहेत असे आपल्याला जाणवते. नाट्यछटा सादर करण्यासाठी नेपथ्य, रंगभूषा किंवा वेशभूषा केली जावी असा कोणता आग्रह नाही. परंतु सुचक रंगभूषा आणि वेशभूषा करायला हरकत नाही. सादरीकरण करताना विशेष रंगमंच किंवा नाट्यगृहाची आवश्यकता नाही. आपण आपल्या वर्गात, सभागृहात किंवा शाळेच्या स्टेजवरसुद्धा ही नाट्यछटा सादर करू शकतो . नाट्यछटेचा विषय आपल्याच वयोगटाचा निवडावा म्हणजे योग्य अर्थ समजून घेऊन ती सादर करायला सोपे जाते. आपली नाट्यछटा पाच ते सात मिनिटांची असावी. आपल्याच वयाच्या प्रेक्षकांना ती जास्त कंटाळवाणी न वाटता त्याचा अधिक आनंद घेता येईल.

### २) मूकाभिनयाची ओळख

शब्दांचा वापर न करता केवळ चेहऱ्यावरील हावभाव, शरीराची हालचाल आणि संकेतांच्या माध्यमातून एखादी कथा, प्रसंग किंवा भावना प्रेक्षकापर्यंत पोहोचवण्याची कला म्हणजेच मूकाभिनय होय. इंग्रजीत याला mime play असे म्हटले जाते. यात कलाकार पूर्णपणे '**मौन**' असतो. या कलेची काही महत्त्वाची वैशिष्ट्ये खालीलप्रमाणे आहेत:

- **शब्दांचा वापर नसणे** – मूकाभिनयात संवादांचा अजिबात वापर केला जात नाही. कलाकाराला जे काही सांगायचे आहे ते आपल्या शरीराच्या भाषेतून (Body Language) व्यक्त करतो.
- **चेहऱ्याच्या हावभावांना महत्त्व** – आनंद, दु:ख, राग किंवा भीती यांसारख्या भावना व्यक्त करण्यासाठी डोळ्यांचा आणि चेहऱ्याच्या स्नायूंचा प्रभावी वापर केला जातो.
- **काल्पनिक वस्तूंचा वापर** – मूक अभिनयात कलाकार प्रत्यक्षात नसलेल्या वस्तू (उदा. दरवाजा उघडणे, पाणी पिणे, पतंग उडवणे) अशा प्रकारे साकारतो की प्रेक्षकांना त्या वस्तू तिथे असल्याचा भास होतो.
- **रंगभूषा व वेशभूषा** – अनेकदा मूक अभिनय करणारे कलाकार चेहऱ्यावर पांढरा मेकअप (White face) आणि अंगावर काळे पांढरे कपडे वापरतात, जेणेकरून त्यांच्या हालचाली स्पष्टपणे उठून दिसतील. परंतु पात्रास अनुरूप वेशभूषा देखील करू शकता.
- **भाषेची मर्यादा नसणे** – ही कला केवळ मनोरंजनाचे साधन नाही. तर ती संवादाचे एक प्रभावी माध्यम आहे. जेव्हा भाषेचा अडथळा येतो, तेव्हा मूकाभिनय एकमेकांशी जोडण्याचे काम करतो.

**तुम्हाला माहित आहे का?**



चार्ली चॅप्लिन (Charlie Chaplin) यांना मूक अभिनय जगातातील महान कलाकार मानले जाते.

- एखादा प्रसंग निवडून त्यावर आधारीत संवाद विरहीत सादरीकरण करून घ्यावे. उपलब्ध साधनांद्वारे पार्श्वसंगीताची जोड द्यावी.

### ३) नवरसांची सफर

नाटक पाहताना प्रेक्षकांमध्ये विविध भावभावना निर्माण होत असतात. यासाठी त्या नाटकातील कलाकाराला आपल्याला प्रसंगानुरूप भाव निर्माण करावे लागतात. त्यामुळे प्रेक्षक विविध भावनांचा (रस) अनुभव घेतात. असे नऊ रस म्हणजेच मूळ भावना मानल्या जातात. चला, तर मग आपण या नवरसांची सफर करू.

या रे या मिळून सारे नाटक शिकू चला  
नवरसांची सफर आपण सारे करू चला



नाटकामध्ये गमतीचा प्रसंग हो आला,  
विनोद झाल्याने तिथे **हास्य** रस फुलला.



घाबरवणारा प्रसंग पाहून वाटते जेव्हा भिती,  
**भय** रसाची लगेच तेव्हा येते प्रचिती.



सुंदर कपडे अन् चेहऱ्यावर लाज,  
**शृंगार** रसाने रंगतो पात्रांचा साज.



किळस येता चेहरा वेडावाकडा होतो,  
**बीभत्स** रस तो कलाकार हुबेहूब दाखवतो.



पाय आपटत जेव्हा कलाकार रागाने ओरडतो,  
**रौद्र** रसाचा अवतार मंचावर मग घडतो.



युद्धाच्या प्रसंगाला सर्व सज्ज झाले,  
**वीर** रसाला सर्वांनी आपलेसे केले.



डोळे होतात मोठे अन् तोंड आ होते.  
**अद्‌भुत** रस म्हणजे जेव्हा आश्चर्य दिसते.



मन होते दुःखी किंवा येते सहानुभूती,  
संवादातून **करुण** रस सर्वांना दिसती.



धीर गंभीर संवाद बोलू काही महात्म्यांचे  
घडते तेव्हा सर्वांना दर्शन **शांत** रसाचे.

• **करून पाहू या :**

**कोणताही शब्द न उच्चारता केवळ शारीरिक हालचाल व चेहऱ्यावरील हावभावांद्वारे खालील कृती करा.**

१) चिखलातून चालणे.
२) अंधारातून रस्ता शोधणे.
३) डोक्यावरून ओझे वाहून नेणे.
४) नारळ सोलणे.
५) आरशासमोर मेकअप करणे.
६) रणांगणात जाणे.
७) पत्र वाचता वाचता दुःखी होणे.

**चला खेळूया खेळ :**

नऊ रसांच्या चिठ्ठ्या करून त्या एका भांड्यात ठेवा. एका वेळी एकाने एक चिट्ठी उचला. उचललेल्या चिठ्ठीमध्ये जो रस लिहिला असेल त्याप्रमाणे छोटी कृती करून दाखवा. त्यानंतर पुढील विद्यार्थ्यांनेदेखील दुसरी चिठ्ठी उचलून त्यामध्ये लिहिलेल्या रसावर आधारित कृती करून दाखवावी. याप्रमाणे नऊ रसांच्या नऊ कृती सर्वांनी करून दाखवा.



- नऊ रसांची ओळख विद्यार्थ्यांचा कृतियुक्त सहभाग घेऊन करून द्यावी.
- या गीताला आवडीची चाल लावून विद्यार्थ्यांकडून गाऊन घ्यावे.
- गाण्याच्या ओळीत ज्या रसाचा उल्लेख झाला आहे ती ओळ गाताना चेहऱ्यावर योग्य ते हावभाव व शारीरिक हालचाल करून ती ओळ गायली जावी.

CG –2
C– 2.2
LO–06AE29

## स्वाध्याय

१) तुमच्या वयोगटाला साजेशी एक नाट्यछटा लिहा किंवा तंत्रज्ञानाचा उपयोग करून एक नाट्यछटा निवडा व सराव सुरू करा. आवश्यक तेथे शिक्षकांची मदत घ्या.

२) खाली दिलेल्या चेहऱ्यांचे निरीक्षण करून कोणता रस आहे ते ओळखा.



................................ ................................ ................................ ................................

# ९ चला रंगमंचावर...

### ओळख रंगमंचाची

एखादी कलाकृती सादर करण्यासाठी जी मुख्य जागा असते त्या जागेला रंगमंच – संबोधले जाते. याची रचना करताना समोर सादर होणारी कला प्रेक्षकांना विनाव्यत्यय दिसेल याचा विचार केलेला असावा. तसेच रंगमंचाचा वापर कलाकाराने कसा करावा, संपूर्ण रंगमंचाचा वापर करत असताना त्याच्या नेमक्या कोणत्या भागाचा जास्त वापर करावा, तसेच नेपथ्याची मांडणी रंगमंचाच्या नेमकी कोणत्या भागात असावी, ज्यामुळे सादरीकरण सहज व नैसर्गिक वाटेल यासाठी रंगमंचाचा साधारण आराखडा खालील बाजूस दिलेला आहे.




नाट्यगृहामध्ये रंगमंचासोबतच रंगभूषा व वेशभूषा करण्यासाठी विशेष खोल्यांची व्यवस्था केलेली असते. पार्श्वसंगीत व प्रकाश योजनेसाठी रंगमंचाच्या शेजारी किंवा समोरील भागात स्वतंत्र व्यवस्था केलेली असते.

- विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष किंवा प्रतिकृतीद्वारे रंगमंचाची ओळख करून द्यावी.

CG –3
C– 3.2
LO–06AE32

**नेपथ्य**

नाटकातील प्रसंग अधिक वास्तववादी म्हणजेच खरे वाटावेत यासाठी रंगमंचावर त्याप्रमाणे साहित्याची मांडणी केली जाते. त्यास **'नेपथ्य'** म्हटले जाते.

नाटकातील वेळ, काळ, स्थळ व प्रसंग याचा विचार करून नेपथ्य उभे केले जाते. पडदा उघडल्यावर समोरचे नेपथ्य पाहिल्यावर प्रेक्षकांना त्या काळात गेल्याचा आभास निर्माण व्हावा. म्हणूनच नेपथ्याला नाटकातील 'मूक पात्र' देखील म्हणतात.

प्रामुख्याने नेपथ्याचे दोन गटांत विभाजन केले जाते.

१. स्थिर नेपथ्य (सेट)

२. हाताळले जाणारे नेपथ्य (हॅण्ड प्रॉपर्टी)

रंगमंचावर स्थिर नेपथ्य उभारताना पात्रांची ये जा व अभिनयासाठी आवश्यक जागा सोडून रंगमंचाच्या मागील भागात (मागील डावा, मागील मध्य, मागील उजवा) सेट उभा केला जातो. खर्च कमी करण्यासाठी सूचक नेपथ्याचा वापर देखील योग्य तेथे करता येतो, याला 'सिम्बॉलीक सेट' असे म्हणतात. उदा. बसस्टॉप दाखवायचा असेल तर उभी काठी व त्याला बसस्टॉप लिहिलेली पाटी असे दाखवता येते.

नेपथ्य तयार करणाऱ्या कलाकारास 'नेपथ्यकार ' असे म्हणतात. नाटकाच्या विषयानुसार व त्यातील पात्रांच्या हालचालींचा विचार करून नेपथ्यकार त्या नाटकाच्या दिग्दर्शकाच्या सल्ल्यानुसार नेपथ्याचा आराखडा तयार करत असतो. म्हणजेच प्रथम नेपथ्याचे चित्र कागदावर रेखाटतो.

काही वेळेला रंगमंचाची प्रतिकृती तयार करून कलाकारांना त्यांचा रंगमंचावरील वावर समजून सांगितला जातो. यामुळे कलाकारांना प्रत्यक्ष सादरीकरणात मदत होते.





**रंगमंचाची प्रतिकृती**

- विद्यार्थ्यांकडून उपलब्ध साहित्याचा वापर करून रंगमंच प्रतिकृती तयार करून घ्यावी.
- रंगभूषा, वेशभूषा प्रकाश, ध्वनी आणि मास्क यांच्या योग्य नियोजनामुळे नाटक अधिक प्रभावी व जिवंत होते हे समजावून सांगावे.

CG –3
C– 3.1/3.2
LO–06AE31/ 32

## 'नाटकाची जादुई तयारी'

नाटक म्हणजे केवळ संवाद म्हणणे नाही, तर त्या पात्राला आपल्या भूमिकेतून जिवंत करणे होय. रंगमंचावर कलाकार जेव्हा वेगळ्या रूपात दिसतो तेव्हा आपण सर्व आश्चर्यचकित होतो. चेहऱ्यावरची रंगभूषा आणि अंगावरील वेशभूषा यामुळे साधा विद्यार्थीही राजा, राणी किवा राक्षसासारखा दिसू लागतो. चला तर मग, रंगभूषा आणि वेशभूषेची मजा गोष्टीतून जाणून घेऊ या!

काही दिवसांवरच गणपती उत्सव आला होता. या उत्सवात सोनालीच्या परिसरातील मित्रांनी एक छोटीशी नाटिका सादर करण्याचे ठरवले. सर्वजण खूप आनंदाने आणि उत्साहाने त्याची तयारी करू लागले. सगळी तयारी झाली. सर्व पात्रांचे डायलॉगसुद्धा पाठ झाले. सर्वांनी अगदी परफेक्ट सराव केला होता. आता सगळेजण नाटक सादर करण्यासाठी आतुर होते.

नाटकाच्या दिवशी सर्व जण रंगमंचाच्या मागे गोळा झाले. गावातले प्रसिद्ध रंगभूषा करणारे रमेशकाका हजर होते. रमेशकाकांना पाहून काही मुलांना प्रश्न पडला, ती मुले एकमेकांशी कुजबुज करू लागली, " नाटकाच्या सरावाला रमेशकाका तर नव्हते मग आता इथे का आले आहेत?" तेवढ्यात गुरुजींनी त्यांचा प्रश्न ऐकला आणि गुरुजी तिथे येऊन म्हणाले, " बाळांनो, तुम्ही ज्या पात्रांची भूमिका करणार आहात त्याची वेशभूषा, रंगभूषा हे रमेशकाका करणार आहेत." मुलं विचारात पडली. "रंगभूषा? रंगभूषा म्हणजे काय हो गुरुजी?" गुरुजींनी त्या निरागस छोट्या मुलांना जवळ घेतलं आणि ते म्हणाले, "रंगभूषा म्हणजे आपण सुंदर दिसण्यासाठी केलेली चेहऱ्यावरील रंगरंगोटी किंवा एखाद्या व्यक्तीची नक्कल करण्यासाठी केलेली तयारी म्हणजे तुमच्या भाषेत मेकअप." मुलांना त्यांच्या भाषेत साध्या शब्दात सांगितलेली रंगभूषा व वेशभूषा थोडक्यात समजली.

अस्लमला या नाटकात राजाची भूमिका करायची संधी मिळाली होती. रमेशकाकांनी उंच धिप्पाड असणाऱ्या अस्लमला हलकासा मेकअप केला, भरगच्च मिशा काढल्या, पिवळ्या रंगाचे धोतर, अंगावर शेला, गळ्यात मोत्याच्या माळा, कानात मोत्याचे डूल, हाताला बाजूबंद, कमरेला तलवार आणि डोक्यावर मुकुट चढवला. अस्लमने आपले रूप आरशात पाहिले आणि तो चमकलाच. त्याला खूप आनंद झाला. अमर चकित होऊन म्हणाला, "अरे वा! अस्लम तर अगदी खराखुरा राजा दिसतोय. रमेश काकांनी तर कमालच केली." रमेशकाका मोठ्याने हसले आणि म्हणाले, "अमर, तुझी राक्षसाची भूमिका आहे ना? आता तुला राक्षस बनवतो, ये बघू इकडे." अमर हसतच त्यांच्याजवळ गेला. रमेशकाकांनी अमरला काळ्या भडक रंगाचा मेकअप केला. काळया पांढऱ्या रंगाची डोक्यावर छोटी शिंगे लावली, डोळ्याजवळ लाल रंग फासला. त्यामुळे त्याचे डोळे भयानक दिसू लागले, त्याला ओठांच्या बाहेर पडलेले नकली दात लावले, हातात धारदार शस्त्र, उघडा काळा देह, फक्त कमरेभोवती लाल रंगाचे वस्त्र, गळ्यात कवड्याच्या माळा घातल्या आणि अमरचा राक्षस बनला. सगळे त्याच्याकडे पाहून क्षणभर घाबरलेच. तेवढ्यात स्वतःचा मेकअप करून घ्यायला अचानक आलेल्या सोनालीच्या समोर अमरने उडी मारली. सोनाली चांगलीच घाबरली, तिला घामच फुटला. ती रडकुंडीला आल्याबरोबर रोहन तिला म्हणाला, "अरे यार, थांबा रे! सोनाली, अगं, हा अमर आहे. आपल्या नाटकातला राक्षस." सोनाली डोळे फाडून त्याच्याकडे रागाने पाहू लागली. अमर हसून तिला "सॉरी" म्हणाला. आणि सगळे हसू लागले. सोनालीने अमरला पाठीत धपाटा घातला आणि ती रमेशकाकांकडे जाऊन म्हणाली, "काका आता मला मेकअप करा ना." रमेशकाकांनी सोनालीला मेकअप करायला सुरुवात केली.







सोनाली अगदी सुंदर मुलगी होती. रमेशकाकांनी तिला अगदी हलकासा मेकअप केला. गालावर रंग लावून गाल गुलाबी केले. तिच्या केसांची छान केशभूषा केली, सोनालीने घेरदार जाळीचा झगा घातला, कमरेला खोट्या हिऱ्यांचा कमरबंद, कानात हिऱ्यांची कुडी, तशाच हातात बांगड्या, डोक्यावर नाजूक छोटासा हिऱ्यांचाच मुकुट घातला, त्यावर तिने सुंदर सोनेरी जाळीदार ओढणी घेतली, पायात छनछन करणारे पैंजण घातले, कपाळावर छोटीशी नाजूक बिंदी लावून सोनाली तयार झाली. तिने आरशात आपले रूप पाहिले आणि ती स्वतःवरच जाम खूश झाली. तिने स्वतःभोवतीच एक गोल गिरकी घेतली आणि रमेशकाकांना गोड आवाजात 'थँक्यु' म्हणत ती मैत्रिणींकडे पळालीसुद्धा.

अशा तऱ्हेने सर्वांचीच रंगभूषा आणि वेशभूषा करून रमेशकाकांनी सर्वांना नाटकासाठी शुभेच्छा दिल्या. सर्व मुलांनी रमेशकाकांना नमस्कार केला आणि त्यांचे आभार मानले.

इकडे रंगमंचावर गावातल्या दामोदर काकांनी जबरदस्त प्रकाश योजना केली होती. लाल, निळ्या, पिवळ्या रंगाचे फोकस लाईट रंगमंचाच्या समोर लावले होते. रंगमंच अगदी लख्ख झगमगत होता. माईक रंगमंचाच्या समोर टांगलेले होते.

- प्रत्यक्ष 'रंगभूषेची' काही प्रात्यक्षिके उपलब्ध साहित्यांच्या आधारे (उदा. वृद्ध व्यक्तीसाठी दाढी मिशा केसांना पांढरा रंग लावणे किंवा मिशा काढणे) वर्गात करून घ्यावीत.

CG -3
C- 3.2
LO-06AE33



नाटकाची तिसरी घंटा झाली आणि नाटकाला सुरुवात झाली. रंगमंचावर पडदा उघडताच राजदरबारात राजावर प्रकाशाचा झोत पडला. रंगमंचावर येताच सर्व विद्यार्थ्यांनी आपापली भूमिका उत्कृष्टपणे सादर केली. सराव तर त्यांचा चांगला झालाच होता, पण सुंदर रंगभूषा आणि वेशभूषेमुळे सर्वांची पात्रे उठावदार झाली. नाटकाला टाळ्यांचा कडकडाट झाला.

आता तुमच्या लक्षात आलेच असेल की रंगभूषा व वेशभूषा यांमुळे नाटक अधिक प्रभावी आणि आकर्षक बनते, कलाकारांची भूमिका जिवंत होते. त्यामुळे नाट्य सादरीकरणात या दोन्ही घटकांना खूप महत्त्व आहे. अभिनय करताना पात्राच्या चेहऱ्यावर स्वभावानुसार व योग्य भावभावना दाखवण्यासाठी चेहरा, डोळे, केस इत्यादी केलेली सजावट म्हणजे रंगभूषा. तसेच त्यांना केलेला पोशाख, कपडे, दागिने, शिरोभूषणे व इतर वस्तू यांना 'वेशभूषा' म्हणतात. नाटक किंवा रंगमंचावरील सादरीकरण अधिक प्रभावी करण्यासाठी रंगभूषा व वेशभूषा यांना विशेष महत्त्व आहे. हे आता आपल्याला कळलेच असेल.



**तिसरी घंटा**

नाटक सुरू होण्याआधी थोड्या थोड्या वेळाच्या अंतराने तीन वेळा घंटा वाजवली जाते. पहिली घंटा प्रेक्षकांना नाट्यगृहात आपापल्या जागेवर बसण्यासाठी तर दुसरी घंटा नाटकाची पूर्वतयारी झाली असून नाटक लवकरच सुरू होईल याची सूचना देते. तिसरी घंटा नाटकाची सुरुवात होताना दिली जाते. पडदा उघडतो व नाटकास सुरुवात होते.

## रंगमंच शिष्टाचार

आपण नाटक पाहतो किंवा सादर करतो. तेव्हा रंगमंचावर अनेक कलाकार काम करत असतात. रंगमंच म्हणजे ज्या ठिकाणी नाटक सादर होते ती जागा होय. नाटक सुंदर आणि अधिक प्रभावी होण्यासाठी कलाकारांनी काही नियम आणि शिष्टाचार पाळणे खूप महत्त्वाचे असते. या नियमांनाच रंगमंच शिष्टाचार असे म्हणतात.

### ❉ रंगमंच शिष्टाचार – कलाकारांसाठी

- दिलेले संवाद व्यवस्थित पाठ करावेत.
- सादरीकरणात आपले संवाद स्पष्टपणे उच्चारावेत.
- सरावाच्या किंवा प्रयोगाच्या ठिकाणी शांतता राखावी.
- योग्य देहबोली व हावभाव वापरावेत.
- सादरीकरणासाठी काही वेळ आधी रंगमंचावर पोहोचावे.
- सादरीकरणासाठी वापरले जाणारे साहित्य योग्य जागेवर ठेवावे.
- सहकलाकारांचा आदर करावा.
- योग्य वेळेत रंगभूषा, वेशभूषा करून घ्यावी. दिग्दर्शकांने सांगितलेल्या सूचनांप्रमाणे सादरीकरण करावे.
- रंगमंचावर प्रवेश करण्याची वेळ व जाण्याची वेळ पाळावे.
- सादरीकरणावेळी रंगमंचावर धावपळ करू नये .
- आत्मविश्वासाने रंगमंचावर वावरावे.
- सादरीकरणात इतरांना सहकार्य करावे. सादरीकरणातील वस्तू योग्यपणे हाताळाव्या.

कलाकारांनी ज्याप्रमाणे रंगमंच शिष्टाचार पाळणे आवश्यक आहे. त्याचप्रमाणे कलेचे सादरीकरण विनाव्यत्यय होण्यासाठी प्रेक्षकांची भूमिका देखील महत्त्वाची असते.

### ❉ रंगमंच शिष्टाचार – प्रेक्षकांसाठी

- सादरीकरण पाहण्यासाठी वेळेवर पोहोचावे.
- शांतता राखण्यासाठी सहकार्य करावे.
- संपूर्ण सादरीकरण पहावे. मध्येच उठून जाऊ नये .
- कलाकारांचे कौतुक करावे, त्यांना प्रोत्साहन द्यावे व योग्यवेळी दाद द्यावी.
- मोबाईल व इतर तांत्रिक साधने सादरीकरणाच्या वेळी बंद ठेवावी.
- कलाकारांचे लक्ष विचलित होईल अशी कृती करू नये.

- विद्यार्थ्यांना विविध भूमिका देऊन त्याप्रमाणे त्यांना रंगभूषा कशी करता येईल याविषयी चर्चा करावी.
  - उपलब्ध साहित्याच्या मदतीने एकमेकांची रंगभूषा करण्यास प्रवृत्त करा.
  - रंगभूषेचे प्रात्यक्षिक प्रत्यक्ष अथवा तंत्रज्ञानाच्या मदतीने दाखवावे.

CG –3
C– 3.2
LO–06AE33

## स्वाध्याय

**१) खालील चेहऱ्यांना नावाप्रमाणे रंगभूषा करा.**



राक्षस



विदूषक



आजोबा



राणी

**२) दिलेल्या चित्रांना वेशभूषेप्रमाणे नावे द्या.**



......................



......................



......................



......................

**३) विचार करा व लिहा.**

१. जंगलातील प्रसंग सादर करताना ध्वनी व प्रकाश योजना कशी कराल?

२. वर्गात कोणत्याही एखाद्या प्रसंग सादरीकरणासाठी उपलब्ध साधनांचा माध्यमातून ध्वनी व प्रकाश योजना कशी कराल ते लिहा.

- विद्यार्थ्यांना रंगमंच शिष्टाचार कलाकारांसाठी आणि प्रेक्षकांसाठी वेगळे असतात व ते कोणते असतात याची माहिती करून द्यावी.

CG -3
C- 3.1
LO-06AE30

# १० परंपरा नाट्याची

## लोककला व संस्कृती

महाराष्ट्राची लोकसंस्कृती व लोककला या समृद्ध व वैशिष्ट्यपूर्ण आहे. हा आपल्या सांस्कृतिक वारशाचा अमूल्य ठेवा आहे. या लोककला गावोगावी सण, उत्सव, यात्रा आणि जत्रांमध्ये सादर केल्या जातात. या कलांमधून समाज प्रबोधन, मनोरंजन आणि संस्कार यांचा सुंदर संगम घडून येतो.

लोकनाट्य, दशावतार, लळीत, गोंधळ, भारूड, वगनाट्य, वासुदेव, डोंबाऱ्याचे खेळ, भजन, कीर्तन यांचा लोककलेत समावेश होतो. या सर्व लोककला नाट्य सादरीकरणाशी संबंधित आहेत.

१. तमाशा ही महाराष्ट्रातील सर्वात लोकप्रिय लोकनाट्यकला आहे. यात लावणी, नृत्य, गण-गवळण, वग, विनोद आणि संवाद यांचा उत्स्फूर्त समावेश असतो. तमाशातून सामाजिक विषयांवर प्रबोधन केले जाते.

२. दशावतार - ही कोकण भागातील पारंपरिक नाट्यकला आहे.

या कलेत विष्णूच्या दहा अवतारांची कथा सादर केली जाते. रंगीबेरंगी वेशभूषा, मुखवटे अणि प्रभावी संवाद हे या कलेचे वैशिष्ट्य आहे. धार्मिक व नैतिक संदेश देणे हा यामागील उद्देश असतो.



गण-गवळण



दशावतार



भारूड




लोकनाट्य

## लोकनाट्य

शाळेत वार्षिक स्नेहसंमेलनाची तयारी सुरू होती. सहावीच्या वर्गात वर्गशिक्षिका आल्या.

**मॅडम –** मुलांनो, यंदा आपण लोककलेवर आधारित सादरीकरण करणार आहोत.

**विद्यार्थी –** खूप मजा येईल!

**सोनाली –** मॅडम लोककला म्हणजे नेमकं काय ?

**मॅडम –** आपल्या महाराष्ट्रात गावोगावी सादर होणाऱ्या पारंपरिक कलांना 'लोककला' म्हणतात. यात गाणी, नृत्य, संवाद आणि विनोद यांचा समावेश असतो. यात लोकनाट्य, दशावतार, गोंधळ, लळीत, भारूड, कीर्तन, वगनाट्य, वासुदेव इत्यादींचा समावेश असतो.

**राहुल –** मॅडम, तमाशा म्हणजे काय?

**मॅडम –** तमाशा ही महाराष्ट्रातील प्रसिद्ध लोकनाट्यकला आहे. यात गाणी, नृत्य, गण-गवळण, वग, विनोद आणि उत्स्फूर्त संवाद यांचा समावेश असतो. यातून सामाजिक विषयांवर प्रबोधन केले जाते.

**अनिता –** मॅडम, आमच्या गावी (कोकणात) असाच जत्रेत एक प्रकार आहे. तो 'दशावतार' म्हणून ओळखला जातो.

**मॅडम–** अगदी बरोबर, यात भगवान विष्णूच्या दहा अवतारांची कथा दाखवली जाते.

**सोनाली –** त्यात मोठेमोठे मुखवटे आणि रंगीत कपडे असतात ना?

**मॅडम –** बरोबर तीच त्याची खासियत आहे.

**अमोल –** मॅडम, लळीतबद्दल सांगा ना!

**मॅडम –** लळीत हा महाराष्ट्रातील उत्सवाच्या सांगतेच्या वेळी सादर होणारा पारंपरिक लोककला प्रकार आहे. यामध्ये विविध सोंगे घेऊन (वेशभूषा करून) कीर्तन, नृत्य, गायन, अभिनय यांतून प्रबोधन केले जाते.

**विद्यार्थी –** मग आपण यातील कोणती लोककला सादर करू या?

**मॅडम –** आपण सामाजिक विषयावर छोटे नाट्य लिहू व आपल्या परिसरातील एका लोककला प्रकारात सादर करूया.

**विद्यार्थी–** हो मॅडम, आम्ही तशी तयारी करू.

**मॅडम –** आता कोणता कलाप्रकार निवडायचा ते ठरवा आणि लगेच लागा तयारीला.

- लोककला प्रकारांचे व्हिडिओ तंत्रज्ञानाच्या मदतीने विद्यार्थ्यांना दाखवावेत.
- माहीत असलेल्या लोककलांवर चर्चा घडवून आणावी.
- कोणत्याही एका लोककलाप्रकाराचे सादरीकरण करून घ्यावे.

CG -4
C- 4.1
LO-06AE34/35









## एका कलाकाराचा परिचय

शाळेत सहावीच्या वर्गात नाट्यकलेचा तास चालू होता.

मुलांनो तुम्ही सर्व जण नाटक सिनेमा पाहता ना ? त्यात तुमचे कोणी आवडते अभिनेते, अभिनेत्री असतीलच. त्यातील काही हिंदी मराठी अभिनेत्यांची नावे तुम्हाला माहीत असतीलच.

तर आज आपण एका अष्टपैलू अभिनेत्याबद्दल जाणून घेऊ या. त्या अभिनेत्याचे नाव आहे **दिलीप प्रभावळकर.**

## दिलीप प्रभावळकर

**जन्म** ४ ऑगस्ट १९४४ मध्ये मुंबई येथे झाला.

**शिक्षण** – विज्ञान शाखेत 'भौतिक शास्त्र' या विषयात पदवी प्राप्त केली.

**लेखन** – बालसाहित्य आणि विनोदी लेखन केले. त्यांच्या लेखनातून मुलांना मनोरंजनासोबतच चांगले संस्कारही मिळतात.

१. 'बोक्या सातबंडे' ही पुस्तक मालिका खूप लोकप्रिय आहे.
२. गुगली रंजक कथा संग्रह
३. हसवा फसवी–एकपात्री नाटक

**प्रसिद्ध भूमिका–**

१. आबा टिपरे – मालिका 'श्रीयुत गंगाधर टिपरे'
२. तात्या विंचू– चित्रपट 'झपाटलेला'
३. चींची चेटकिन– नाटक 'अलबत्या गलबत्या'
४. हसवा फसवी – विनोदी नाटकातील विविध सहा भूमिका
५. महात्मा गांधी – लगे रहो मुन्ना भाई चित्रपटात
६. नंदू– हा मतिमंद तरुण – चौकट राजा चित्रपट
७. चिमणराव – मालिका 'चिमणराव आणि गुंड्याभाऊ'

**प्राप्त पुरस्कार –**

१. लगे रहो मुन्नाभाई (हिंदी) चित्रपटातील महात्मा गांधी यांच्या भूमिकेसाठी सर्वोत्कृष्ट

साहाय्यक अभिनेता राष्ट्रीय चित्रपट पुरस्कार.
२. चौकट राजा चित्रपटातील 'नंदू' या मतिमंद तरुणाच्या भूमिकेसाठी महाराष्ट्र राज्य चित्रपट पुरस्कार.
३. संगीत नाटक अकादमी पुरस्कार.
४. 'बोक्या सातबंडे' मालिकेसाठी बालसाहित्य पुरस्कार व साहित्य अकादमी पुरस्कार.
५. 'दशावतार' या चित्रपटासाठी सर्वोत्कृष्ट अभिनेता पुरस्कार

## स्वाध्याय

१. तुम्ही कोणते लोकनाट्य पाहिले आहे ? त्याचा अनुभव लिहा. लोकनाट्यातून मिळणारा संदेश तुमच्या शब्दात लिहा.
२. आपल्या परिसरातील लोककलेची माहिती छायाचित्रांसह जमा करा.
३. आपल्या परिसरातील एक लोककला निवडा. ती कोणत्या प्रसंगी सादर होते याविषयी माहिती लिहा.
४. परिसरातील लोककलेसंदर्भातील वेशभूषा व वाद्ये यांची माहिती मिळवा.
५. आपल्या आवडत्या लोककलेचे चित्र काढा व रंगवा.
६. आपल्या परिसरातील एखाद्या वयोवृद्ध व्यक्तीची मुलाखत घ्या. त्यांच्याकडून लोककलांविषयी माहिती जाणून घ्या.
७. आपल्या आवडत्या कलाकाराच्या माहितीचे छायाचित्रासहीत संकलन करा. या माहितीवर आधारित अहवाल सादर करा.

- तंत्रज्ञानाच्या सहाय्याने दिलीप प्रभावळकरांची अधिक माहिती मिळवून वर्गात सांगावी.
- त्यांनी लिहिलेले एखादे नाटक, एकांकिकेचे वाचन करून घ्या.
- विद्यार्थ्यांना आपल्या आवडत्या कलाकाराची माहिती संकलित करायला सांगावी.
- माहितीचे एकत्रिकरण करून त्याचे हस्तलिखित तयार करावे.

CG -4
C- 4.2
LO-06AE36

# संगीत



# ११ लय व तालाची ओळख

आपल्या चालण्याची गती, श्वासाची गती, बोलण्याची गती यांमध्ये आपल्याला लयीचा अनुभव येतो. तसेच निसर्गातील झाडांची हालचाल, पावसाच्या थेंबांची गती यांमध्येही एक प्रकारची लय असते.

घड्याळाकडे पाहिल्यास आपल्याला त्याचे तीन काटे (तास, मिनिट व सेकंद) वेगवेगळ्या गतीने फिरताना दिसतात.

- **तास काटा :** विलंबित लय
- **मिनिट काटा :** मध्य लय
- **सेकंद काटा :** द्रुत लय




संगीतामध्ये लय (Laya) म्हणजे 'एखाद्या क्रियेचा किंवा गतीचा समान वेग'. जेव्हा दोन मात्रांमधील (वेळेच्या अंतरातील) गती सतत समान राहते, तेव्हा त्याला 'लय' असे म्हणतात.

## लयीचे प्रकार :

शास्त्रीय संगीतामध्ये लयीचे मुख्य तीन प्रकार मानले जातात:

१) **विलंबित लय :** ही अत्यंत संथ गतीची लय असते. जेव्हा दोन मात्रांमधील कालखंड जास्त असतो, तेव्हा त्यास 'विलंबित लय' म्हणतात. (उदा. घड्याळ्याच्या तास काट्याप्रमाणे.)

२) **मध्य लय :** ही साधारणपणे घड्याळाच्या मिनिट काट्याप्रमाणे चालणारी लय असते. ही विलंबित लयीपेक्षा थोडी जास्त वेगाने असते. (उदा. घड्याळ्याच्या मिनिट काट्याप्रमाणे.)

३) **द्रुत लय :** ही अत्यंत वेगवान लय असते. मध्य लयीच्या दुपटीने किंवा त्यापेक्षा जास्त वेगाने ही लय चालते. (उदा. घड्याळ्याच्या सेकंद काट्याप्रमाणे.)

दैनंदिन जीवनातील लयीचे उदाहरण :

**संथ गती**



**मध्यमगती**



**द्रुत गती**



- लय व लयीचे प्रकार समजावून सांगा.

CG -1
C- 1.1
LO-06AE37

**विविध लय प्रकार समजण्यासाठी विलंबित लयीतील भावगीत ऐकू या व म्हणू या.**

**विलंबित लयीतील भावगीत**

**॥घनश्याम सुंदरा॥**

घनश्याम सुंदरा श्रीधरा, अरुणोदय झाला
उठी लवकरि वनमाळी उदयाचळीं मित्र आला॥धृ॥
आनंद कंदा प्रभात झाली,
उठी सरली राती, काढि धार क्षिरपात्र
घेउनी धेनू हंबरती,
लक्षिताती वांसुरे हरी धेनुस्तनपानाला ॥१॥
सायंकाळी एकेमेळी द्विजगण अवघे वृक्षी
अरुणोदय होताच उडाले चरावया पक्षी,
प्रभातकाळी उठुनि कावडी तीर्थपंथ लक्षी
करुनि सडासंमार्जन गोपी कुंभ घेऊनि कुक्षी
यमुनाजळासी जाती मुकुंदा दध्योदन भक्षी ॥२॥

**कवि – शाहीर होनाजी बाळा**



**विलंबित लयीतील गीतांची आणखी काही उदाहरणे.**

१) एक धागा सुखाचा

२) अशी पाखरे येती

ही गीते ऐकून गाण्याचा प्रयत्न करा.

- विविध सांगितीक गीते प्रथमत: ऐकताना संथ लयीमध्ये ऐकवावीत.
- प्रथम पृष्ठावरील क्यू. आर्. कोड मधील गीत ऐकवावे व गायन करून घ्यावे.

CG –1
C– 1.1
LO–06AE37

**✻ भावगीत ✻**

**आता आपण मध्य लयीतील गीत शिकू या.**

**मध्य लयीतील चित्रपट गीत**

**ऐरणीच्या देवा तुला...**

ऐरणीच्या देवा तुला ठिणगी ठिणगी वाहू दे
आभाळागत माया तुझी आम्हांवरी राहू दे ! ॥ धृ ॥

लेऊ लेणं गरिबीचं
चणं खाऊ लोखंडाचं
जिणं व्हावं आबरूचं
धनी मातुर माझा देवा, वाघावाणी असू दे ! ॥ १ ॥

लक्ष्मीच्या हातातली
चवरी व्हावी वरखाली
इडापीडा जाईल आली, किरपा तुझी
भात्यातल्या सुरासंग गाऊ दे ! ॥ २ ॥

सुख थोडं दुःख भारी
दुनिया ही भली-बुरी
घाव बसंल घावावरी
सोसायाला, झुंजायाला अंगी बळ येऊ दे ! ॥ ३ ॥

**कवी : जगदीश खेबूडकर**



**मध्य लयीतील गीतांची आणखी काही उदाहरणे.**

१) एका तळ्यात होती      २) हमको मन की शक्ती देना मन विजय करे

ही गीते ऐकून गाण्याचा प्रयत्न करा

- मध्य लयीतील विविध गाणी ऐकवावीत.
- 'भावगीत, भक्तीगीत आणि कोळीगीत' यांची काही उदाहरणे द्यावी. या व्यतिरिक्त स्थानिक पातळीवरील गीतांचा देखील समावेश करावा.
- प्रथम पृष्ठावरील क्यू. आर्. कोड मधील गीत ऐकवावे व गायन करून घ्यावे.

CG -1
C- 1.1
LO-06AE37

**✻ पोवाडा ✻**

**आता आपण द्रुत लयीतील गीत शिकू या. द्रुत लय ही मध्य लयीपेक्षा जलद असते.**

**छत्रपती शिवाजी महाराजांचा पोवाडा**



आधी नमन शिवरायाला । महाराष्ट्राला।
शूर वीराला मराठी सत्तेचा पहिला राजा।
जगामध्ये आहे गाजावाजा स्वीकारा लवुनी मुजरा माझा ॥
राझ्यांचा पाटील अभिमानी। अन्यायाचा धनी।
करी मनमानी छळाने त्रस्त झाला समुदाय। जनतेकडे
नव्हता याचा उपाय राजाने तोडले त्याचे हातपाय ॥

(**गद्य:** स्त्रीयांवर अन्याय करणाऱ्यांना कठोर शासन करुन स्त्रीयांच्या स्वाभिमानाचे रक्षण केले.)

अफझल खान कपटी सरदार। ताकदीचा फार।
अतिशय क्रूर भेटीचा त्याने टाकला डाव।
दगलबाजीने घातला घाव त्यास मारून मिळविले नाव ॥

(**गद्य:** स्वराज्यावर आलेले बलाढ्य संकट स्वतः सामोरे जाऊन नष्ट केले.)

मग आला शाहिस्ते खान। होऊन बेभान।
उठविले रान सैन्य संख्येने होते मोठे।
लाल महालात बिऱ्हाड थाटे।
शिवबाने कापली त्याची बोटे ॥

(**गद्य:** गनिमी काव्याने शत्रूला पळता भुई थोडी केली. अतिशय चतुर, निर्भीड पराक्रमी महाराजांनी सर्व धर्मांच्या व्यक्तींना घेऊन स्वराज्य उभारले.)

एक एक लाभला शिलेदार। लहान असो थोर।
उदार जीवावर शिवा काशीद बाजीप्रभूने।
वीर तानाजी मालुसरेने दिली कितीकांनी
बलिदाने ॥
जयजयकार करू राजाचा।
छत्रपतीचा राज्याभिषेकाचा।
आनंद झाला महाराष्ट्रास। सोहळा अभिमानाचा खास
प्रणाम त्या कर्तृत्वाच्या सूर्यास ॥

**– डॉ. गंगाधर चंद्रभागा बापू रासगे**

**द्रुत लयीतील गीतांची आणखी काही उदाहरणे.**

१) शूर आम्ही सरदार ...
२) म्यानातून उसळे...

ही गीते ऐकून गाण्याचा प्रयत्न करा.

- लयीच्या माध्यमातून सदर गीताचा सराव करून घ्यावा.
- प्रथम पृष्ठावरील क्यू. आर. कोड स्कॅन करून विद्यार्थ्यांना गीत ऐकवावे.
- विलंबित, मध्य व द्रुत लय प्रकारातील भावगीते, भक्तीगीते, देशभक्तीपर गीते आणि पोवाडे यांचा सराव घ्यावा
- प्रथम पृष्ठावरील क्यू. आर्. कोड मधील गीत ऐकवावे व गायन करून घ्यावे.

CG –1
C– 1.1
LO–06AE37

## ताल एकताल (एकपट व दुप्पट)

ताल व लयीचे प्रात्यक्षिक करताना एकतालाच्या टाळीच्या माध्यमातून सादरीकरण करू या.

तालाची माहिती :

**मात्रा** : १२

**विभाग** : ६ (प्रत्येक विभागात दोन मात्रा)

**सम** : पहिल्या मात्रेवर 'समेचे' चिन्ह 'x' आहे.

**काल/खाली मात्रा** : ३ व ७ व्या मात्रेवर. कालाचे चिन्ह ० आहे. ही मात्रा हात बाजूला करून दाखवावी.

**टाळी** : १, ५, ९ व ११ व्या मात्रेवर. या मात्रांवर एकच टाळी वाजवावी.

### ताल एकताल – एकपट म्हणजेच मूळ लय.

| मात्रा | १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० | ११ | १२ |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| बोल | धिं | धिं | धागे | त्रक | तू | ना | कत | त्तीं | धागे | त्रक | धि | ना |
| चिन्ह | × | | ० | | २ | | ० | | ३ | | ४ | |

### ताल एकताल – दुप्पट म्हणजेच एका मात्रेत दोन मात्रा घेणे.

| मात्रा | १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० | ११ | १२ |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| बोल | धिंधिं | धागेत्रक | तूना | कत्तीं | धागेत्रक | धिना | धिंधिं | धागेत्रक | तूना | कत्तीं | धागेत्रक | धिना |
| चिन्ह | × | | ० | | २ | | ० | | ३ | | ४ | |

**करून पहा :**

- एका विद्यार्थ्याने तबल्यावर बोल वाजवावेत व इतरांनी ताल ओळखावा.

| एकपट | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| धा | गे | न | ती | न | क | धि | न |
| **दुप्पट** | | | | | | | |
| धा गे | न ती | न क | धि न | धा गे | न ती | न क | धि न |

- तालाची एकपट व दुप्पट टाळीच्या आधारे करून दाखवावी व सराव करून घ्यावा.
- मागील वर्षाच्या अभ्यासक्रमातील ताल वाजवून ओळखण्यास सांगावे.
- प्रथम पृष्ठावरील क्यू आर कोडमधील ताल व त्याची दुप्पट ऐकवावी व कृती करून घ्यावी.

CG –2
C– 2.2
LO–06AE41

## स्वाध्याय

### अ] योग्य पर्याय निवडा.

**१) संगीतामध्ये लय म्हणजे काय ?**

सा) फक्त टाळ्या वाजवणे      रे) गाण्याचे शब्द व संगीत

ग) मोठ्या आवाजात गाणे      म) दोन मात्रांमधील समान अंतर

उत्तर :

**२) शास्त्रीय संगीतामध्ये लयीचे मुख्य किती प्रकार मानले जातात ?**

सा) ४      रे) ३      ग) ५      म) २

उत्तर :

**३) दुप्पट म्हणजे काय ?**

सा) नवीन बोल तयार करणे      रे) एका मात्रेत दोन मात्रा म्हणणे

ग) बोल वेगात म्हणणे      म) एक-एक मात्रा म्हणणे

उत्तर :

**४) एकतालामध्ये किती काल आहेत ?**

सा) ६      रे) ३      ग) ४      म) २

उत्तर :

**५) 'ऐरणीच्या देवा तुला' हे गीत लयीच्या कोणत्या प्रकारात येते ?**

सा) मध्यलय      रे) द्रुतलय      ग) विलंबित लय      म) सावकाश लय

उत्तर :

**६) पाठातील कोणते गीत द्रुत लयीच्या प्रकारात येते ?**

सा) पोवाडा      रे) भावगीत      ग) देशभक्ती गीत      म) यापैकी सर्व

उत्तर :

### ब] एकतालाची एकपट व दुप्पट वहीत लिहा.

# १२ युगुलगीत व समूहगीत

**समूहगीत :** समूहगीत म्हणजे अनेक विद्यार्थी एकत्र येऊन एकाच स्वरात, तालात आणि एकाच भावनेतून गायलेले गीत. त्यामुळे एकोप्याची भावना, सहकार्याची वृत्ती आणि शिस्त यांचा विकास होतो. समूहगीत हा केवळ एक संगीत प्रकार नसून तो व्यक्तिमत्त्व विकासासाठी ही उपयुक्त ठरतो.

**समूहगीत ऐकू या व म्हणू या**

### हा देश माझा

हा देश माझा याचे भान,
जरासे राहू द्या रे
जरासे राहू द्या ॥ध्रृ॥

हा उंच हिमालय माझा,
हा विशाल सागर माझा
ह्या गंगा-यमुना, शेती धरती,
बाग-बगिचा माझा
अभिलाषा याची धरीता।
कुणी नजर वाकडी करता
त्या मरण द्यावया,
स्फुरण आपुले बाहु पावू द्या रे ॥१॥

हे हात उत्सुकलेले,
दगडांच्या वर्षावाला
रोखा ते लावा कार्याला,
या देशाच्या प्रगतीला
हे बंद करा उत्पात,
थांबवा आपुला घात
सामर्थ्य न जावो व्यर्थ काहीसा
अर्थ ही येऊ द्या रे ॥२॥

जरी अनेक अपुले धर्म, जरी
अनेक अपुल्या जाती
परि अभंग असू द्या,
सदैव आपुली माणुसकीची नाती
द्या सर्व दूर ललकारी,
फुंकारे एक तुतारी
संदेह रोष जे द्वेष मनातील
वाहून जाऊ द्या रे ॥३॥

**गीत : सेनापती बापट**
**(पांडुरंग महादेव बापट)**



**समूह गीताची आणखी काही उदाहरणे.**

१) मंगल देशा पवित्र देशा

२) माणुसकीच्या शत्रू संगे

ही गीते ऐकून गाण्याचा प्रयत्न करा

- समूहगीताचे तालासुरामध्ये गायन करून घ्यावे.
- पारंपरिक व आधुनिक समूहगीतांबद्दल माहिती सांगावी.
- प्रथम पृष्ठावरील क्यू. आर्. कोड स्कॅन करून समूहगीत ऐकवावे व म्हणून घ्यावे.

CG -1
C- 1.2
LO-06AE38

**युगुलगीत (द्‌वंद्‌वगीत) (Duet Song) :** 'युगुल' म्हणजे जोडी. जेव्हा दोन कलाकार एकत्रितपणे एखादे गाणे सादर करतात, तेव्हा त्याला 'युगुलगीत' असे म्हणतात.

हे गाणे संवादाच्या स्वरूपात किंवा एकमेकांसाठीच्या भावना व्यक्त करण्यासाठी गायले जाते.

### युगुलगीत ऐकू या व म्हणू या

### काळ्या मातीत मातीत

स्त्री – काळ्या मातीत मातीत तिफन चालते,
तिफन चालते, तिफन चालते

पुरुष – ईज थयथय नाचते ढग ढोल वाजवितो,
ढोल वाजवितो, ढग ढोल वाजवितो

स्त्री – सदाशिव हाकारतो नंदी बैलाच्या जोडीला
संग पारवती चाले ओटी बांधून पोटाला

पुरुष – सरीवर सरी येती माती न्हाती धुती होते
कस्तुरीच्या सुवासानं भूल जिवाला पडते

स्त्री – भूल जिवाला पडते वाट राघूची पाहते

पुरुष – राघू तिफन हाकतो मैना वाटुली पाहते

पुरुष – सर्जा रं माझ्या ढवळ्या रं माझ्या
पवळ्या रं माझ्या आहा !

स्त्री – झोळी झाडाला टांगून राबराबते माऊली
तिथं झोळीतल्या जिवा व्हते पारखी साऊली

पुरुष – अभिषेकात घामाच्या आसं देवाचं पूजन
पिकं हालती डोलती जनू करती भजन

स्त्री – गव्हा जोंधळ्यात तवा सोनं चांदी लकाकते

पुरुष – जशी चांदी लकाकते कपाशी फुलते ॥

पुरुष – चालं ऊनपावसाचा पाठशिवणीचा खेळ
लोनी पायाला वाटती मऊ भिजली ढेकळं

स्त्री – काळ्या ढेकळात डोळा हिरवं सपान
पाहतो
डोळा सपान पाहतो काटा पायांत रुततो

पुरुष – काटा पायांत रुतता लाल रगात सांडतं

स्त्री – लाल रगात सांडतं हिरवं सपान फुलतं

**गीत : विठ्ठल वाघ**



## युगुलगीतांचे प्रकार :

**अ) स्त्री–पुरुष युगुलगीत (द्‌वंद्‌वगीत)  ब) दोन पुरुष युगुलगीत (द्‌वंद्‌वगीत)  क) दोन स्त्री युगुलगीत (द्‌वंद्‌वगीत)**

**स्त्री–पुरुष युगुलगीत :** हे सर्वात सामान्य असून प्रेमगीते या प्रकारात मोडतात.

**दोन पुरुष युगुलगीत :** मैत्री किंवा संघर्षावर आधारित गाणी. उदा. शोलेमधील 'ये दोस्ती'.

**दोन स्त्री युगुलगीत :** सख्यांमधील संवाद किंवा नृत्यासाठी गायलेली गाणी. उदा. 'पिंगा' किंवा 'डोला रे डोला'.

### युगुलगीताची सांगीतिक वैशिष्ट्ये

**संवाद :** गाण्यातील ओळी अशा प्रकारे रचलेल्या असतात की जणू दोन व्यक्ती एकमेकांशी संवाद साधत आहेत.

**स्वर सुसंगती** (हार्मनी) **:** दोन्ही गायकांचे आवाज एकमेकांना पूरक असावे लागतात, जेणेकरून गाणे ऐकायला गोड वाटते.

**भाव :** या गीतांमधून अनेकदा नायक आणि नायिकेमधील प्रेम, विरह किंवा आनंद तसेच दोन मित्र–मैत्रिणींमधील मैत्रीचा भाव व्यक्त केला जातो.

**युगुलगीतांची आणखी काही उदाहरणे.**

१) मन उधाण वाऱ्याचे...  २) तू मेरा दिल तू मेरी जान...

ही युगल गीते ऐका व गाण्यांचा सराव करा.

## स्वाध्याय

### १) चूक की बरोबर ते लिहा.

अ) समुहगीत म्हणजे विद्यार्थ्यांनी एकत्र येऊन समूहाने गायलेले गीत.

ब)समुहगीत स्फुर्तीदायक नसते.

क)समूहगीतात फक्त एक विद्यार्थी गातो.

ड) 'हा देश माझा' या गीताचे गीतकार श्री. सेनापती बापट हे आहेत.

### २) युगुल गीतांचे प्रकार लिहा.

**आकृतिबंध पूर्ण करा.**




- युगुल गीताचे तालासुरात गायन करून घ्यावे.
- युगुलगीत व समुहगीताची उदाहरणे सांगावीत.
- प्रथम पृष्ठावरील क्यू. आर्. कोड स्कॅन करून करून विद्यार्थ्यांना गीते ऐकावावीत.

CG – 2
C– 2.1
LO–06AE39

# १३ चला शिकू या शास्त्रीय संगीत

अभिजात शास्त्रीय संगीत शिकण्यापूर्वी त्यातील काही महत्त्वाच्या गोष्टींचा परिचय करून घेऊ.

**संगीतातील स्वरांची संपूर्ण नावे :**

१) सा–षड्ज
२) रे–रिषभ
३) ग–गांधार
४) म–मध्यम
५) प–पंचम
६) ध–धैवत
७) नि–निषाद

**संगीतातील पारिभाषिक शब्दांच्या व्याख्या करून पाहू या :**

भारतीय शास्त्रीय संगीतामध्ये स्वर हा आत्मा मानलो जातो. प्रामुख्याने सप्तकातील बारा सुरांचे स्थान निश्चित समजायला हवे. यासाठी मूळ नैसर्गिक जागेवर असणारे सात शुद्‌ध स्वर, चार कोमल स्वर व एक तीव्र स्वर असे एकूण बारा स्वरस्थानांची ओळख हार्मोनियमच्या माध्यमातून करून घेऊ. तसेच हार्मोनियमवर वाजवलेल्या शुद्‌ध, कोमल व तीव्र स्वरांतील फरक ओळखण्याचा प्रयत्न करूया.



शुद्‌ध स्वर : सा रे ग म प ध नि

कोमल स्वर : <u>रे</u> <u>ग</u> <u>ध</u> <u>नि</u>

तीव्र स्वर : मं

१) **आरोह :** चढत्या क्रमाने जाणाऱ्या स्वर समूहाला 'आरोह' असे म्हणतात.

उदा. सा रे ग म प ध नि सां

२) **अवरोह :** उतरत्या क्रमाने येणाऱ्या स्वर समूहाला 'अवरोह' असे म्हणतात.

उदा. सां नि ध प म ग रे सा

- स्वरांची पूर्ण नावे विचारावीत.
- हार्मोनिअमवर स्वर वाजवून दाखवावेत व स्वरांतील फरक ओळखण्याची संधी द्यावी.
- प्रथम पृष्ठावरील क्यू. आर्. कोड स्कॅन करून करून विद्यार्थ्यांना गीते ऐकवावीत.

CG – 2
C– 2.2
LO–06AE40/42

३) **अलंकार :** नियमबद्ध आरोह अवरोहांच्या समूहास 'अलंकार' असे म्हणतात.

उदा. आरोह – सारेग रेगम गमप मपध पधनि धनीसां

अवरोह – सांनीध निधप धपम पमग मगरे गरेसा

४) **राग :** मनोरंजन करणाऱ्या विशिष्ट स्वरांच्या नियमबद्ध रचनेला 'राग' असे म्हणतात.

५) **वादी स्वर :** रागात वारंवार येणारा मुख्य स्वर म्हणजे 'वादी स्वर' होय.

६) **संवादी स्वर :** रागातील वादी स्वराखालोखाल येणारा उपमुख्य स्वर म्हणजे 'संवादी स्वर' होय.

७) **वर्ज्य स्वर :** रागामध्ये ज्या स्वरांचा वापर केला जात नाही ते वर्ज्य स्वर.

८) **पकड :** राग वाचक स्वर समूहास 'पकड' असे म्हणतात.

९) **सम :** तालाच्या पहिल्या मात्रेला 'सम' म्हणतात.

१०) **काल (खाली) :** हातावर टाळीच्या साहाय्याने ठेका देताना टाळी न देता हात बाजूला करून दाखविलेली मात्रा म्हणजे 'काल' होय.

११) **टाळी :** सम आणि कालाव्यतिरिक्त उरलेल्या प्रत्येक खंडातील पहिल्या मात्रेला टाळी असे म्हणतात.

१२) **राग जाती :** रागाच्या आरोह अवरोहातील स्वरांच्या संख्येवरून राग जाती ठरवली जाते.
५ स्वर–ओडव, ६ स्वर–षाडव, ७ स्वर–संपूर्ण जाती.

**राग – भूप (शास्त्रीय माहिती)**

राग भूप, ज्याला 'भूपाली' असेही म्हणतात, हा भारतीय शास्त्रीय संगीतातील अत्यंत मधुर आणि शांत रसप्रधान राग आहे.

**राग परिचय :** हा राग 'कल्याण' थाटातून निर्माण झाला आहे.

**स्वर वैशिष्ट्ये :** या रागात सर्व स्वर 'शुद्ध' लागतात. यामध्ये 'म' (मध्यम) आणि 'नि' (निषाद) हे दोन स्वर घेतले जात नाहीत म्हणजेच वर्ज्य आहेत.

**जाती :** आरोह आणि अवरोह दोन्हींमध्ये ५–५ स्वर लागत असल्यामुळे या रागाची जाती 'ओडव ओडव' आहे.

**वादी स्वर :** 'ग' (गंधार) **संवादी स्वर** : 'ध' (धैवत) आहे.

**गायन वेळ :** हा राग रात्रीच्या पहिल्या प्रहरात (सर्वसाधारणपणे संध्याकाळी ६ ते ९ च्या दरम्यान) गायला जातो.

भारतीय शास्त्रीय संगीतातील प्रत्येक राग त्याच्या ठरवलेल्या विशिष्ट वेळीच गायले/वाजवले जातात.

**आरोह :** सा रे ग प ध सां
अवरोह : सां ध प ग रे सा
पकड : ग रे सा, ध़ सा रे ग, प ग, ध प ग, रे सा.

**लक्षणगीत :** ज्या गीतामध्ये रागाचे संपूर्ण वर्णन काव्य रूपातून मांडले जाते त्यास '**लक्षणगीत**' असे म्हणतात.

रागाची माहिती वर्णन करणाऱ्या गीताला लक्षण गीत असे म्हणतात. या वर्षी आपण भूप रागातील लक्षण गीताचा अभ्यास करणार आहोत.

## लक्षणगीत– ताल तिनताल

स्थायी : गुणी जन राग भूपाली सुनावत

सबसूर शुद्ध म नी न लगावत ।

अंतरा : ग ध वादी संवादी बनावत

प्रथम प्रहर निशी गान सुनावत

ओडव रचना मन को लुभावत॥

**मंद्र सप्तक:**
**स्थान:** हे मध्य सप्तकाच्या खाली (खालच्या पट्टीत) असते.
**आवाज:** यात गायल्या जाणाऱ्या स्वरांचा आवाज खूप गंभीर असतो.
**खूण:** या सप्तकातील स्वरांच्या खाली टिंब (.) दिले जाते (उदा. नि, ध, प)
**तार सप्तक:**
**स्थान:** हे मध्य सप्तकाच्या वर (वरच्या पट्टीत) असते.
**आवाज:** यात गायल्या जाणाऱ्या स्वरांचा आवाज खूप उंच, बारीक असतो.
**खूण:** या सप्तकातील स्वरांच्या वर टिंब (-̇) दिले जाते (उदा. सां, रें, गं)

### लक्षणगीताचे नोटेशन :

**स्थायी** — **ताल – तिनताल**

| | | | |
|---|---|---|---|
| ग ध प ग | रे सा – रे | सा ध̣ सा रे | ग रे ग ग |
| गु णी ज न | रा ऽ ग भू | पा ऽ ली सू | ना ऽ व त |
| ० | ३ | × | २ |
| ग ग प प | ध ध ध प | ध सां ध प | ग रे सा सा |
| स ब सु र | शु ऽ ध्द म | नी ऽ न ल | गा ऽ व त |
| ० | ३ | × | २ |

**अंतरा**

| | | | |
|---|---|---|---|
| ग ध प – | ध ग प ध | सां – सां सां | ध ध सां सां |
| ग ध वा ऽ | दी ऽ सं ऽ | वा ऽ दी ब | ना ऽ व त |
| ० | ३ | × | २ |
| ध ध सां सां | रें रें रें रें | सां रें गं रें | सां ध प प |
| प्र थ म प्र | ह र नि शी | गा ऽ न सु | ना ऽ व त |
| ० | ३ | × | २ |
| ध गं रें रें | सां सां ध प | ध सां ध प | ग रे सा सा |
| ओ ऽ ड व | र च ना ऽ | म न को लु | भा ऽ व त |
| ० | ३ | × | २ |

- लक्षणगीताचा तालासुरात सराव करून घ्यावा.
- प्रथम पृष्ठावरील क्यू. आर्. कोड स्कॅन करून लक्षण गीत ऐकवावे व गायन करून घ्यावे.

CG – 3
C– 3.2
LO–06AE46

**बंदिश म्हणजे शास्त्रीय संगीतातील तालासुरांत बांधलेली काव्य रचना.**

**बंदिश – ताल तीनताल**

स्थायी : सुरासूर भजत मुनीवर शंकर
समदर्शी प्रभू हर गिरीजावर ।
अंतरा : जटाजूट शिर गौंग बिराजे
कर त्रिशूल अहि भूखन साजे
उग्र वेष अत हृदय दयाधर ॥

**राग – भूप बंदिश (गाणे)**

**स्थायी** — **ताल – तिनताल**

| | | | |
|---|---|---|---|
| प ग – प | ग रे सा रे | सा ध़ सा रे | ग रे ग ग |
| सु रा ऽ सू | र भ ज त | मु नी व र | शं ऽ क र |
| ० | ३ | × | २ |
| ग ग प ध | सां – ध प | ध सां ध प | ग रे सा रे |
| स म द र | शी ऽ प्र भू | ह र गि रि | जा ऽ व र |
| ० | ३ | × | २ |

**अंतरा**

| | | | |
|---|---|---|---|
| प ग – प | – प सां ध | सां – सां सां | सां रें सां – |
| ज टा ऽ जू | ऽ ट शि र | गौं ऽ ग बि | रा ऽ जे ऽ |
| ० | ३ | × | २ |
| ध ध ध सां | – सां रें रें | सां रें गं रें | सां रें सां ध |
| क र त्रि शू | ऽ ल अ ही | भू ऽ ख न | सा ऽ जे ऽ |
| ० | ३ | × | २ |
| प – ग प | – प ध प | ध सां ध प | ग रे सा रे |
| उ ऽ ग्र वे | ऽ ष अ त | ह द य द | या ऽ ध र |
| ० | ३ | × | २ |

- बंदिश तालासुरात गायन करून घ्यावी.
- प्रथम पृष्ठावरील क्यू. आर्. कोड स्कॅन करून बंदिश ऐकवावी व गायन करून घ्यावे.

CG – 3
C– 3.2
LO–06AE46

भारतीय चित्रपट संगीतात आणि भावसंगीतात राग भूप (भूपाली) अतिशय लोकप्रिय आहे. या रागातील काही गाजलेली गाणी खालीलप्रमाणे आहेत:

**मराठी गाणी :**

१. घनश्याम सुंदरा श्रीधरा (अमर भूपाळी) – पं. हृदयनाथ मंगेशकर आणि लता मंगेशकर.

२. ऐरणीच्या देवा तुला (चित्रपट: साधी माणसं) – लता मंगेशकर.

३. अबीर गुलाल उधळीत रंग – पं. जितेंद्र अभिषेकी

४. माझे माहेर पंढरी – पं. भीमसेन जोशी.

५. देहाची तिजोरी (चित्रपट : आम्ही जातो आमुच्या गावा) – सुधीर फडके.

**हिंदी गाणी :**

१. ज्योति कलश छलके (चित्रपट : भाभी की चुडियाँ) – लता मंगेशकर.

२. पंख होते तो उड आती रे (चित्रपट : सेहरा) – लता मंगेशकर.

**वाद्यांचे प्रकार :**

संगीत शास्त्रात गायनाबरोबरच वादन कलेला महत्त्व आहे. वाद्यांचे आकार, प्रकार, आवाज, गुणधर्म व शैलीनुसार वाद्य वर्गीकरण केले जाते. वाद्यांचे एकूण चार प्रकार आहेत त्याचे वर्गीकरण खालीलप्रमाणे;

१) **तंतुवाद्य :** वाद्यांच्या या प्रकारात तारा छेडून, आघात करून किंवा तारेवरील घर्षणामुळे नाद निर्मिती होते.
उदाहरणार्थ – सतार, तानपुरा, वीणा, सारंगी, गिटार, एकतारी, व्हायोलिन, संतूर, सरोद, कोका इत्यादी.



२) **सुषिर वाद्य :** ही वाद्ये हवेच्या साहाय्याने वाजवली जातात. उदाहरणार्थ – बासरी, हार्मोनियम, शंख, पावा, तुतारी, शहनाई, सेक्सोफोन, ट्रंपेट, क्लॅरोनेट इत्यादी.



३) **अवनद्ध वाद्य :** चमड्याने मढवलेल्या आणि आघात करून वाजवल्या जाणाऱ्या वाद्यांचा समावेश या प्रकारामध्ये होतो. उदाहरणार्थ – तबला, पखवाज, ढोल, ताशा, नगारा, मृदंगम, ड्रमसेट, कोंगो, बोंगो इत्यादी.



४) **घनवाद्य :** धातू किंवा लाकडापासून बनवलेल्या व एकमेकांवर आघात करून वाजवल्या जाणाऱ्या वाद्यांचा समावेश यामध्ये होतो. उदाहरणार्थ झांज, टाळ, चिपळ्या, घंटा, टिपरी, ट्रँगल, खंजिरी, झांजरी इत्यादी.



**वाद्यांची निगा :**

कलावंताला संगीताची साधना जेवढी महत्त्वाची आहे तेवढीच वाद्यांची निगा राखणेही महत्त्वाचे आहे. तुमच्याकडे असलेल्या सुषिर वाद्यांची योग्य प्रकारे काळजी घेण्यासाठी खालील काही महत्त्वाचे मुद्दे लक्षात घ्यावेत.

सुषिर वाद्ये उदा. बासरी, सनई, क्लॅरोनेट, बिगुल, तुतारी ही अत्यंत नाजूक असतात. त्यांची योग्य काळजी घेतल्यास त्यांचा सुरेल आवाज आणि आयुर्मान टिकून राहते.

**१. दैनंदिन स्वच्छता आणि निगा**

- वाद्य वाजवून झाल्यावर आतील भाग मऊ आणि कोरड्या कापडाने (cleaning cloth) पुसून घ्यावा.
- सनई किंवा तत्सम वाद्यांमध्ये वापरली जाणारी 'दोन पत्तींची जिभाळी' (Reed) वाजवून झाल्यावर वेगळी काढून कोरडी करावी.

**२. सुरक्षित जागा व वातावरण**

- वाद्ये खिडकीत किंवा थेट सूर्यप्रकाशात ठेवू नका, अन्यथा लाकूड किंवा बांबूमध्ये तडे जाऊ शकतात. धातूच्या वाद्यांमध्ये हवामानानुसार बदल होऊ शकतात.
- वाद्ये जास्त उष्ण किंवा दमट जागी ठेवणे टाळावे.
- वाद्य वापरून झाल्यावर बॉक्समध्ये किंवा योग्य आच्छादन करून सुरक्षित ठिकाणी ठेवावे.

**३. रासायनिक उत्पादनांचा वापर टाळा**

वाद्यांना चमक आणण्यासाठी घरगुती क्लीनर किंवा रसायने वापरू नका, यामुळे त्याचे नुकसान होऊ शकते.

**४. वैयक्तिक वापर**

वाद्ये शक्यतो इतरांना वाजवायला देऊ नका. वाद्य वापरण्यापूर्वी हात स्वच्छ धुऊन घेतल्यास वाद्यावर घाम किंवा तेलाचे डाग पडत नाहीत.

**संगीतातील रंगमंच शिष्टाचार व रीतीरिवाज :**

भारतीय संगीतात अनेक रीतीरिवाज, परंपरा आणि शिष्टाचार पाळले जातात. जे गुरू – शिष्य परंपरेचा भाग आहेत. यामध्ये संगीत साधना (रियाज), गुरुवंदना, रागाच्या वेळेचे पालन आणि सादरीकरणाची विशिष्ट पद्धत इत्यादी घटकांचा समावेश होतो. त्यापैकी काही रीतीरिवाज पुढीलप्रमाणे;

१) **गुरू शिष्य परंपरा :** संगीत क्षेत्रात गुरूंना सर्वोत्तम स्थान आहे. गुरूंच्या सानिध्यात राहून ज्ञान मिळविले जाते.

२) **संगीत साधना :** एखाद्या घटकाचा वारंवार सराव करून स्वरांवर व आवाजावर नियंत्रण मिळवणे म्हणजे 'संगीत साधना'. संगीतातील साधना म्हणजे दीर्घ काळाचा सराव. हा सराव रात्री उशिरापर्यंत किंवा पहाटे लवकर उठून केला जातो.

- संगीतातील रीतीरिवाज व रंगमंच शिष्टाचार यांची माहिती द्यावी.
- वाद्यांच्या प्रकारांविषयी सोदाहरण माहिती द्यावी.

CG – 3
C– 3.1
LO–06AE43/44

३) **गुरूंना नमन :** गायन वादनापूर्वी गुरूंना नमस्कार करणे, गुरूबद्‌दल तसेच वाद्यांबद्‌दल आदर व्यक्त करणे.

४) **सादरीकरणातील शिस्त :** गायन वादनापूर्वी तबला, तानपुरा इत्यादी लागणारी वाद्ये स्वरांमध्ये जुळवून घेणे.

५) **राग आणि वेळ :** भारतीय संगीतात विशिष्ट राग विशिष्ट वेळी गाण्याची परंपरा आहे. याला शास्त्रीय संगीताचा गाभा मानले जाते.

हे रीतीरिवाज संगीताचे गांभीर्य आणि पावित्र्य अबाधित ठेवतात. या ठिकाणी शिस्त, आदर आणि सराव खूप महत्त्वाचे असतात. यामुळे आत्मविश्वास आणि कलाकौशल्य वाढते.

## रंगमंच व्यवस्थापन

### रंगमंच व्यवस्थापनासाठी लागणाऱ्या घटकांची माहिती :

संगीतातील रंगमंच व्यवस्थापन ही एक अत्यंत महत्त्वाची कला आहे. त्यामुळे कार्यक्रमाचे सादरीकरण यशस्वी होते. संगीतातील रंगमंच व्यवस्थापनाची प्रमुख वैशिष्ट्ये आणि जबाबदाऱ्या पुढीलप्रमाणे :

संगीतातील रंगमंच व्यवस्थापनाचे सर्वसाधारणपणे दोन प्रकार आहेत.

अ) **मैफिल रंगमंच व्यवस्था :** यामध्ये कार्यक्रम गायनाचा आहे की वादनाचा आहे? वाद्य कशी, कुठे मांडायची? बैठक व्यवस्था कशी असावी? त्याचबरोबर लागणारे साहित्य आणण्याची व नेण्याची व्यवस्था करावी लागते. कलाकारांची वेळ, त्यांची बैठक व्यवस्था योग्य ध्वनीक्षेपक व्यवस्था आणि इत्यादी नियोजन करावे लागते.

आ) **संगीत नाटक :** यामध्ये सुद्‌धा वरील नियमांबरोबरच अभिनय आणि संगीत यांचा मेळ असतो. त्यामुळे नाटकाच्या संहितेनुसार प्रवेश, निर्गम व संगीताची वेळ पाळणे महत्त्वाचे असते.

**संगीतातील रंगमंच व्यवस्थापनाची प्रमुख वैशिष्ट्ये आणि जबाबदाऱ्या :**

१) **समन्वयक :** रंगमंच व्यवस्थापक हा दिग्दर्शक, कलाकार, संगीतकार आणि तांत्रिक कर्मचारी यांच्यातील मुख्य दुवा असतो. सर्वांशी समन्वय साधून कार्यक्रम उत्तमरित्या पार पाडण्याची जबाबदारी त्याची असते.

२) **तांत्रिक व्यवस्थापन :** कार्यक्रमासाठी लाईट, साऊंड सिस्टिम, माईक इत्यादी जुळवाजुळव करणे.

३) **रंगमंच मांडणी :** गायक आणि वादकांची बैठक व्यवस्था निश्चित करणे. गरजेनुसार वाद्ये, माईक व इतर साहित्य मांडणी करणे.

४) **वेळापत्रक :** कार्यक्रमाची वेळ निश्चित करणे. कार्यक्रमापूर्वी स्टेजवरील सराव तसेच साऊंड चेक करणे.

५) **सुरक्षा आणि आरोग्य :** कलाकार, तंत्रज्ञ आणि प्रेक्षक यांच्या सुरक्षिततेची काळजी घेणे.

६) **संवाद :** प्रकाशयोजना, ध्वनिसंयोजन, वेशभूषा व्यवस्थापक, मुख्य कलाकार, गायक, वादक यांच्यात सुसंवाद साधून प्रयोग यशस्वीपणे पार पाडणे.

- रंगमंच व्यवस्थापनासाठी लागणाऱ्या घटकांची माहिती द्यावी.

CG – 3
C– 3.1/3.2
LO–06AE43/45

थोडक्यात संगीतातील रंगमंच व्यवस्थापन हे कलाकारांना त्यांच्या कार्यक्रम सादरीकरणावर लक्ष केंद्रित करण्यास मदत करते आणि पडद्यामागील सर्व तांत्रिक बाजू सांभाळून प्रेक्षकांना एक परिपूर्ण अनुभव मिळवून देते.

## कलाकारांची माहिती

भारतीय संगीताला जगामध्ये मानाचे स्थान मिळवून देणारे अनेक प्रसिद्ध कलाकार आहेत. त्यापैकी काही कलाकारांची माहिती घेऊ या.

### • पं. विष्णू नारायण भातखंडे (शास्त्रीय संगीत गायक)



**नाव :** विष्णू नारायण भातखंडे उर्फ विष्णू शर्मा

**जन्म :** १० ऑगस्ट १८६० मध्ये मुंबई येथे झाला.

**गुरू :** उस्ताद अलीहुसेन यांच्याकडून ख्याल गायकी तसेच
रावजीबुवा बेलबागकर यांच्याकडून ध्रुपद गायकी आत्मसात केली.

**गायन शैली :** उत्तर हिंदुस्थानी शास्त्रीय संगीत.

**प्रसिद्ध ग्रंथ :** (१) 'लक्ष्यसंगीत' नावाचा संस्कृत ग्रंथ लिहिला.
(२) 'हिंदुस्थानी संगीत पद्धती' या नावाचे चार ग्रंथ लिहिले.
(३) 'क्रमिक पुस्तक मालिका' हा ग्रंथ सहा भागात लिहिला.

**संगीत संस्था :** (१) 'मॅरिस कॉलेज ऑफ म्युझिक' या नावाची शिक्षण संस्था स्थापन केली.
(२) बडोद्याला म्युझिक कॉलेजची स्थापना केली.

पंडित विष्णू नारायण भातखंडे यांनी जी स्वरलिपी तयार केली, ती आजही प्रचलित आहे.

**शिष्यवर्ग :** पं. रातंजनकर, राजाभैय्या पूँछवाले.

**मृत्यू :** १९ सप्टेंबर १९३६

### • भारतरत्न एम. एस. सुब्बुलक्ष्मी



**नाव :** मदुरै षण्मुखवडिवु सुब्बुलक्ष्मी

**जन्म :** १६ सप्टेंबर १९१६ – मदुराई , मद्रास

**कार्यक्षेत्र :** गायन, कर्नाटक संगीत

**गुरू :** आई अक्कमलाई तसेच श्रीनिवास अय्यंगर,
मुसिरी सुब्रह्मण्यम अय्यर यांच्याकडे कर्नाटक संगीत आणि
सिद्धेश्वरी देवी व पं. नारायणराव व्यास यांच्याकडे उत्तर हिंदुस्थानी संगीत.

**गायन शैली :** दक्षिण हिंदुस्थानी शास्त्रीय संगीत (कर्नाटक शैली).

**कारकीर्द :** वयाच्या दहाव्या वर्षी पहिली कॅसेट काढली. वयाच्या १७ व्या वर्षी चेन्नईतील 'म्युझिक अकॅडमी'मध्ये

कार्यक्रम सादर केला. 'मीरा' या चित्रपटात अभिनय केला. दक्षिण भारतीय संतांच्या रचनेबरोबरच संत मीराबाई, संत तुलसीदास, कबीर, संत तुकाराम यांच्याही रचना, अभंग, दोहे गायले आहेत. त्यांनी गायलेले विष्णुसहस्रनाम, भज गोविंदम्, मधुराष्टकम् लोकप्रिय आहेत.

**मानसन्मान :**

(१) पद्मभूषण (१९५४) (२) संगीत नाटक अकादमी पुरस्कार (१९५६)
(३) संगीत कलानिधी पुरस्कार (१९६८) (४) रॅमन मॅगसेसे पुरस्कार (१९७४)
(५) पद्मविभूषण (१९७५) (६) संगीत कलाशिखरमणी पुरस्कार (१९७५)
(७) कालिदास सन्मान (१९८८) (८) भारतरत्न (१९९८)

**मृत्यू :** ११ डिसेंबर २००४ चेन्नई, तामिळनाडू



- **उस्ताद झाकीर हुसेन**

**नाव :** उस्ताद झाकीर हुसेन अल्लारखाँ कुरेशी

**जन्म :** ९ मार्च १९५१

**गुरु :** उस्ताद अल्लारखाँ

**वादनशैली :** पंजाब घराण्याची जोरकस व दमदार वादन शैली. शास्त्रीय संगीत, जाझ, फ्युजन.

**प्रसिद्ध अल्बम :** १९७३ मध्ये 'लिव्हिंग इन द मटेरियल वर्ल्ड'

**पुरस्कार :** (१) पद्मश्री पुरस्कार (१९८८)
(२) सन १९९२ आणि २००९ मध्ये संगीतातील सर्वात प्रतिष्ठित पुरस्कार 'ग्रॅमी अवॉर्ड'
(३) पद्मभूषण पुरस्कार (२००२)

**मृत्यू :** १५ डिसेंबर २०२४ सॅन फ्रॅन्सिस्को (अमेरिका)

- **पं. हरिप्रसाद चौरसिया (ज्येष्ठ बासरीवादक)**



**नाव :** पंडित हरिप्रसाद चौरसिया

**जन्म :** १ जुलै १९३८, उत्तर प्रदेशातील अलाहाबाद येथे.

**गुरु :** पंडित राजाराम यांच्याकडून हिंदुस्थानी गायकीचे शिक्षण, पंडित भोलानाथ प्रसन्न यांच्याकडे बासरीचे शिक्षण.

**वादनशैली :** मेहर–सेनिया घराण्याची वादनशैली

**पुस्तक :** 'बासरीचा बादशहा' हे पुस्तक प्रसिद्ध झाले.

**पुरस्कार :** (१) संगीत नाटक अकादमी पुरस्कार (१९८४) (२) कोणार्क सम्मान (१९९२)
(३) पद्मभूषण (१९९२) (४) यशभारती सम्मान (१९९४)

(५) हाफिज अली खाँ सम्मान (२०००)

(६) दीनानाथ मंगेशकर पुरस्कार (२०००)

(७) पद्‌मविभूषण (२०००)

**अल्बम :** कॉल ऑफ द व्हॅली

**शिष्य :** संतोष संत, विवेक सोनार, राकेश चौरसिया

**• भारतरत्न लता मंगेशकर**

**नाव :** लता दीनानाथ मंगेशकर

**जन्म :** २८ सप्टेंबर १९२९, इंदौर. मूळ गाव – मंगेशी, गोवा.

**कार्यक्षेत्र :** गायन

**गुरू :** मास्टर दीनानाथ मंगेशकर, अमान अली खान भेंडीबाजारवाले, देवासचे उस्ताद अमानत खान, संस्कृत पंडित तुलसीदास शर्मा.

**गायन शैली :** सुगम संगीत.

**कारकीर्द :** वयाच्या पाचव्या वर्षी संगीत नाटकांमध्ये बालकलाकाराची भूमिका केली. त्यानंतर चित्रपटसृष्टीत पार्श्वगायनास सुरुवात केली. भारतातील निरनिराळ्या प्रांतातील भाषांचा अभ्यास करून विविध गाणी गायली आहेत. 'आनंदघन' या टोपण नावाने चित्रपटांचे संगीत दिग्दर्शन केले आहे.

**मानसन्मान :**

(१) पद्‌मभूषण पुरस्कार (१९६९)

(२) दादासाहेब फाळके पुरस्कार (१९८९)

(३) इंदिरा गांधी पुरस्कार (१९९४)

(४) राजीव गांधी राष्ट्रीय सद्‌भावना पुरस्कार (१९९७)

(५) महाराष्ट्र भूषण पुरस्कार (१९९७)

(६) पद्‌मभूषण पुरस्कार (१९९९)

(७) भारतरत्न पुरस्कार (२००१)

(८) फिल्मफेअर अवॉर्ड

(९) अनेक विद्यापीठांकडून डी. लिट. पदवी

(१०) पार्श्वगायनातील त्यांच्या उज्ज्वल कारकिर्दीबद्‌दल गिनिज बुकमध्ये नोंद.

(११) भारताची गान कोकिळा म्हणून ओळख.



**मृत्यू :** ०६ फेब्रुवारी २०२२, मुंबई.

- कलाकारांच्या जीवनकार्याचा व गायन-वादन शैलीचा परिचय करून द्यावा.
- प्रथम पृष्ठावरील क्यू .आर. कोड स्कॅन करून व्हिडिओ दाखवावा.

CG -4
C- 4.2
LO-06AE49/50

विनामूल्य वितरणासाठी

## स्वाध्याय

### १) स्वरांची पूर्ण नावे लिहा.

उदा. सा–षड्‌ज

१) ग –

२) प –

३) नि –

५) म –

६) ध –

४) रे –

### २) आकृतिबंध पूर्ण करा.

राग – भूप

वादी स्वर ...............

संवादी स्वर ...............

वर्ज्य स्वर ...............

### ३) आकृतिबंध पूर्ण करा.

वाद्यांचे प्रकार

......................................

......................................

......................................

......................................

- आकृतिबंधानुसार सांगीतिक घटकांचे विश्लेषण करून घ्यावे.

CG –2
C– 2.2
LO–06AE42

# १४ स्थानिक लोकसंगीताचा परिचय

भारत हा विविधतेने नटलेला देश आहे. भारतामध्ये अनेक प्रांत आहेत. त्या प्रत्येक प्रांताची भाषा ही निराळी आहे. प्रत्येक प्रांतानुसार रूढी, परंपरा वेगवेगळ्या आहेत. लोकसंगीतामधून त्या प्रदेशाच्या लोकजीवनाची इतिहासाची व संस्कृतीची ओळख होते. म्हणूनच लोकसंगीताला लोकजीवनाचा व लोकसंस्कृतीचा आरसा असेही म्हणतात.

लोकसंगीत हे कोणत्याही समाजाच्या संस्कृतीचे, परंपरांचे आणि भावनांचे नैसर्गिक दर्शन घडवणारे महत्त्वाचे माध्यम आहे. हे संगीत पिढ्यानपिढ्या मौखिक परंपरेने जोपासले जाते आणि स्थानिक लोकजीवनाशी घट्ट जोडलेले आहे.

### लोकसंगीताची वैशिष्ट्ये :

१) **सामूहिकता :** लोकसंगीत हे सहसा समूहाने गायले किंवा सादर केले जाते. सण-उत्सव, शेतीची कामे किंवा सामाजिक समारंभांतून सामूहिकतेचा आविष्कार दिसतो. उदा. गोंधळ, शेतकरी गीत, भलरी, भोंडल्याची गाणी, पोवाडा, भजन, भारूड इत्यादी.

२) **मौखिक परंपरा :** हे संगीत कुठल्याही लिखित साहित्याशिवाय एका पिढीकडून दुसऱ्या पिढीकडे केवळ ऐकून व गाऊन हस्तांतरित केले जाते. उदा. जात्यावरील ओव्या, नागपंचमीची गाणी, धनगरी ओव्या, विवाह गीते, बहुरूप्याची गाणी इत्यादी.

३) **साधेपणा आणि गेयता :** लोकसंगीताची रचना अत्यंत साधी असते, ज्यामुळे सर्वसामान्य लोक ते सहजपणे आत्मसात करू शकतात. उदा. आरत्या, श्लोक इत्यादी.

४) **प्रादेशिक अस्मिता :** प्रत्येक प्रदेशातील हवामान, भाषा आणि व्यवसायानुसार तेथील लोकसंगीत बदललेले आढळते, ज्यामुळे त्या प्रदेशाची बोलीभाषा, म्हणी आणि शब्दसंपदा जतन केली जाते.

५) **पारंपरिक वाद्यांचा वापर :** लोकसंगीतामध्ये ढोलकी, टाळ, मृदंग, तुणतुणे, हलगी, घुंगरू, दिमडी, डफ, बासरी, संबळ, झांज, चिपळ्या, टिमकी, टिपरी, खंजिरी यांसारख्या स्थानिक वाद्यांचा प्रामुख्याने वापर केला जातो.

### स्थानिक लोकसंगीतामधील लोकसंस्कृती :

१) **भक्तिप्रधान लोकसंगीत :** यामध्ये भारूड, भजन, किर्तन, जागरण-गोंधळ इत्यादी प्रकारांचा समावेश होतो.

२) **मनोरंजन आणि शौर्यगाथा :** यामध्ये महाराष्ट्राची लोकप्रिय लावणी व शाहिरांनी डफावर थाप मारून गायलेली शौर्यगीते व पोवाडे यांचा समावेश होतो.

३) **श्रमगीते आणि निसर्गगीते :** यामध्ये जात्यावरील ओव्या, भोंडल्याची गाणी, कोळी गीते, शेतकरी गीते, भलरी इत्यादी गीतांचा समावेश होतो.

### स्थानिक लोकसंगीतामध्ये वापरली जाणारी वाद्ये :

१) **ढोलकी :** प्रामुख्याने लावणी, पोवाडा या गीत प्रकारांच्या साथीला ढोलकी वाजवतात. ढोलकी हे वाद्य आडवे ठेवून दोन्ही हातांनी वाजवले जाते. हे वाद्य तयार करण्यासाठी सर्वसाधारणपणे दोन फूट लांबीचे पोकळ लाकडी खोड वापरतात. याच्या दोन्ही बाजू चमड्याने मढवलेल्या असतात. डावी बाजू आकाराने मोठी असते. तर उजवी बाजू लहान असते. या लहान बाजूच्या चमड्यावर शाई लावलेली असते. त्यामुळे सुरेल नाद निर्माण होतो.



२) **टाळ :** हे वाद्य प्रामुख्याने भजन, किर्तनामध्ये वाजवतात. पितळ किंवा कासे या धातूपासून टाळ तयार केलेले असतात. एकमेकांवर हळुवारपणे आघात करून टाळातून नाद निर्माण केला जातो.





३) **तुणतुणे :** हे वाद्य लावणी, पोवाडा, जागरण-गोंधळ इत्यादी कार्यक्रमात वापरतात. हे वाद्य लाकडी पोकळ गोलास खालच्या बाजूने चमड्याने मढवलेले असते. एक बांबूची दांडी जोडलेली असते. या वाद्याला एकच तार चमड्याच्या मध्यभागातून लाकडी दांडीच्या वरील खुंटीला बांधलेली असते. तार छेडल्यावर तुण-तुण असा विशिष्ट आवाज येतो. म्हणून या वाद्याला तुणतुणे असे म्हणतात.



४) **बासरी :** यालाच बन्सी, मुरली, पावा असेही म्हणतात. विशिष्ट प्रकारच्या पोकळ वेळूपासून बासरी तयार करतात. धातूपासूनही बासरी तयार केली जाते. बासरीवर स्वर निर्मिती करण्यासाठी विशिष्ट अंतरावर ६ ते ८ छिद्रे असतात. तोंडाने हवा फुंकून व हाताच्या बोटांनी छिद्रांची उघडझाप करून स्वरनिर्मिती केली जाते.



५) **दिमडी :** हे वाद्य लोकसंगीतातील भजन, भारूड, जागरण-गोंधळ, पोवाडा इत्यादी लोकगीतांसाठी वापरतात. यासाठी सर्वसाधारणपणे १५ सेंटीमीटर व्यासाचे व ३ ते ४ इंच रुंदीचे लाकडी गोलाकार कडे वापरले जाते. कड्याच्या एका बाजूला चामडे घट्ट ताणून बसवलेले असते. दिमडी डाव्या हातात पकडून उजव्या हाताच्या बोटांनी वाजवतात.

**लोकसंगीतातील कलाकारांचा परिचय :** लोककलेला अत्युच्च्य शिखरावर घेऊन जाणारे अनेक कलाकार आहेत. त्यापैकी काही कलाकारांचा परिचय करून घेऊ या.

- **विठ्ठल बन्सी क्षीरसागर (तबला व ढोलकीवादक)**

**जन्म :** १ सप्टेंबर १९४३ रोजी सोलापूर येथे झाला. वडील शहनाईवादक असल्यामुळे घरातूनच सांगीतिक परंपरा लाभली होती.

**गुरु :** सोलापूर येथील पं. भीमराव कनकधर, हैदराबाद येथील उस्ताद शेख दाऊद खाँ तसेच इंदूर येथे धूळजीखाँ यांचे देखील मार्गदर्शन मिळाले.

**वादन शैली :** लोकसंगीत व शास्त्रीय संगीत.

**सांगीतिक कार्य :** भारतामधील अनेक नामवंत गायक वादकांना साथसंगत.

५० मराठी, हिंदी, कानडी चित्रपटांना तबला-ढोलकीची साथ.

१९८४ ते २००३ या कालावधीत आकाशवाणी पुणे केंद्र येथे तबलावादक म्हणून कार्यरत. त्यांची 'तालयात्रा' ही तबला, ढोलकी, पखवाज, ढोलक वादनाची कॅसेट प्रसिद्ध.



**पुरस्कार :** १) पं. भीमसेन जोशी स्वरभास्कर 'संगतकार' पुरस्कार

२) संगीतकार राम कदम जीवनगौरव पुरस्कार

**मृत्यू :** १७ जानेवारी २०२४ रोजी पुणे येथे निधन.

## • शाहीर विठ्ठल उमप



**जन्म :** १५ जुलै १९३१, मुंबई येथे एका मिल कामगाराच्या कुटुंबात झाला.

**गायन शैली :** लोकसंगीत

**लोककलेतील योगदान :**

- संत एकनाथांची भारुडे आणि छत्रपती शिवाजी महाराजांचे पोवाडे ते अत्यंत तन्मयतेने आणि ताकदीने सादर करत.
- त्यांनी स्वतः अनेक सामाजिक आणि प्रबोधनपर शाहिरी कवने लिहिली.
- महाराष्ट्राच्या लोकसंस्कृतीचे दर्शन घडवणारी अनेक लोकगीते त्यांनी गायली.
- त्यांच्या आवाजातील 'जांभूळ आख्यान' हा लोककला प्रकार प्रचंड गाजला.
- 'माझी मैना गावावर राहिली, माझ्या जिवाची होतीया काहिली...' अण्णाभाऊ साठे यांचे हे गीत यांनी आपल्या आवाजाने अजरामर केले.

**चित्रपट आणि रंगभूमीवरील कार्य :**

- 'डॉ. बाबासाहेब आंबेडकर', 'टिंग्या', 'विहीर' अशा अनेक राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय स्तरावर नावाजलेल्या चित्रपटांमध्ये त्यांनी विलोभनीय भूमिका केल्या.
- 'श्यामची आई', 'आंधळं दळतं' यांसारख्या नाटकांमध्ये त्यांनी काम केले.

**पुरस्कार आणि सन्मान :**

१) लोककलेच्या क्षेत्रातील त्यांच्या प्रदीर्घ सेवेसाठी त्यांना 'संगीत नाटक अकादमी पुरस्कार' देऊन गौरवण्यात आले होते.

२) महाराष्ट्र शासनाचेही अनेक सांस्कृतिक पुरस्कार त्यांना मिळाले होते.

**मृत्यू :** २६ नोव्हेंबर २०१०, नागपूर.

- स्थानिक लोकसंगीतामध्ये वापरल्या जाणाऱ्या वाद्यांची माहिती द्यावी.
- स्थानिक लोकवाद्यांचे वर्गीकरण करून घ्यावे.
- स्थानिक कलाकारांच्या जीवनकार्याचा परिचय करुन द्यावा.

CG –4
C– 4.1/4.2
LO–06AE47/48
/50

## स्वाध्याय

**१) आकृतिबंध पूर्ण करा.**

(अ)




(ब)




**२) लोकवाद्यांचे वर्गीकरणानुसार नावे लिहा.**

अ] तालवाद्ये – ..........................................................................

ब] तंतुवाद्ये – ..........................................................................

क] सुषिर वाद्ये – ..........................................................................

**२) आवडीच्या वाद्याचे चित्र रेखाटा व त्याच्या भागांना नावे द्या.**

**३) तुम्हांला आवडणारे एखादे लोकगीत लिहा.**

# नृत्य व हालचाल



# १५ आपली शास्त्रीय नृत्यशैली

शास्त्रीय ग्रंथांना अनुसरून पारंपरिक पद्धतीने सादर केले जाणारे नृत्य म्हणजेच भारतीय शास्त्रीय नृत्य होय. भारतामधील वेगवेगळ्या प्रांतातून सर्वसाधारणपणे नऊ शास्त्रीय नृत्यशैली आहेत असे मानले जाते. या नृत्यशैली आपल्या देशाची एक सांस्कृतिक ओळख करून देतात.

**१. कथक :**



कथक ही नृत्यशैली उत्तर भारतात उगम पावली असून यामध्ये हिंदुस्थानी संगीताचा वापर केला जातो.कथक नृत्य हे एकल तसेच सामूहिक स्वरूपातही सादर केले जाते. या नृत्याचे सादरीकरण स्त्रिया व पुरुषदेखील करतात. स्त्रियांच्या पोशाखात घागरा, अनारकली व कुंदनचे दागिने, घुंगरू इत्यादी वापरलेले असतात. तर पुरुष कुर्ता, सलवार अथवा धोतर व पायात घुंगरू अशा पेहेरावात सादरीकरण करतात. समपाद स्थान, जलद गिरक्या, लयबद्ध पदन्यास आणि विविध हालचालीतून व अभिनयातून सादरीकरण हे या नृत्य शैलीचे वैशिष्ट्य होय.

या नृत्यशैलीच्या संगीतामध्ये प्रामुख्याने वापरली जाणारी वाद्ये म्हणजे पखवाज, तबला, हार्मोनिअम, सारंगी. महत्त्वपूर्ण योगदान असलेले काही कथक कलाकार म्हणजे पंडित बिरजू महाराज व गुरु डॉ. रोहिणी भाटे.

**२. भरतनाट्यम् :**

भरतनाट्यम् ही तमिळनाडू राज्यात उगम पावलेली नृत्यशैली असून यामध्ये कर्नाटक संगीताचा वापर केला जातो. कथकप्रमाणेच हे नृत्य एकल तसेच सामूहिक स्वरूपातही सादर केले जाते. ह्या शैलीचे सादरीकरण स्त्रिया तसेच पुरुषदेखील करतात. स्त्रियांच्या पोशाखात ब्लाउज, पदर, पायजमा अथवा त्याला जोडलेला जरीकाठ पदराचा भाग (fan), तसेच दाक्षिणात्य दागिने व पायात घुंगरू घातले जातात. पुरुषांच्या पोशाखात सदरा, धोतर (वेष्टी), दाक्षिणात्य दागिने व पायात घुंगरू घातले जातात. अरैमंडी/आयत स्थान, मध्य लय, शारीरिक हालचाली व अभिनयाचा समतोल व विविध कथांचे कथन ही या शैलीची वैशिष्ट्ये आहेत. या शास्त्रीय नृत्याच्या संगीतासाठी सामान्यत: वापरली जाणारी वाद्ये म्हणजे मृदंग, घटम्, बासरी, व्हायोलीन. भरतनाट्यम् नृत्यशैलीत मोलाचे योगदान असलेले कलाकार म्हणजे गुरू डॉ. सुचेता भिडे-चाफेकर.





### ३. कुचिपुडी

कुचिपुडी ही नृत्यशैली आंध्र प्रदेशातील नाट्य परंपरेतून उगम पावली असून या शैलीत कर्नाटक संगीताचा वापर केला जातो. कुचिपुडी नृत्य एकल तसेच समूहातही सादर केले जाते व हे नृत्य स्त्रिया व पुरुष दोघेही सादर करतात. स्त्रियांच्या पोशाखात ब्लाउज, पदर पायजमा अथवा त्याला जोडलेला जरीकाठी पदराचा भाग (fan), इत्यादी तसेच दाक्षिणात्य दागिने, सुंदर केशभूषा व पायात घुंगरू घातले जातात. पुरुषांच्या पोशाखात सदरा, धोतर (वेष्टी), दाक्षिणात्य दागिने व पायात घुंगरू घातले जातात. कुचिपुडीतील हालचाली लयबद्ध, चपळ व आकर्षक असतात. अभिनयाचा समतोल तसेच काही प्रमाणात प्रादेशिक हालचालींचा समावेश हे या नृत्याचे वैशिष्ट्य होय.

नृत्यशैलीच्या संगीतामध्ये प्रामुख्याने वापरली जाणारी वाद्ये म्हणजे मृदंग, व्हायोलिन, बासरी आणि तानपुरा. या नृत्यशैलीत महत्त्वपूर्ण योगदान असलेले कुचिपुडी कलाकार म्हणजे गुरु विजया प्रसाद.

### ४. ओडिसी :

ओडिसी ही नृत्यशैली ओरिसा राज्यातील देवळांमध्ये उगम पावली असून यामध्ये ओरिसातील प्रादेशिक संगीताचा वापर केला जातो. या शैलीचे एकल व सामूहिक पद्धतीने सादरीकरण केले जाते.पारंपरिक पद्धतीनुसार ही शैली पुरुष व स्त्रिया सादर करतात. स्त्रियांच्या पोशाखात ब्लाउज, पदर, विजारीला जोडलेला जरीकाठ पदराचा भाग (fan), इत्यादी तसेच स्थानिय चांदीचे दागिने व पायात घुंगरू घातले जातात. पुरुषांच्या पोशाखात धोतर, मोजके दागिने व पायात घुंगरू घातले जातात.त्रिभंगी स्थान, चौक हस्त, मध्य लय, शारीरिक हालचाल व अभिनयाचा समतोल व विविध कथांचे कथन ही या शैलीची वैशिष्ट्ये आहेत.

या नृत्यशैलीच्या संगीतामध्ये प्रामुख्याने वापरली जाणारी वाद्ये म्हणजे बासरी, विणा, मंजिरा आणि मड्डलम. महत्त्वपूर्ण योगदान असलेले काही ओडिसी कलाकार म्हणजे गुरू झेलम परांजपे.



### ५. मोहिनीअट्टम् :



मोहिनीअट्टम् ही नृत्यशैली केरळ राज्यात उगम पावलेली असून यामध्ये कर्नाटकी संगीत (सोपान सांगीत) वापरले जाते. ही नृत्यशैली प्रामुख्याने एकल शैली असून ही स्त्रियांद्वारे सादर केली जाते. पोशाखात शुभ्र वस्त्रे नेसण्याचा प्रघात असून त्यात ब्लाउज, पदर, परकर, सोनेरी दागिने व पायात घुंगरू घातले जातात.अरमंडल, लयदार हालचाली, संपूर्ण शरीराची डौलदार व कोमल हालचाल व विविध कथांचे कथन ही या शैलीची वैशिष्ट्ये आहेत.

या नृत्यशैलीच्या संगीतामध्ये प्रामुख्याने वापरली जाणारी वाद्ये म्हणजे मृदंगम, मड्डलम, इडक्का, विणा, व्हायोलिन, आणि बासरी. महत्त्वपूर्ण योगदान असलेले काही मोहिनीअट्टम् कलाकार म्हणजे गुरू डॉ. कनक रेळे.

### ६. कथकली :

कथकली केरळ राज्यात उगम पावलेली नृत्यशैली असून यामध्ये कर्नाटकी संगीत (सोपान सांगीत) वापरले जाते. ही सामूहिक सादरीकरणाची नृत्यशैली असून ती प्रामुख्याने पुरुष कलाकार सादर करतात. पात्रांप्रमाणे विविध पोशाख व रंगांचा वापर केला जातो. हस्तमुद्रांचा प्रमुख वापर व वैशिष्ट्यपूर्ण रंगभूषा व वेशभूषा हे या शैलीचे वैशिष्ट्य आहे. या नृत्यशैलीच्या संगीतामध्ये प्रामुख्याने वापरली जाणारी वाद्ये म्हणजे चेंडा, मड्डलम, इडक्का, चेंगिला आणि इलताळम (झांज). महत्त्वपूर्ण योगदान असलेले कथकली कलाकार म्हणजे कलामंडलम गोपी.



### ७. मणिपुरी :



मणिपुरी ही नृत्यशैली मणिपूर या राज्यात उगम पावली असून यामध्ये लोकसंगीत, संकीर्तन संगीत व हिंदुस्थानी संगीताचा वापर केला जातो. ही नृत्यशैली एकल व सामूहिक पद्धतीने सादर केली जाते. स्त्री व पुरुष दोघेही कलाकार हे नृत्य सादर करतात. पोशाखात स्थानिक वस्त्रांचा व दागिन्यांचा वापर केला जातो.(उदा–ब्लाउज, परकर, धोतर, इत्यादी). वैष्णव परंपरेतील नृत्य, कोमल व जारकस नृत्य हालचाली, पूणग सारख्या वाद्यांसोबत नृत्य, हे या शैलीचे वैशिष्ट्य आहे. या नृत्यशैलीच्या संगीतामध्ये प्रामुख्याने वापरली जाणारी वाद्ये म्हणजे पूंग, कर्ताल (झांज), बासरी, शंख आणि पेन (मणिपुरी तंतुवाद्य). महत्त्वपूर्ण योगदान असलेले मणिपुरी कलाकार म्हणजे गुरू दर्शना झवेरी.

## ८. सत्रीय :



सत्रीय ही नृत्यशैली आसामच्या छत्रांमध्ये (देवळांमध्ये) उगम पावली आहे. यामध्ये आसाममधील प्रादेशिक संगीत व धार्मिक संगीताचा वापर केला जातो.परंपरेनुसार पुरुष ही शैली सादर करतात मात्र आता . स्त्रियादेखील हे नृत्य सादर करतात. स्थानिक शुभ्र वस्त्रांचा तसेच दागिन्यांचा वापर केला जातो. (धोतर, परकर, ब्लाऊज, दागिने, घुंगरू, इत्यादी). वैष्णव परंपरेतील विविध नृत्य रचना, लयदार हालचाली हे या शैलीचे वैशिष्ट्य आहे.

या नृत्यशैलीच्या संगीतामध्ये प्रामुख्याने वापरली जाणारी वाद्ये म्हणजे खोल, भोरताल/मंजीरा, नगारा, बासरी आणि शंख महत्वपूर्ण योगदान असलेले सत्रीय कलाकार म्हणजे गुरू जतीन गोस्वामी.

## ९. छाऊ :



छाऊ ही ओडिसा, झारखंड आणि पश्चिम बंगालमध्ये विकसित झालेली नृत्यशैली आहे. यामध्ये शास्त्रीय संगीत आणि लोकसंगीताचा वापर केला जातो. प्रामुख्याने समूहात सादर होणारी ही शैली स्त्री व पुरुष कलाकार सादर करतात. मयूरभंज, सेरैकेला व पुरुलिया हे छाऊ नृत्याचे प्रकार आहेत. जोशपूर्ण हालचाल, युद्धावर आधारित हालचाली, विविध कथा आणि काही प्रकारात मुखवट्यांचा वापर ही या शैलीची वैशिष्ट्ये आहेत.

या नृत्यशैलीच्या संगीतामध्ये प्रामुख्याने वापरली जाणारी वाद्ये म्हणजे ढोल, घुमसा, नागारा, मोहुरी, शहनाई आणि झांज/ताळ. महत्वपूर्ण योगदान असलेले छाऊ कलाकार म्हणजे गुरू शशधर आचार्य.

### निरीक्षण व चर्चा.

सर्व शास्त्रीय नृत्यप्रकार हे मंदिर अथवा नाट्य परंपरेत उगम पावले आहेत. मात्र प्रत्येक शैलीमध्ये त्या त्या प्रांतांतील आवडीनिवडीप्रमाणे बदल झालेला दिसतो. पुस्तकात दिलेल्या शास्त्रीय नृत्य प्रकारांचे व्हिडिओ पाहावे व त्यातील पदन्यास, मुद्रा इत्यादींचे निरीक्षण करून त्या नृत्य प्रकारांची उगम, संगीत, वेशभूषा, एकल/सामूहिक सादरीकरण आणि वैशिष्ट्ये इत्यादींच्या संदर्भात साम्य व भेद याविषयी वर्गात चर्चा करावी.

### निरीक्षण, सराव व सादरीकरण.

विद्यार्थ्यांनी विविध शास्त्रीय नृत्य प्रकारांचे व्हिडिओ पाहावेत व त्यातील मूलभूत हालचाली व मुद्रांचे निरीक्षण करून शिक्षकांच्या मार्गदर्शनाखाली सराव व सादरीकरण करावे.

यासाठी खालील मुद्द्यांचा आधार घ्यावा.

अ. मूळ स्थिती/उभी राहण्याची पद्धत (उदा. भरतनाट्यम् – अरैमंडी)

ब. हात ठेण्याची स्थिती ( उदा. ओडिसी – चौक)

क. व्हिडिओमधील गाण्याचा किंवा संगीताचा ठेका समजून त्यावर पायांच्या, हाताच्या व सर्वांगाच्या सोप्या हालचालींचा सराव करून सादरीकरण करावे.



भरतनाट्यम् – अरैमंडी



ओडिसी – चौक

## स्वाध्याय

**१. योग्य जोड्या जुळवा.**

| नृत्यप्रकार | राज्य |
|---|---|
| १. भरतनाट्यम् | अ. केरळ |
| २. कथक | ब. तमिळनाडू |
| ३. कथकली | क. मणिपूर |
| ४. कुचिपुडी | ड. उत्तर प्रदेश |
| ५. मणिपुरी | इ. आंध्र प्रदेश |

**२. खालील प्रश्नांची उत्तरे लिहा.**

१. तुम्ही पाहिलेल्या शास्त्रीय नृत्यप्रकारांपैकी कोणता नृत्य प्रकार तुम्हांला अधिक आवडला? का?

२. तुमच्या प्रदेशात कोणते शास्त्रीय किंवा लोकनृत्य प्रकार आढळतात? त्या नृत्य प्रकारांची काय वैशिष्ट्ये आहेत?

३. तुम्ही पाहिलेल्या शास्त्रीय नृत्य प्रकारांतील साम्य आणि भेद लिहून काढा.

- शिक्षकांनी विद्यार्थ्यांना विविध शास्त्रीय नृत्य शैलींचे व्हिडिओ दाखवावे. सर्व नृत्यांचे निरीक्षण करून झाल्यावर त्यातील कुठल्याही एका नृत्य प्रकाराचे अनुकरण, सराव व सादरीकरण करण्यास प्रेरित करावे.
- अधिक माहितीसाठी प्रथम पृष्ठावरील क्यू. आर्. कोड स्कॅन करा.

CG – 1
C–1.1, 1.2
LO06AE51/52/53

# १६ नृत्य आणि अभिव्यक्ती

शास्त्रीय नृत्यातील मूलभूत घटक म्हणजे 'अभिनय' होय ('अभि' म्हणजे कडे व 'नय' म्हणजे नेणे.) प्रेक्षकांना नृत्यातील/सादरीकरणातील अर्थाकडे नेणे म्हणजे 'अभिनय'. नृत्यातील शारीरिक हालचाली, हस्तांचा वापर, चेहऱ्यावरील हावभाव यांच्या माध्यमातून कलाकार एखादी भावना व्यक्त करतो व प्रेक्षकांना अर्थाकडे (रसाकडे) घेऊन जातो.

**अभिनयाचे चार प्रकार**

अभिनयाचे चार प्रकार मानले आहेत ते खालीलप्रमाणे आहेत.

**१. आंगिक अभिनय –**

शरीराच्या हालचाली, हस्तमुद्रा, चेहऱ्यावरील भाव यांच्या माध्यमातून भाव/अर्थ व्यक्त करणे. (उदा – दुःख दर्शवण्यासाठी पडक्या रेषांचा वापर, आनंद व्यक्त करताना उड्या मारणे अथवा उत्साहवर्धक हालचाली, इत्यादी.)





**२. वाचिक अभिनय –**

शब्द, आवाज, संवाद आपण गायन यांच्या माध्यमातून भाव/अर्थ व्यक्त करणे. (उदा – नृत्यातील निवेदनातून अर्थ मांडणे, नृत्यातील संगीताचे शब्द/ बोल इत्यादी)





**३. आहार्य अभिनय –**

वेशभूषा, रंगभूषा, अलंकार व नेपथ्य यांच्या साहाय्याने एखादे पात्र दर्शवणे व त्यातून भाव/अर्थ व्यक्त करणे. (उदा – मणिपुरी नृत्यात राधेची भूमिका साकारणारी नर्तिका, विशेष वेशभूषा, दागिने व शिरोभूषण परिधान करते. या सजावटीतून राधेचे पात्र साकार होते)



**सात्त्विक अभिनय :** मनातील भावना, संवेदना व अंतर्मनातील स्थिती नैसर्गिकरीत्या व्यक्त करण्याच्या अभिनयाला सात्त्विक अभिनय म्हणतात. यात चेहऱ्यावरील भाव, डोळ्यातील बदल, अश्रू, रोमांच, कंप, घाम आवाजातील बदल इत्यादींचा उपयोग केला जातो. या चारही अभिनय प्रकारांचा समावेश सर्व भारतीय नृत्यांमध्ये (विशेषतः शास्त्रीय नृत्यांमध्ये) केला जातो. शास्त्रीय नृत्यामध्ये वाचिक व आहार्य अभिनयाच्या तुलनेत आंगिक आणि सात्त्विक अभिनय प्रकारांचा वापर अधिक प्रमाणात केला जातो.

अभिनयासाठी मानवी भाव-भावना समजणे गरजेचे असते. या भावनांचे जेव्हा रंगमंचावर सादरीकरण केले जाते तेव्हा त्याचे रसामध्ये रूपांतर होते. सर्वसाधारणपणे मानवी भाव व रसांचे नऊ प्रकार मानले जातात. ते खालीलप्रमाणे :

| क्रमांक | भाव | रस | अर्थ | चित्र |
|---|---|---|---|---|
| १. | रति | शृंगार | प्रेम |  |
| २. | हास | हास्य | हसणे |  |
| ३. | शोक | करुण | दुःख |  |
| ४. | क्रोध | रौद्र | राग |  |
| ५. | उत्साह | वीर | शौर्य |  |

- शास्त्रीय नृत्यातील अभिनयाचे चार प्रकार सोदाहरण स्पष्ट करावे
- नवरसांची नावे व नृत्यातील वापर स्पष्ट करा.

CG - 2
C-2.2
LO06AE51

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ६. | भय | भयानक | भीती |  |
| ७. | जुगुप्सा | बीभस्त | घृणा |  |
| ८. | विस्मय | अदभुत | आश्चर्य |  |
| ९. | निर्वेद/शम | शांत | शांती |  |

नृत्यामध्ये मानवी भावना आणि भावनांचे विविध प्रकार रसांच्या माध्यमातून व्यक्त केले जातात. चेहऱ्यावरील हावभाव, डोळ्यांची हालचाल आणि हस्तमुद्रांच्या साहाय्याने हे रस प्रभावीपणे सादर केले जातात. उदा.–

**१. शृंगार रस :** प्रेम, आनंद व आपुलकी दर्शवणारा रस म्हणजे शृंगार रस होय.

हावभाव : हलके हसणे, लाजरे भाव, कटाक्ष.

उदाहरण : राधा–कृष्णाच्या प्रेमभावाचे नृत्यातून.

**२. वीर रस :** शौर्य, धैर्य आणि पराक्रम दर्शवणारा रस म्हणजे वीर रस.

हावभाव : आत्मविश्वासपूर्ण चेहरा, ताठ उभे राहणे.

उदाहरण : छत्रपती शिवाजी महाराजांचे युद्धातील शौर्य.

**३. रौद्र रस :** राग आणि क्रोध व्यक्त करणारा रस म्हणजे रौद्र रस.

हावभाव : मोठे डोळे, जोरदार हालचाली.

उदाहरण : दुर्गेने महिषासुराचा वध करणे.

सर्व भारतीय शास्त्रीय नृत्य प्रकारांचे एक वैशिष्ट्य म्हणजे त्यात वापरल्या जाणाऱ्या विविध हस्तमुद्रा या हस्तांच्या भाषेतून नर्तिका विविध अर्थ प्रकट करत असते. एका हाताने केल्या जाणाऱ्या हस्तमुद्रा यांना 'असंयुक्त हस्त' असे म्हटले जाते. हे असंयुक्त हस्त एकूण २८ आहेत.


१. पताक


२. त्रिपताक


३. अर्धपताक


४. कर्तरीमुखः


५. मयूर


६. अर्धचंद्र


७. अराल


८. शुकतुंड


९. मुष्टी


१०. शिखर


११. कपित्थ


१२. कटकामुख


१३. सूची


१४. चंद्रकला


१५. पद्मकोष


१६. सर्पशीर्ष


१७. मृगशीर्ष


१८. सिंहमुखशिखर


१९. कांगुल


२०. अलपदम


२१. चतुर


२२. भ्रमर


२३. हंसास्य


२४. हंसपक्ष


२५. संदंश


२६. मुकुल


२७. ताम्रचूड


२८. त्रिशूल

### हस्तमुद्रांचा भावपूर्ण उपयोग :

भरतनाट्यम, कथकली किंवा कथक यांसारख्या शास्त्रीय नृत्यांमध्ये हस्तमुद्रा हा संवादाचा मुख्य भाग असतो. नर्तक शब्दांशिवाय केवळ मुद्रांच्या माध्यमातून विविध भावना व कथा सादर करतात.

- विद्यार्थ्यांना हस्तमुद्रा शिकण्यास प्रोत्साहन द्यावे. सराव करून घ्यावा. तसेच हस्तमुद्रांचे क्रम बदलून स्मरणशक्तीस चालना मिळेल असे खेळ घ्यावे.
- अधिक माहितीसाठी प्रथम पृष्ठावरील क्यू. आर्. कोड स्कॅन करा.

CG – 2
C–2.1/2.2
LO06AE55
/56

**करून पाहू या!**

**पताका हस्त (हात पूर्ण उघडा):** आकाश, ढग, किंवा आशीर्वाद दर्शवण्यासाठी.

**शिखर हस्त:** अभिमान, पुरुषत्व, किंवा पर्वत दर्शवण्यासाठी.

**मुकुल हस्त (कमळ कळी):** देव, प्रेम, किंवा कळी दर्शवण्यासाठी.

**हस्तमुद्रांचे निरीक्षण व प्रात्यक्षिक.**

दिलेल्या हस्तमुद्रांचे निरीक्षण करून त्यातील कोणत्या हस्तमुद्रा आपण दैनंदिन जीवनात वापरतो याची चर्चा करावी व त्यातील हस्त प्रत्यक्ष करून बघावे.

उदा. फुले गोळा करताना/रांगोळी काढताना वापरली जाणारी हस्तमुद्रा.

**हस्तांनी बोलावे व नृत्य करावे.**

दिलेल्या हस्तमुद्रांचे निरीक्षण करावे. त्यातील तीन किंवा चार हस्तमुद्रा निवडून त्यांना हालचालींची जोड द्यावी व प्रत्यक्ष हस्तांसोबतच्या हालचाली करून पाहाव्यात.

- **आपल्या भावभावनांशी ओळख.**

विद्यार्थ्यांनी आपल्या दैनंदिन जीवनातील विविध भावभावना ओळखून या भाव आणि रसांचे नृत्यमय हालचालींमध्ये रूपांतर करण्याचा प्रयत्न करावा.

उदा. गोड किंवा आवडता पदार्थ खाल्ल्यावर आपला चेहरा कसा आनंदाने फुलतो.

कडू किंवा नावडता पदार्थ खाल्ल्यावर आपल्या चेहऱ्यावरील कोणते भाव उमटतात याचे निरीक्षण करा व प्रात्यक्षिक करून पहा.

- **अभिनयातून व्यक्त व्हा!**

तुम्ही शिकलेल्या रस भाव आणि अभिनय प्रकारांचा विचार करून त्यातील कुठल्याही एका रसाची निवड करावी व शिक्षकांच्या मार्गदर्शनाखाली त्यावर आधारीत नृत्य हालचालींचे सादरीकरण करावे. (किमान ४ ते ५ हालचाली अपेक्षित)

उदा. छत्रपती शिवाजी महाराज किंवा झाशीची राणी लक्ष्मीबाई यांच्या जीवनाशी निगडीत युद्धाचा प्रसंग करून दाखवणे. (वीर रसाची निर्मिती)

- **कथेवर आधारीत नृत्याविष्कार**

कोणत्याही पौराणिक कथेमधील पात्रे निवडून त्यातील कोणत्याही एका प्रसंगावर किंवा घटनेवर नृत्य, नाटिका सादर करा.

उदा. भक्त प्रल्हाद, सीता हरण, जातक कथा किंवा बोधकथा इत्यादी.

- शिक्षकांनी विद्यार्थ्यांना भाव रसाचा वापर, आपण दैनंदिन जीवनात कसा करतो ते ओळखण्यास मदत करावी व विविध हालचालींतून विद्यार्थ्यांना अभिव्यक्त होण्यासाठी मार्गदर्शन करावे.
- समान गट करून प्रत्येक गटाला कथा वाटून द्यावी व सादरीकरण करण्यासाठी आवश्यक ते मार्गदर्शन करावे.
- गट करून एकेक प्रसंग निवडायला मदत करावी. विविध भावभावनांचा यात समावेश असावा.
- प्रथम पृष्ठावरील क्यू .आर. कोड स्कॅन करून व्हिडीओ दाखवावा.

CG – 2
C–2.1\2.2
06AE54, 55, 56, 57

## स्वाध्याय

**१. खाली दिलेल्या हस्त मुद्रांचा वापर आपण कसा करू शकतो ते लिहा.**

**१. कर्तरीमुख –** .........................................................



.........................................................

.........................................................

**२.कपित्थ –** .........................................................



.........................................................

.........................................................

**३. अर्धचंद्र –** .........................................................



.........................................................

.........................................................

**४. कटकामुख –** .........................................................



.........................................................

.........................................................

**२. चेहऱ्यावरील भाव दर्शवणे व ते ओळखणे.**

कृती : एका विद्यार्थ्याने सहा रसांपैकी कोणत्याही एका रसाचे भाव चेहऱ्यावर दर्शवून इतर विद्यार्थ्यांनी तो भाव, रस ओळखावा. उदा. शृंगार रस, हास्य रस, भय रस, अद्भूत रस, बीभस्त रस, करुण रस

**३. दैनंदिन जीवनातील प्रसंग किंवा घटना यांचा खालील बाबींचा समावेश व विचार करून सादरीकरण करा.**

- दैनंदिन जीवनातील प्रसंग निवडा
- या प्रसंगात येणारे विविध भावभावनांचे रस ओळखा.

**४. कल्पनाशक्तीचा वापर करून एखादे सोपे कथानक तयार करा.**

(उदा मुले आणि जंगलातील प्राणी, मुले आणि झाडे यांच्यातील संवाद) व त्यावर गीताच्या आधारे (गायन, वाद्य संगीत) नृत्य सादर करावे. (आवश्यकतेनुसार शब्दांचा वापर करावा)

- विद्यार्थ्यांना विविध हस्तांचे निरीक्षण व प्रात्यक्षिक करण्यास प्रेरणा द्यावी. हस्तांच्या साहाय्याने हालचाली करण्यास प्रोत्साहन द्यावे. यासाठी विद्यार्थ्यांना आपल्या आवडीचे गीत/ताल निवडायला सांगावे.
- प्रथम पृष्ठावरील क्यू .आर. कोड स्कॅन करून व्हिडिओ दाखवावा.

CG – 2
C–2.1\2.2
06AE54, 55, 56, 57

# १७ नृत्य सादरीकरणाचे विविध पैलू

आपण शास्त्रीय नृत्याचे विविध प्रकार पाहिले. नृत्याचा सराव केल्यानंतर प्रत्यक्ष नृत्य सादरीकरण अधिक प्रभावी व्हावे असे प्रत्येकाला वाटते. नृत्य प्रभावीपणे सादर होण्यासाठी सरावासोबतच अन्य काही तांत्रिक बाबीदेखील महत्त्वाच्या असतात.

## १. नृत्य सादरीकरणाची तांत्रिक व्यवस्था

जसे नृत्य सादरीकरणासाठी नृत्य हालचाल व त्याचे शास्त्र शिकणे गरजेचे असते तसेच खालील तांत्रिक घटक व उपकरणांची माहिती असणे सादरीकरणासाठी महत्त्वाचे ठरते.

१. **संगीत साहित्य** – नृत्यासाठी योग्य संगीत साहित्य (ग्रंथ, पुस्तके) निवडताना त्या साहित्यातील शब्दांची लयबद्धता व त्यामागील भावभावनांचा विचार करावा.



- विद्यार्थ्यांना जवळच्या प्रेक्षागृहाला भेट देण्याचे नियोजन करावे प्रेक्षागृह व सादरीकरणातील विविध तांत्रिक व्यवस्थांचे निरीक्षण करायला सांगून ते लिहिण्यासाठी व चित्र तयार करण्यासाठी सांगावे.
- स्थानिक रंगमंच किंवा नाट्यगृह येथे भेट देऊन प्रत्यक्ष मंचाचा परिचय करून द्यावा.
- स्थानिक शास्त्रीय नृत्य कलाकारांना आमंत्रित करून त्यांची नृत्यविषयक कार्यशाळा आयोजित करावी.

CG – 3
C–3.1
06AE58, 59,

२. **संगीत –** संगीतातील स्वरांना नर्तनातून दृश्य स्वरूप देताना त्यातील स्वरांचे चढ – उतार, आवाजातील बदल, इत्यादी लक्षात घेऊन नर्तन करावे.

३. **रंगभूषा व वेशभूषा –** नर्तनाच्या विषयानुरूप रंगभूषा व वेशभूषा ठरते. नृत्य प्रकारानुसार पोशाख, दागिने, घुंगरू, मेकअप, मुखवटे, पगडी इत्यादी वस्तूंचा वापर आवश्यक असतो.

४. **नेपथ्य –** नृत्यातील विषय वस्तू/भाव अधोरेखित करण्यासाठी नेपथ्याचा वापर करावा. (उद रंगमंचावरील पडद्यावर फुलांच्या माळांची सजावट इत्यादी)

५. **ध्वनी योजन –** नृत्यात वापरले जाणारे संगीत (गायन, वादन, इत्यादी) यांचा आवाज प्रेक्षकापर्यंत पोहोचवण्यासाठी विशिष्ट ध्वनियंत्रणा लागते. (उदा. मायक्रोफोनचे प्रकार, माईक स्टॅण्ड, केबल साऊंड मॉनिटर, साउंड बोर्ड, स्पीकर, इत्यादी)

६. **प्रकाश योजना –** रंगमंचावर सादर होणाऱ्या नृत्यातील हालचाली ठळकपणे दिसाव्यात यासाठी विविध प्रकारचे दिवे वापरले जातात. (उदा. स्पॉट लाईट, हॅलोजेन, एल्. इ. डी लाईट, इत्यादी) या दिव्यांवर विविध रंगीत कागदांचा वापर करून त्यातून येणाऱ्या रंगीत प्रकाशामुळे नृत्यातील विशिष्ट भाव प्रदर्शन अधिक खुलून दिसते. (उदा. लाल रंगाचा वापर रौद्र रस/राग दर्शवण्यासाठी)

७. **प्रेक्षागृह –** प्रेक्षागृहाचे विविध भागांचे निरीक्षण करा.

## २. रंगभूमी शिष्टाचार

नृत्य, नाट्य व संगीत या कलांच्या सादरीकरणाचा समग्र आनंद घेण्यासाठी, या कला सादर करताना व पाहताना काही गोष्टी/नियम पाळायला हवे.

**कलाकारांनी रंगमंचावर वावरताना घ्यावयाची दक्षता.**

- सादरीकरणाच्या वेळेच्या आधीच प्रेक्षागृहात तयार राहावे.
- हात असलेल्या विविध उपकरणांचा सुयोग्य वापर करावा.
- त्यासाठी सादरीकरणासाठी वापरल्या जाणाऱ्या वस्तूंची (काठी, रुमाल, दिवे, इत्यादी) काळजी घ्यावी.
- मंचावर प्रवेश करताना सहसा पादत्राणे घालू नये.
- शास्त्रीय नृत्याचे सादरीकरण करताना पायात घुंगरू बांधलेले असल्यास पायात पादत्राणे घालू नये.
- आपल्या सादरीकरणासाठी आपण कधी प्रवेश घ्यायचा आहे व कधी रंगमंचावरून बाहेर जायचे आहे याचे भान ठेवावे.
- सामूहिक सादरीकरणाच्या वेळी आपल्या सोबत असणाऱ्या इतर नर्तकांचा आदर करावा व सामूहिक कृत्यातील एकसंधता जपण्याचा प्रयत्न करावा.
- सादरीकरण करताना रंगमंचावरील विविध दिशांचे भान ठेवून नृत्य प्रदर्शन करावे.

- विद्यार्थ्यांना त्यांनी पाहिलेल्या एखाद्या सादरीकरणाचे उदाहरण घेऊन त्या सादरीकरणाचे तपशील विचारावे व रंगमंचावरील शिष्टाचार याविषयी वर्गात चर्चा करावी.

CG – 3
C–3.1
06AE58, 59,

**प्रेक्षकांनी प्रेक्षागृहात वावरताना घ्यावयाची दक्षता.**

- कलाकार रंगमंचावर सादरीकरण करत असताना योग्य प्रतिसाद द्यावा.
- कलाकारांच्या कलेला मान देण्यासाठी सादरीकरण सुरू असताना आवाज करू नये.
- सादरीकरण चालू असताना खाद्य पदार्थ खाण्याचे टाळावे व एकाग्र चित्ताने कलेचा आनंद घ्यावा.
- प्रेक्षागृहात शांतता पाळावी.

**नृत्याचे नियोजन व सादरीकरण.**

नृत्याचे नियोजन व सादरीकरण करताना खालील बाबींचा विचार करावा.

१. नृत्यासाठी विषयाची निवड.
२. निवडलेल्या विषयाला पूरक संगीताची निवड.
३. विषय आणि संगीताला अनुसरून शिक्षकांच्या मार्गदर्शनाखाली नृत्याची संरचना करावी (ऊर्जा, अवकाशचा वापर, विविध रेषांचा वापर इत्यादी.)
४. नृत्याचा नियमित सराव.
५. नृत्याला पूरक रंगभूषा व वेशभूषेची निवड (पोशाख, दागिने, वस्तू, इ.).
६. नृत्याला पूरक नेपथ्य, ध्वनी, प्रकाश योजना इत्यादी तांत्रिक बाबींचे नियोजन.
७. नृत्याचे आत्मविश्वासाने सादरीकरण.

## स्वाध्याय

**अ] नृत्य सादरीकरणासाठी कोणकोणत्या बाबी आवश्यक असतात ते लिहा.**

**ब] जवळच्या प्रेक्षागृहाला भेट देऊन तिथल्या व्यवस्थांचे निरीक्षण करा व आराखडा काढा.**

१. रंगमंच  २. स्टेज वींगज्
३. पडदा  ४. बॅकस्टेज

**क] खालील मुद्द्यांच्या आधारे कोणत्याही नृत्याचे नियोजन व सादरीकरण करा.**

१. विषय  २. साहित्य  ३. संगीत
४. संरचना  ५. रंगभूषा  ६. वेशभूषा
७. नेपथ्य  ८. ध्वनी संयोजन  ९. प्रकाश योजना

**ड] नृत्य सादरीकरणासाठी लागणाऱ्या घटकांची नावे लिहा.**

- विद्यार्थ्यांना नृत्यासाठी विषय निवडण्यास मदत करावी, तसेच नृत्य सादरीकरणासाठी लागणाऱ्या तांत्रिक व्यवस्था (प्रकाश योजना, ध्वनी संयोजन, नेपथ्य इत्यादी) उपलब्ध करून देण्यासाठी प्रयत्न करावा.

CG – 3
C–3.2
06AE60, 61

# १८ स्थानिक नृत्य शैली व नर्तक

आपल्या परिसरात अनेक नृत्य व कलाप्रकार केले जातात. या कलाप्रकारांचे जतन अनेक स्थानिक कलावंत करत असतात. त्यांच्या कार्याची माहिती घेतली तर आपल्याला आपल्या परिसराची कलात्मक ओळख व समृद्धीची कल्पना येते.

**महाराष्ट्रातील काही नृत्य कलावंतांची माहिती.**

**१. विठाबाई नारायणगावकर :** विठाबाई भाऊमांग नारायणगावकर या महाराष्ट्रातील अत्यंत लोकप्रिय आणि प्रख्यात तमाशा सम्राज्ञी व लावणी कलावंत होत्या. महाराष्ट्राच्या लोककलेतील (तमाशा) योगदानाबद्दल त्यांना 'तमाशा सम्राज्ञी' म्हणून ओळखले जाते.



**पूर्ण नाव:** विठाबाई भाऊमांग नारायणगावकर (विठाबाई भाऊ खुडे)

**जन्म:** १ जुलै १९३५, पंढरपूर (महाराष्ट्र)

**मृत्यु:** १५ जानेवारी २००२, नारायणगाव (वय ६६ वर्षे)

**कुटुंब:** त्यांचे वडील भाऊ खुडे हे प्रसिद्ध शाहीर पठ्ठे बापूराव यांचे शिष्य होते आणि त्यांचा स्वतःचा 'भाऊ-बापू मांग नारायणगावकर तमाशा मंडळ' हा फड होता.

**कलाकृती आणि योगदान**

**कलेचे बाळकडू:** विठाबाईंना लहानपणापासूनच घरातून गायन आणि नृत्याचे बाळकडू मिळाले. वयाच्या अवघ्या ४-५ व्या वर्षापासून त्यांनी शाळेऐवजी वडलांच्या तमाशा फडासोबत गावोगावी भटकंती सुरू केली.

**कलेतील नैपुण्य:** गोड आवाज, आकर्षक चेहरा आणि अप्रतिम लावणी नृत्य यांमुळे त्यांनी प्रेक्षकांच्या मनावर राज्य केले. गवळणी, लावण्या, आणि संवाद फेकण्यात त्या अत्यंत तरबेज होत्या.

**देशभक्ती:** १९६२ च्या भारत-चीन युद्धादरम्यान (नेफा सीमेवर) त्यांनी भारतीय सैनिकांचे मनोरंजन आणि मनोधैर्य वाढवण्यासाठी प्रत्यक्ष सीमेवर जाऊन तमाशा सादर केला होता.

**सन्मान आणि पुरस्कार:** लोककलेतील सर्वोच्च योगदानासाठी त्यांना भारताच्या राष्ट्रपतींच्या हस्ते 'राष्ट्रपती पदक' (संगीत नाटक अकादमी पुरस्कार) देऊन सन्मानित करण्यात आले होते.

महाराष्ट्र शासनाने त्यांच्या स्मृतिप्रत्यर्थ लोककलावंतांसाठी 'विठाबाई नारायणगावकर जीवनगौरव पुरस्कार' सुरू केला आहे, जो दरवर्षी दिला जातो.



**२. सदानंद राणे :** सदानंद राणे हे महाराष्ट्रातील एक अत्यंत नामांकित, ज्येष्ठ लोककला-लोकनृत्य अभ्यासक, संशोधक आणि नृत्य-नाट्य दिग्दर्शक आहेत. त्यांनी महाराष्ट्राच्या पारंपरिक लोककलांचा, विशेषतः लावणी आणि लोकनृत्यांचा वारसा जपण्यासाठी आणि तो पुढच्या पिढीपर्यंत पोहोचवण्यासाठी गेली ४० हून अधिक वर्षे अविरत कार्य केले आहे. सदानंद राणे यांचा संक्षिप्त परिचय आणि त्यांची प्रमुख वैशिष्ट्ये खालीलप्रमाणे आहेत:

१. **लोककलेचे अभ्यासक आणि लेखन :** सदानंद राणे यांनी केवळ नृत्य दिग्दर्शन केले नाही, तर महाराष्ट्रातील विविध लोकनृत्ये आणि लावणी यांच्या मूळ स्वरूपावर सखोल संशोधन आणि अभ्यास केला आहे. त्यांच्या या अभ्यासाचा फायदा अनेक तरुण कलाकारांना आणि नृत्यांगनांना होतो.

२. **परीक्षक :** दूरदर्शनच्या 'सह्याद्री' वाहिनीवरील अत्यंत लोकप्रिय ठरलेल्या 'धिना धिन धा' या नृत्य स्पर्धेचे ते मुख्य परीक्षक राहिले आहेत.

३. **सांस्कृतिक कार्यक्रम:** त्यांनी अनेक ऐतिहासिक आणि सांस्कृतिक कार्यक्रमांचे यशस्वी दिग्दर्शन केले आहे. संयुक्त महाराष्ट्राच्या लढ्यावर आधारित त्यांच्या 'सांस्कृतिक जागर' या कार्यक्रमाने मोठी लोकप्रियता मिळवली.

४. **विविध नृत्य प्रकार :** लावणीसोबतच कोळीनृत्य, तारपा, गोंधळ, आणि भारतातील इतर राज्यांचे लोकनृत्य प्रकार यांवरही त्यांची मोठी पकड आहे.

५. **प्रमुख पुरस्कार आणि सन्मान :** महाराष्ट्राच्या सांस्कृतिक क्षेत्रात दिलेल्या योगदानाबद्दल त्यांना अनेक प्रतिष्ठेच्या पुरस्कारांनी सन्मानित करण्यात आले आहे:

**राज्य सांस्कृतिक पुरस्कार (२०२३):** महाराष्ट्र शासनाच्या सांस्कृतिक कार्य विभागातर्फे दिला जाणारा अत्यंत मानाचा 'राज्य सांस्कृतिक पुरस्कार (नृत्य क्षेत्र)' देऊन त्यांना गौरवण्यात आले आहे.

**लावणी गौरव पुरस्कार (२०२२):** 'लावणी कलावंत महासंघा'तर्फे दिला जाणारा प्रतिष्ठित 'लावणी गौरव पुरस्कार (नृत्य दिग्दर्शक)' सदानंद राणे यांना प्रदान करण्यात आला.

**महाराष्ट्र लोक गौरव पुरस्कार (२०२४):** महाराष्ट्र लोककलावंत प्रतिष्ठानतर्फे त्यांना लोककलेतील योगदानाबद्दल हा विशेष पुरस्कार देण्यात आला.

६. **भावी पिढीचे मार्गदर्शक (गुरू)**

सदानंद राणे यांनी मुद्रा आर्ट अकॅडमी सारख्या संस्था आणि शासकीय कार्यशाळांच्या माध्यमातून शेकडो तरुण-तरुणींना लावणी आणि लोकनृत्याचे शास्त्रशुद्ध प्रशिक्षण दिले आहे. आज अनेक नामांकित लावणी कलावंत आणि नृत्य दिग्दर्शक त्यांना आपले 'गुरू' मानतात.

- विद्यार्थ्यांना परिसरातील स्थानिक नृत्य प्रकारांचा परिचय करून द्यावा व अहवाल सादर करण्यासाठी प्रोत्साहन द्यावे.
- स्थानिक नर्तक आणि त्यांची नृत्यशैली व नृत्य प्रकारांविषयी वर्गात माहिती द्यावी. (उदा. रोहिणी भाटे, डॉ. सुचेता भिडे-चापेकर )

CG – 4
C-4.1\4.2
LO06AE62, 63

## स्वाध्याय

**१. स्थानिक (लोक/शास्त्रीय) नृत्य कलावंतांची माहिती घ्या व त्यांच्या जीवन कार्याविषयी वर्गात चर्चा करा. या कलाकारांची भेट/मुलाखत/सादरीकरण पाहा व त्यांच्याविषयी वहीमध्ये थोडक्यात माहिती लिहा.**

**२. स्थानिक परिसरातील नृत्य (लोक/शास्त्रीय) या विषयावर माहिती घेऊन त्याचा अहवाल सादर करा.**
अहवाल सादर करताना खालील मुद्‌द्यांचा विचार करा.

१. अहवालाचे शीर्षक
२. नृत्य प्रकारचे नाव
३. नृत्य प्रकाराचे उगम स्थान
४. नृत्य प्रकाराचा इतिहास का व कुठे सादर केला जातो ?
५. सादरीकरणाची पद्‌धत एकल/सामूहिक, स्त्री/पुरुष/दोघे
६. नृत्याची रंगभूषा व वेशभूषा
६. सादरीकरणातील वैशिष्ट्ये

# नोंदी

प्रिय विद्यार्थी मित्रांनो आणि मैत्रिणींनो,

जर तुम्हांला कोणी अयोग्य रीतीने स्पर्श केल्यामुळे तुम्ही अस्वस्थ झाला असाल, तर तुम्ही अजिबात गप्प बसू नका. अशी घटना घडल्यास, तुम्ही खालील गोष्टी करणे आवश्यक आहे.

१) स्वतःला दोष देऊ नका.

२) तुमचा ज्यांच्यावर विश्वास आहे, त्यांना घडलेल्या घटनेबद्दल सांगा.

३) तुम्ही पोक्सो ई–बॉक्सद्वारे तुमच्या हक्कांच्या संरक्षणासाठी स्थापन केलेल्या राष्ट्रीय आयोगाला देखील कळवू शकता.

**जेव्हा तुम्हांला कोणी अयोग्यरीत्या स्पर्श करतो, तेव्हा तुम्हांला वाईट वाटू शकते, तुम्ही गोंधळून जाऊ शकता, तुम्हांला असहाय्य वाटू शकते; पण तुम्हांला 'वाईट' वाटण्याचे काहीच कारण नाही, कारण यात तुमचा दोषच नाही.**




**हे बटण दाबा.**

**POCSO हा e-box ncpcr@gov.in या वेबसाईटवर उपलब्ध आहे.**

**जर तुमचे वय १८ वर्षांपेक्षा कमी असेल. तुम्हांला कोणी त्रास दिला असेल आणि तुम्ही गोंधळलेले असाल, पीडित असाल, तणावात असाल अथवा अशा प्रकारचा त्रास सहन करणारे कोणी मूल तुमच्या माहितीत असेल, तर १०९८ (दहा नऊ आठ) ला संपर्क साधा. त्यामुळे आपले व मित्रांचे जीवन बदलू शकते.**

CHILD LINE 1098 NIGHT & DAY

**चाइल्ड लाइन १०९८ (दहा नऊ आठ) : ही एक २४ तास टोल फ्री राष्ट्रीय आपत्कालीन फोन सेवा आहे. महिला आणि बालविकास मंत्रालयातर्फे, पीडित मुलांसाठी राबवला जाणारा, चाइल्ड लाइन फाउंडेशनने सुरू केलेला हा उपक्रम आहे.**

नए समाज की ओर
Towards a new dawn

- **विद्यार्थ्यांना चांगला स्पर्श आणि वाईट स्पर्श ओळखण्यासाठी त्यांच्या वयोगटांनुसार शारीरिक आणि भावनिकदृष्ट्या मार्गदर्शन करावे.**

महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व
अभ्यासक्रम संशोधन मंडळ, पुणे.

कलाशिक्षण इयत्ता सहावी (मराठी माध्यम)

समग्र शिक्षा
Samagra Shiksha

(विनामूल्य वितरणासाठी)



कलाशिक्षण इयत्ता सहावी (मराठी माध्यम)